रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, ७ जुलै २०२४



# तेजस्वी तारा : कीर स्टार्मर

आधुनिक केसरी

**इंग्लंडचे नवे पंतप्रधान मजूर पक्षाचा तेजस्वी तारा आहे. १४ वर्षानंतर झालेला बदल त्यांना कृतीत आणावयाचा आहे. त्यांना इंग्लंडला शांतता, स्थैर्य व विकासाकडे न्यावयाचे आहे. या वादळवाटेतून ते देशाची नौका सुखरूप बाहेर काढतील यात शंका नाही. इंग्लंडला संसदीय लोकशाहीची जननी असे म्हटले जाते. लोकशाहीचे पावित्र्य आणि प्रथा परंपरांचे प्रवाह टिकवून ठेवून ते अधिक समृद्ध करण्याचे कार्य इंग्लंडच्या संसदीय लोकशाहीने केले आहे. नुकत्याच झालेल्या संसदीय निवडणुकीत १४ वर्षे सत्तेवर असलेल्या हुजूर पक्षाचा पराभव होऊन मजूर पक्ष सत्तेवर आला आहे आणि मजूर पक्षाचे प्रमुख नेते कीर स्टार्मर यांनी पंतप्रधान पदाची शपथही घेतली आहे.**

स्टार्मर हे ६१ वर्षाचे असून ते बॅरिस्टर आहेत. कायद्याची सर्वोच्च पदवी संपादन केली आहे. राजकारणाच्या वादळात राहून त्यांनी विनम्र भाव जोपासला आहे. 'विद्या विनयेन शोभते' असे संस्कृत सुभाषित आहे. परंतु राजकारणाच्या धकाधकीत हा विनम्र भाव स्टार्मर यांनी प्राणपणाने जोपासला आहे. त्यांच्या नित्य राजकीय व्यवहारात पवित्रता व विनय या सद्‌गुणांचा सुरेख संगम आढळतो. राजकारणातील सचोटी, विश्वास आणि स्नेहभाव त्यांनी सातत्याने जोपासला आहे. स्वपक्षातील नेत्यांशी असलेले संबंध तसेच विरोधी पक्षांशी असलेला मैत्रीभाव यामध्ये त्यांनी साधलेला समन्वय हे त्यांच्या अजातशत्रू व्यक्तिमत्वाचे प्रमुख लक्षण होय. सध्या इंग्लंडपुढे असलेला अडचणींचा डोंगर पार करून राजकीय जीवनात शांतता व स्थैर्य आणण्याचे मोठे आव्हान त्यांच्यापुढे आहे. आपल्या कर्तृत्वाने आणि प्रगल्भ अनुभवाने ते हे सर्व अडचणींचे डोंगर पार करून राष्ट्रहिताची नौका पैलतीरी नेऊ शकतील असा विश्वास वाटतो. त्यांच्या या यशाची मिमांसा करताना त्यांच्या जीवनपटातील यशाचा आलेख मांडावा लागेल.




डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

स्टार्मर यांनी आपले जीवनशिल्प अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कोरले आहे. आव्हानांना सामोरे जाणे आणि आव्हाने स्विकारणे ही त्यांची शैली आहे. उपलब्ध संसाधनांचा यथायोग्य वापर करून मूल्ये व निष्ठांच्या आधारे ते परिस्थितीत हळूहळू बदल घडवून आणतात. कुठल्याही प्रश्नाकडे सावधदृष्टीने ते पाहतात. आयुष्याच्या वाटेवर सुद्धा त्यांनी मोठ्या आशा न ठेवता परिस्थितीवर मात करून यशशिखरे गाठली आहेत. आतापर्यंतच्या जीवनातील त्यांचे हे यश लोकशाही जीवनाला स्थैर्य देणारे ठरले आहे. कोणत्याही संकटावर मात करताना त्यांच्यातील जिद्द, ध्येयवाद आणि प्रयत्नांची पराकाष्ठा हे गुण महत्त्वाचे आहेत. 'मी इथे उभा राहून असे म्हणणार नाही की, निवडणुकीच्या आदल्या दिवशी मला अशी जादूची कांडी मिळाली आहे जी मी सहज फिरवू शकेन आणि तेथे नसलेले पैसे शोधू शकेन' हे त्यांचे विधान मोठे अर्थपूर्ण आहे. पूर्व पंतप्रधान ऋषी सुनक यांच्याशी झालेल्या चर्चेदरम्यान ते म्हणाले होते, आपल्या अर्थव्यवस्थेचे खूप मोठे नुकसान झाले आहे. त्याला दुरूस्त करायला वेळ लागेल. ही गोष्ट सहजपणे शक्य नाही. याची त्यांना कल्पना आहे. हुजूर पक्ष १४ वर्षे सत्तेवर होता. आता नवे सरकार बनल्यानंतर देशापुढील प्रश्नांचा मागोवा घेऊन त्यांना वाटचाल करावी लागणार आहे. कोणाच्या नाराजीचा, सुखदुःखाचा विचार न करता जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करणे हे मोठे अवघड काम त्यांच्यापुढे आहे. कीर स्टार्मर त्यांनी म्हटल्याप्रमाणे आम्ही ते केले, बदल आता सुरू झाला आहे आणि ते चांगले वाटत आहे. मला प्रामाणिक असणे आवश्यक आहे. हा त्यांचा सार्थ भाव आहे. त्यांनी पुढे असेही म्हटले की, आज आम्ही पुढील अध्याय सुरू करतो आहोत. परिवर्तनाचे कार्य सुरू करतो आहोत. राष्ट्रीय नूतनीकरण ध्येय आणि उद्दिष्टानुसार आपल्या देशाची पुर्नबांधणी करण्यास प्रारंभ करावा लागेल. हा त्यांचा आशावाद अर्थपूर्ण वाटतो. बदललेल्या मजूर पक्षाचे नेतृत्व करताना त्यांना पक्षात अनुशासन व शिस्त आणणे आणि दुसरीकडे देशाला अर्थव्यवहारात अनुशासित करणे असे दुहेरी काम करावे लागणार आहे. नव्या सूत्रांची आखणी मजूर पक्षाच्या प्रचार मोहिमावर त्यांच्या विचारांची छाप दिसून आली. नवीन धोरणे आणि नव्या सूत्रांची आखणी करून त्यांना शांतता व स्थैर्य आणावयाचे आहे. प्रथम संपत्तीची निर्मिती करावी लागेल आणि त्याबरोबरच राजकीय व आर्थिक स्थैर्यासाठी मतदारांना दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. हे सर्व सावधपणे आणि पद्धतशीरपणे करावे लागणार आहे. स्टार्मर यांची रणनिती स्पष्ट आहे. त्यांना १९५० च्या दशकाकडे वळून जुन्या आदर्शांना नव्या वातावरणात प्रस्थापित करावे लागेल. विकासाचा सावध व पद्धतशीर दृष्टिकोन त्यांना आखावयाचा आहे. योग्यता आणि व्यावहारिक दृष्टिकोन समोर ठेवून त्यांना आर्थिक बदल घडवावयाचे आहेत. वाढती महागाई, चलन फुगवटा यामुळे इंग्लंड दुसऱ्या महायुद्धानंतर बिकट आर्थिक परिस्थितीला सामोरा जात आहे. तसेच स्थलांतरीतांचा प्रश्न, दहशतवाद या प्रश्नांनीही डोके वर काढले आहे. मजूर पक्षाचे संस्थापक केयर हार्डी यांच्या नावावरून स्टार्मर हे डाव्या विचारसरणीच्या कुटुंबात वाढले आहेत. बॅरिस्टर या नात्याने त्यांनी बऱ्याचदा अंडर डॉक्सचे रक्षण केले आणि जगभरातील काहींना मृत्युदंडापासून वाचविले आहे. २०१५ मध्ये ते मजूर पक्षाच्या कायदा विभागाचे प्रमुख सल्लागार बनले. त्यांना कायदा आणि फौजदारी न्यायाच्या सेवांसाठी नाइटहूड मिळाले आहे. एका वर्षानंतर त्यांनी अविश्रांत परिश्रम घेऊन अनेक चांगली कामे केली. १९३५ पासून पक्षाच्या सर्वात वाईट कालखंडात २०२० मध्ये त्यांची प्रमुख कामगार नेते पदावर नियुक्ती झाली आणि त्यांनी आपल्या कुशल नेतृत्वाने पक्षात नवचैतन्य आणले. पक्षाला वळसा घालण्यासाठी आणि त्यांच्या प्राधान्यक्रमांना दिशादर्शित करण्यासाठी योजना आखली व ती अंमलात आणली. स्टार्मर यांच्या समवेत काम केलेल्या त्यांच्या सहकार्याची भावना त्यांच्या विषयी आत्मविश्वास प्रकट करणारी आहे. कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन पुढे जाणारे ते एक सर्वोत्तम आहेत. काही मतभेद असले तरीही सर्वांचा बरोबर घेऊन पुढे जाण्यात त्यांना आनंद वाटतो.

स्टार्मर यांचे लोकहृदयाशी नाते आहे. त्यांना जनतेची नाडी कळते. त्यांच्या उदार दृष्टिकोनामुळे ते अहंकारापासून दूर आहेत. पक्षनेते कार्यकर्ते यांना समजून घेऊन देशाला पुढे नेण्याचे कौशल्य त्यांच्यात आहे. स्टार्मर यांचा आर्थिक विकासाचा दृष्टिकोन मूल्यवर्धित कर किंवा कॉर्पोरेशन कर वाढविण्याचा विचार नाही. १४ वर्षाच्या अशांत हुजूर कालावधीनंतर आता स्टार्मर यांना काम करावयाचे आहे. २०१६ मध्ये ब्रिटनने युरोपियन युनियन जोडण्याचा निर्णय घेतला. तसेच कोविड - १९ साथीच्या कालावधीत आणि रशियाने युक्रेनवर केलेल्या आक्रमणानंतर ब्रिटनचे अर्थकारण अधिक बिकट झाले. अशावेळी सर्वानुमते सहमतीने निर्णय घेऊन आर्थिक सुधारणा कराव्या लागतील, पक्षाची संघटना, ध्येय धोरणे व राष्ट्राचे अर्थकारण याची मूठ बांधून त्यांना प्रश्न सोडवावयाचे आहेत. स्थैर्याच्या युगाकडे परत जाताना काही ठाम पावले टाकावी लागतील. मतदारांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी, समस्यांना सामोरे जाण्यासाठी औद्योगिक क्षेत्रात सुधारणा, आरोग्य व्यवस्थेत बदल, शैक्षणिक संधींचा विस्तार हे सर्व करताना सामान्य माणसाचे जीवनमान व राहणीमान सुधारण्यासाठी विशेष कार्यक्रम आख लागतील. मी बदलाबाबत उत्साही आहे. मला मजूर पक्षात नवचैतन्य आणावयाचे आहे. हा त्यांचा विश्वास महत्त्वाचा वाटतो. त्यांना आर्थिक प्रश्नावर शस्त्रक्रिया करताना सावध पावले टाकावी लागतील. निवडणुक जिंकल्यानंतर नवे प्रश्न सोडविण्यासाठी ते उत्सुक आहेत. अर्थकारणात शिस्त, राजकारणात अनुशासन आणि समाजकारणात सहमती याआधारे त्यांना वाटचाल करावी लागणार आहे. इंग्लंडचे नवे पंतप्रधान म्हणून कार्य करताना त्यांच्यापुढे वादळवाट उभी आहे. त्यांचे वडील उद्योग क्षेत्रात काम करीत होते आणि आई परिचारिका म्हणून कार्यरत होत्या. अशा मजूर पक्षावर प्रेम करणाऱ्या कुटुंबात वाढलेले सुसंस्कृत आणि विनम्र स्टार्मर इंग्लंडचा राज्यरथ हाकण्यासाठी पुढे सरसावले आहेत. त्यांना वादळवाट पूर्ण करून नौका पैलतीरी न्यावयाची आहे. साधनसामुग्रीची सुनियोजित उभारणी करणे, पायाभूत सुविधांचा विकास करणे आणि हळूहळू आर्थिक संकटावर मात करणे हे काम तसे सोपे नाही. परंतु असीम ध्येयवाद आणि दुर्दम्य इच्छाशक्ती याच्या आधारे ते धैर्याने वाटचाल करू शकतील. पवित्रता, नम्रता आणि प्रगाढ आत्मविश्वास याआधारे त्यांना यश संपादन करावयाचे आहे. त्यांनी मजूर पक्षाची पुनर्बांधणी केली. आता त्यांना प्रशासन व्यवस्थेत बदल करावयाचे आहेत. पक्षाचे ब्रँडिंग झाले आता सरकारचे ब्रँडिंग कसे करणार हा खरा प्रश्न आहे. कल्याणकारी राज्यात विकासाची फळे शेवटच्या माणसापर्यंत पोहोचविण्याचे आव्हान त्यांच्यापुढे आहे. नम्रता व सेवाभाव या गुणांच्या जोडीला लोककल्याणकारी दृष्टिकोन हा त्यांचा आधार आहे. सामाजिक, आर्थिक बदल हे लोकांच्या सहकार्याशिवाय होऊ शकत नाहीत. १४ वर्षे विशिष्ट पट्टीमध्ये चाललेल्या राजकारणाला त्यांना आता नवीन वळण द्यावयाचे आहे. सभागृहात भक्कम बहुमत पाठिशी आहे. पक्ष संघटनाही त्यांच्या दिमतीला आहे. भक्कम पूर्वानुभव गाठिशी आहे. तप्त मुशीतून तावून सुलाखून निघालेले त्यांचे नेतृत्व आहे. इंग्लड अर्थकारणात व राजकारणात नवे वळण घेण्याच्या चौरस्त्यावर उभा आहे. वॉशिंग्टन पोस्टने म्हटल्याप्रमाणे, इंग्लंडच्या प्रगल्भ लोकशाहीने सहज सत्तांतर घडवून आणले. आता राजकीय व आर्थिक धोरणात सुद्धा योग्य ते बदल करून सर्व संकटावर मात करण्याची इंग्लंडच्या लोकशाहीची परंपरा स्टार्मर कायम ठेवतील असे वाटते. अशा प्रकारे नव्या पंतप्रधानांपुढे अनेक आव्हाने आहेत. अडचणीही आहेत. पण तेथील प्रथा परंपरा व संकेताच्या आधारे ते ब्रिटनला वादळातून बाहेर काढतील यात शंका नाही.









विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

भौतिकविज्ञान, एअर लॉज , नेव्हिगेशन, रेडिओ कम्युनिकेशन इ विषयांची परीक्षा द्यावी लागली. पण या सगळ्या गोष्टींचा ताण न घेता, त्यांनी उत्सुकतेपोटी या सगळ्या गोष्टी शिकून घेतल्या. वैमानिकाची परीक्षा देतानाही अनेक अडचणींना सामना करावा लागला. पण त्या सगळ्या दिव्यातून त्या पार पडल्या. ज्याचा निर्धार पक्का असतो, त्याला कोणतीही गोष्ट अडवू शकत नाही हेच जणू त्यांनी आपल्या उदाहरणातून सिद्ध केले. फिलिपिन्समधून पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणाची पदवी घेऊन यशस्वीरीत्या त्या भारतात परतल्या. साधारणपणे वैद्यकीय शिक्षणाच्या ओढीने पस्तिसाव्या वर्षी सुरु झालेला हा प्रवास वयाच्या ४२व्या वर्षी पूर्ण झाला होता. भारतात परत आल्यानंतरही त्यांच्या पाठीमागच्या परीक्षा काही संपल्या नाहीत. एमसीआय ची मान्यता मिळवण्यासाठी स्क्रीनिंग टेस्ट द्यावी लागली आणि त्यांना रजिस्ट्रेशन मिळाले त्यानंतर एक वर्ष त्यांनी रुबी हॉलमध्ये एक वर्ष इंटर्नशिप केली. येथे डॉ प्राची साठे यांच्यासोबत काम करताना क्लिनिकल असिस्टंट आणि रिसर्च असोसिएट म्हणून त्यांना मदत केली. संशोधनात्मक काही पेपर्स प्रसिद्ध केले.




## हितगुज





पुष्प
१०९वे

गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे,
दिंडोरी (नाशिक)

### अमंगल स्वाहा करा

खगोल शास्त्रानुसार प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्यानुसार मराठी महिन्यांचे नामकरण झाले आहे. फाल्गुन पौर्णिमेचे नक्षत्र पूर्वाफाल्गुनी आहे.


पूर्वाफाल्गुनीच्या पौर्णिमेच्या अमृतकलेने मानवी सतसंवेदनांना अमृतमय करण्यासाठी होळीचा सण, धुळवड साजरी केली जाते. भावनांची सुंदर, मोहक रंगपंचमी साजरी करण्यासाठी संयमाच्या, शिस्तीच्या, परिश्रमांच्या संकल्पांच्या ज्वाला पेटवून असत्, अमंगल, घृणास्पद, कलंकीत स्वाहा करण्याचा संदेश  हा सण देतो. या देशात राख किंवा भस्म ही पूजासामुग्री बनले आहे. दुःख भस्मीभूत करून त्यावर बोधाचे शिवलिंग स्थापावे, दुःखाला दवा बनवावे, असाच संदेश देऊन भारतीयांनी  दुःखाचा धीराने स्वीकार केला आहे. अशाच अग्नीपूजनाच्या प्रसंगी संत रामदासांना स्फुरले असेल की, "वन्हि तो चेतवावा, चेतविताच चेततो। केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे।" फाल्गुन महिना ही हिंमत देणारा, पुरूषार्थ जागवणारा महिना आहे. निसर्ग ही शिकवण देणारा, जीवनेच्छा व जीवनशक्ती वाढविणारा मोठा शिक्षक आहे.

शिशिरात पूर्ण निष्पर्ण झालेली झाडे ज्या धीरगंभीरतेने नव्या पालवीची वाट पाहतात व वसंत येताच तेवढ्याच धैर्याने, शांततेने नवी पालवी, नवे चैतन्य धारण करतात. जीवनात असेच सुख-दुःखांचे चक्र अनुभवले म्हणजे मनाचा तोल सांभाळला जातो. उजाड करणारी खोल जखम होत नाही. घरातल्या कुंड्यामध्ये कैक्टस वाढवणार्या शहरी संवेदनांना हे कळणार नाही पण आमचे आदिवासी बंधू हजारो वर्षांपासून निसर्गाचे अतुट मित्र बनून समृद्ध मनाने जगताहेत. जरा मैत्रीची हाक व हात त्यांच्यापर्यंत पोहचू द्या, तरच खरी प्रगतीची सुरूवात होईल.

## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

आमच्या उपनिषदांतही याचसाठी शरीररक्षणाला महत्व दिलेले आढळून येते.



हठयोगाच्या साहाय्याने साधकाला याचि देही याचि डोळा हा मुक्तीचा सोहळा अनुभवता येतो असे नाथांचे तत्त्वज्ञान सांगते. नाथांचे हे तत्त्वज्ञान हे द्वैत अद्वैताच्या पलीकडचे आहे. एकच अद्वितीयय असे परमतत्त्व शिव आणि शक्ती अशा दोन अवस्थांमधून प्रकट होते व शिव हाच शक्तिरूप बनून सर्व दृश्यसृष्टीमध्ये प्रकटतो असे हे तत्त्वज्ञान सांगते. गोरक्षनाथांनी सांगितलेला योगमार्ग हा 'हठयोग' आहे. ह=सूर्य आणि ठ-चंद्र. म्हणजेच हा सूर्यचंद्रांचा योग आहे. सूर्य प्राणवायू आणि चंद्र अपानवायू. या दोहोंचा योग तो हठयोग. श्रीगोरक्षनाथांच्या तत्त्वज्ञानात योग, ज्ञान आणि भक्ती यांना सारखेच महत्व असून शिवाकडून योगविद्या, ब्रह्माकडून ज्ञान आणि विष्णूकडून भक्ती यांची प्राप्ती होते असे हा संप्रदाय मानतो. तसेच, ह्या तिन्ही दैवतांच्या शक्ती श्रीदत्तात्रेयांमध्ये एकवटल्या आहेत असेही या संप्रदायात सांगितले आहे. श्रीगोरक्षनाथांच्या महान तत्त्वज्ञानाची ही एक ओझरती ओळख असून ज्यांना त्यांचे संपूर्ण तत्त्वज्ञान जाणून घेण्याची इच्छा असेल त्यांनी त्यांचे 'सिद्धसिद्धान्तपद्धति', 'गोरखबानी' इ. ग्रंथ मुळातून अभ्यासणेच योग्य ठरेल. 'आंतरिक शुद्धीवर भर, अनुभूतीला प्रमाण मानणारे मुक्तचिंन, तपःपुनीत तेजस्वी व्यक्तिमत्त्व आणि प्रखर आत्मविश्वास या गुणांमुळे गोरक्षनाथांनी औपनिषदिक ऋषींचा वारसा समृद्ध बनविला.' त्यांच्या एकंदर कार्याची थोडक्यात ओळख पुढीलप्रकारे करून देता येईल. 'गोरक्षनाथांच्या धर्मसाधनेत निगम, आगम, मंत्र-तंत्र, वज्रयान, हनियान, सिद्धयोगी इ. चा समावेश होत असला तरी तिचे शुद्धीकरण करण्याचा जास्तीतजास्त प्रयत्न त्यांनी केला. वैदिकांचे शुष्क व नीरस कर्मकाण्ड त्यांनी वगळले. तांत्रिकांचा व शाक्तांचा वामाचार त्यांनी त्याज्य मानला. जारण, मारण, उच्चाटन यांच्यापेक्षा देहशुद्धी, ध्यानयोग, कुंडलिनीजागृती यांनी त्यांनी आपला साधनेत महत्वाचे स्थान दिले. वैदिक कर्मकाण्डाला व तांत्रिकांच्या वामचाराला विरोध करून त्यांनी आपली योगसाधना कर्मयोग व भक्तियोग यांच्याद्वारे समाजाभिमुख केली. इंद्रियनिग्रह, आत्मसाधना, मनोविकास यांना महत्व देऊन धर्मभेद, वर्णभेद, जातिभेद यांचा विचार न करता त्यांनी भारतीय धर्मसाधनेची बैठक अधिक विस्तृत केली. गुरु गोरक्षनाथांची महती गाण्यासाठी कित्येक ग्रंथ लिहिले तरी ते अपुरे पडतील, इतके ते महान होते!

।। श्री चैतन्य गोरक्षनाथाय नमः ।।



आधुनिक केसरी


### स्थितप्रज्ञ गाथा | आयुष्याची ||

श्वासाच्या माळेत | गुंफोनिया नाम ||
चाले आत्माराम | मुमुक्षु हा ||१||
मौनाच्या नगरी | एकांती बैसला ||
बळ साधनेला | मिळु लागे ||२||
अहंकारा द्वारी | विकारी बैठक ||
पुण्यकर्म नेक | जाळे त्यासी ||३||
गुरूकृपा होता | झाला प्रज्ञावंत ||
रेडा भाग्यवंत | होतो जाण ||४||
संजीवन नांदे | अंतर्बाह्य आता ||
स्थितप्रज्ञ गाथा | आयुष्याची ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

एक तानता ध्यान है,
त्राटक शब्द स्वरुप ।
तन मन की कछु सुधि नहीं, पाया पुरुष अनूप ।।२६।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल दशम अध्याय) ०२/१०/२६


मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
शब्द स्वरूप परब्रह्मात एकतार त्राटक लावणे म्हणजे ध्यान होय. एखाद्या वस्तूस एकटक पहाणे यास त्राटक म्हणतात. ध्यानात तन-मनाची शुद्ध अर्थात ज्ञान रहात नाही. ध्यात्याने ध्येय स्वरूपास पहाणे ध्यान आहे. ध्याना द्वारे अनुपम पुरुषाची म्हणजेच परमेश्वराची प्राप्ती होते. ध्यान साधन आहे आणि ध्येय लक्ष्य आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## मूल होऊन भगवंतापाशी जावे

आधुनिक केसरी

या जगात कर्माशिवाय कोण राहतो ? पण कर्म यथासांग होत नाही याचे कारण, आपण कर्म कशाकरिता करतो याची जाणीवच होत नाही आपल्याला. अधिष्ठानाशिवाय कर्म साधत नाही. मालक पाठीशी असला की कर्म करणाऱ्याला जोर येतो. काही चांगली कर्ममार्गी माणसे भक्तिमार्गी लोकांना नावे ठेवतात. भक्तिभावाने जो राहतो तो दुसऱ्याला नावे ठेवीत नाही. ‘ मी कोण ’ हे जाणायला ज्ञान आणि भक्ती लागतेच; तसेच, ‘ ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ’ म्हटले तरी त्याचा अनुभव येण्यासाठी कर्म करावेच लागते. उपासना, भगवंताला ओळखून करावी. लहान मूल आईकडे डोळे करून मुकाट्याने दूध पिते, त्याप्रमाणे समर्थांसारख्यांनी जे सांगितले ते आम्ही निमूटपणे करावे. डोळे मिटून जितके काम होईल, अंधश्रद्धेने जे होईल, ते अभिमानाने, ज्ञानाचे डोळे उघडे ठेवूनही नाही होणार. मूल होऊन भगवंताला ओळखावे. याला अडचण एकच असते; माझे ‘ शहाणपण ’ आड येते. भक्त मुलांसारखे वागतात, म्हणून त्यांचे लाड देव पुरवितो. कुणी असे म्हणतील



की, “ भगवंताची आणि आमची ओळख नाही, तर त्याची आम्ही कशी पूजा करावी ? त्याला ओळखल्याशिवाय मी भजन करणार नाही ” हे म्हणणे वेडेपणाचेच आहे. भगवंताला पुष्कळ मार्गांनी ओळखता येईल. पांडुरंगाकडे जाण्यासाठी काही मार्ग आधी आक्रमणे जरूर आहे. संतांनी अखंड जागृत राहण्याचा मार्ग सांगितला; तो असा की, देहाने प्रपंच करा, पण मन भगवंताच्या ठिकाणी अर्पण करा. मन भगवंताच्या ठिकाणी स्थिर झाल्याशिवाय इतर काहीही करून उपयोग नाही. ध्येय सत्य असल्याखेरीज चित्ताची स्थिरता होत नाही; पण सत्य अशा ध्येयावर अगोदर पूर्ण श्रद्धा पाहिजे. प्रपंचात जशी प्रेमाची गरज आहे तशी परमार्थात श्रद्धा पाहिजे. ‘ देव माझा आहे ’ असे म्हणण्याऐवजी ‘ मी देवाचा आहे ’ असे म्हणावे, म्हणजे श्रद्धा उत्पन्न होते. समुद्राचा तरंग असतो, तरंगाचा समुद्र असतो असे नव्हे. साधनात निश्चितपणा असेल तर त्यात समाधान आहे; म्हणून साधन श्रद्धेने करीत जावे. जशी श्रद्धा तशी फळे. आपण भगवंताच्या स्मरणात निर्धास्त असावे. प्रपंचात कधीच धीर सोडू नये. ज्याप्रमाणे मुंग्यांची राणी जागेवरून हलवली की तिच्यामागे असणाऱ्या हजारो मुंग्या तिच्याबरोबर नाहीशा होतात, त्याप्रमाणे एक देहबुद्धी काढून टाकली, की आपल्या मनात उठणारे हजारो संकल्प नाहीसे होतात. या देहबुद्धीच्या पलीकडे गेल्यावर जे ज्ञान होते त्यालाच आत्मज्ञान म्हणतात. असे आत्मज्ञान झाल्यावर जे पूर्ण समाधान मिळते तेच खरे भगवंताचे दर्शन होय.

१८९. भक्तिमार्ग हा प्रेमाचा मार्ग आहे. प्रपंचाकडचे प्रेम भगवंताकडे वळविले की भक्ति येते.

## संदेहवारण

आधुनिक केसरी

खरं सांगू का वाचक मित्रांनो आज संपूर्ण दिवस गेला विचार करण्यात की समासाला सुरुवात



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

रविवार, ७ जुलै २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ३०२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 7 JULY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-302 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05

# राज्यातील शिक्षकांना मिळणार आता हक्काचे दस्तऐवज

## भाजप शिक्षक आघाडीचे यश : शिक्षण संचालकांचे तडकाफडकी आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**जैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ नियम ९, ११ व १२ तसेच शिक्षण सेवक शासन निर्णय १३/१०/२००० अन्वये सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवेची संबंधित दस्तऐवज मिळण्याचा अधिकार आहे पण अद्यापही या शासन निर्णयाची अंमलबजावणी होताना दिसत नव्हती. या गंभीर विषयाची तात्काळ दखल घेत अनिल महादेवराव शिवणकर, अध्यक्ष, नागपूर विभाग, भाजप शिक्षक आघाडी यांनी मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक पुणे यांना वरील बाब निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिली यावर मा.महेश पालकर, शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक पुणे यांनी तडकाफडकी राज्यातील सर्व सर्व शिक्षण उपसंचालक व सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदनाच्या अनुषंगाने शिक्षकांना त्यांची हक्काची दस्तऐवज मिळवून देण्याचे आदेश दिले. अनेक खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवेशी संबंधित असलेले दस्तऐवज अजूनही संस्था व मुख्याध्यापकांमार्फत दिल्या जात नाही. जसे... प्रथम नियुक्ती आदेश प्रत (१९८१ नियम ९(५)



अनुसूची ड),नियुक्ती आदेश जोडपत्र (ब) (१३/१०/२००० शिक्षकेत्तर व शिक्षण सेवक), प्रथम मान्यता आदेश प्रत. (परिविक्षाधीन कालावधी शिक्षण सेवक, शिक्षकेत्तर सेवक), सेवा सातत्य आदेश प्रत, दुय्यम सेवा पुस्तक, वेतन प्रमाणपत्र, वरिष्ठ, निवड श्रेणी मान्यता आदेश प्रत, पदोन्नती आदेश व मान्यता प्रमाणपत्र प्रत.,भविष्य निर्वाह निधी परतावा ना परतावा आदेशाची प्रत, नॉमिनेशन आदेश प्रत अशाप्रकारे वरील सर्व आदेशांची एक प्रत संस्था व मुख्याध्यापकांमार्फत कर्मचाऱ्यांना देणे बंधनकारक असूनही अनेक कर्मचाऱ्यांकडे वरील दस्तऐवज अद्यापही दिल्या गेलेली नाही, ही बाब शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारी असून त्यांच्या सेवेसी संबंधित हक्काच्या दस्तऐवजापासून त्यांना वंचित ठेवणारी आहे असा युक्तिवाद निवेदनाद्वारे अनिल शिवणकर यांनी केला त्यावर मा. महेश पालकर, शिक्षण संचालक यांनी राज्यातील सर्व शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकाऱ्यांनी वरील दस्तऐवज शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मिळून देण्यासाठी तात्काळ कायदेशीर कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

राज्यातील सर्व शिक्षकांनी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवेशी संबंधित हक्काची सर्व दस्तऐवज मिळविण्यासाठी मुख्याध्यापकांना लेखी अर्ज करावा व दस्तऐवज न दिल्यास शिक्षणाधिकारी व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाला लेखी तक्रार करावी असे आवाहन अनिल शिवणकर यांनी राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना केले. प्रसंगी अनिल शिवणकर, सुधीर अनवाणे, नरेश कामडे, हरीश केवटे, अशोक हजारे जिल्हा संयोजक, प्रदीप बिबटे, शहर संयोजक, मोहन भेलकर, मोनिका वारोटकर, मोहनिष राऊत, ओंकार श्रीखंडे, विशाल चव्हाण, श्रीवंत शेंडे, बंडू कुबडे, कविता वारोकर, विपुल राऊत, छाया मेहेत्रे, विनोद ढोबळे, प्रशांत राऊत, ज्ञानेश्वर उमरे आदी उपस्थित होते.



# श्री क्षेत्र शनिशिंगणापूर देवस्थानातर्फे पायी दिंडी मार्गस्थ

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** श्री क्षेत्र शनीशिंगणापूर देवस्थानच्यातर्फे पायी दिंडी मार्गस्थ झाली. आमदार श्री शंकरराव गडाख पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व श्री भागवत सोपान बानकर सर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच दिंडी प्रमुख श्री सिताराम तुवर सर, श्री सुखदेव मनाळ सर, श्री गणेश बोरुडे, श्री व्ही आर बानकर सर हे आहेत... छत्रपती संभाजी नगरहून श्री शशिकांत कुलकर्णी आणि दैनिक अधुनिक केसरीचे प्रतिनिधी गिरीशजोशी हे देखील दिंडीत सहभागी झालेले आहेत.

# तर 288 पैकी एकही उमेदवार निवडून येऊ देणार नाही : जरांगे

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** एकट्या छगन भुजबळांचे ऐकून तुम्ही जर मराठ्यांवर अन्याय केला तर याद राखा. महाराष्ट्राचे आरक्षण छगन भुजबळांची मक्तेदारी नाही. छगन भुजबळांचे ऐकून जर मराठ्यांवर अन्याय करण्याचा प्रयत्न केला तर 288 पैकी एकही उमेदवार सरकारचा निवडून येऊ देणार नाही, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी हिंगोलीतून शांतता रॅलीला सुरुवात केली आहे. या रॅलीतून त्यांनी जोरदार टीकास्त्र डागले आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आज मन भरून आले आहे. तुमच्या चरणी नतमस्तक होतो. हिंगोलीच्या मराठ्यांनी मराठ्यांची शान राखली आहे. ज्या ज्या वेळी मराठ्यांवर संकट येतील, त्या त्या वेळेस हिंगोली जिल्हा ताकदीने उभा राहील. माझं राज्य सरकारला जाहीर सांगणे आहे की, मराठा समाजाचा हा आक्रोश आहे. मराठा समाज स्वतःच्या न्यायासाठी रस्त्यावर आला. एकट्या छगन भुजबळचे ऐकून तुम्ही जर मराठ्यांवर अन्याय केला तर याद राखा. महाराष्ट्राचे आरक्षण छगन भुजबळांची मक्तेदारी नाही. छगन भुजबळांचे ऐकून जर मराठ्यांवर अन्याय करण्याचा प्रयत्न केला तर 288 पैकी एकही उमेदवार सरकारचा निवडून येऊ देणार नाही. सरकारने आता शहाणपणाची भूमिका घेणे गरजेचे आहे. राज्य सरकारला माझी विनंती आहे की, आक्रोश समजून घ्या. आज कानाकोपऱ्यात भगवे वादळ दिसत आहे. छगन भुजबळचे ऐकून त्रास दिला तर तुम्हाला पुन्हा त्रास होईल, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. ते पुढे म्हणाले की, मला राजकारणात जायचं नाही. मराठ्यांना आरक्षण मिळावे. करोडो मराठा समाजाचे लेकर मोठी झाली पाहिजेत. मराठा कुणबी एकच आहेत. सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या. सरसकट आरक्षण द्यायचं ही जबाबदारी तुमची आहे. सगेसोयरेची अंमलबजावणी करायची आणि टिकवायची जबाबादारी तुमची आहे. माळी समाजाला आरक्षण दिलं. बाकीच्या जाती पोट जाती म्हणून घातल्या. विदर्भातील मराठ्यांचा व्यवसाय शेती आहे. महाराष्ट्रातील मराठ्यांचा व्यवसाय शेती आहे. आमचा व्यवसाय आणि जात एकच आहे. मराठ्यांची पोट जात कुणबी होत नाही का? शाहू महाराजांनी आरक्षण दिलं. पश्चिम महाराष्ट्रातील सगळं मराठा कुणबी आहेत. 57 लाख नोंदी सापडल्याचे लेखी दिलं आहे. त्यांच्या नातेवाईकांना प्रमाणपत्र का देत नाहीत?, असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.




# भांडवलशाही, समाजवाद आणि समतोल



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**समाजवादी विचारधारा ही एक अशी प्रणाली आहे ज्यामध्ये संपत्ती आणि साधनसंपत्तीचे समान वितरण, सामाजिक न्यायआणि सर्वसामान्यांच्या हितासाठी शासनाचा हस्तक्षेप हे मुख्य घटक आहेत. आधुनिक युगात, जिथे भांडवलशाहीने मोठ्या प्रमाणात जागतिक अर्थव्यवस्थेवर वर्चस्व प्रस्थापित केले आहे, समाजवादी विचारांचे महत्त्व कमी होत चालले आहे असे काही लोकांना वाटते. परंतु, आजच्या काळात समाजवादी विचारधारा अत्यंत महत्त्वाची आहे. भांडवलशाही व्यवस्थेतआर्थिक असमानता हा एक मोठा प्रश्न आहे. काही मुठभर लोक प्रचंड संपत्ती मिळवतात, तर बहुसंख्य लोक गरिबीत जीवन जगतात.**



## क्षितिजापल्याड

या परिस्थितीत समाजवादी विचारधारा आर्थिक असमानता कमी करण्याचे काम करते. सरकारच्या हस्तक्षेपाद्वारे संपत्तीचे समान वितरण, सामाजिक कल्याण कार्यक्रम आणि आर्थिक स्थैर्य यांसारख्या धोरणांमुळे गरीब आणि दुर्बल घटकांना सहाय्य मिळते. उदाहरणार्थ, सध्या जगभरात वाढणारी आर्थिक असमानता समाजवादी धोरणांनी कमी करता येऊ शकते.
समाजवादी विचारधारा सामाजिक न्यायाला प्रोत्साहन देते. जात, धर्म, लिंग, वय इत्यादी कोणत्याही प्रकारच्या भेदभावाविरुद्ध समाजवादी विचारधारा संघर्ष करते. प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळावी, शिक्षण, आरोग्यसेवा आणि रोजगाराच्या बाबतीत कोणताही भेदभाव होऊ नये, हे समाजवादी विचारधारेचे मुख्य उद्दिष्ट आहे. समुदायाचे हक्क, स्त्रियांना समान वेतन आणि अल्पसंख्याकांच्या हक्कांसाठी समाजवादी विचारधारा महत्त्वपूर्णभूमिका बजावते.समाजवादी विचारधारेचे एक प्रमुख तत्त्वम्हणजे सार्वजनिक सेवांचे महत्त्व. आरोग्यसेवा, शिक्षण, सार्वजनिक वाहतूकआणि इतर मूलभूत सेवांमध्ये सरकारी हस्तक्षेप आवश्यक आहे. यामुळे सर्वसामान्यांना दर्जेदार सेवा मिळवणे शक्य होते. सर्व नागरिकांना मोफत आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून दिल्यामुळे लोकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होते.भांडवलशाहीत, नफ्याच्या मागे लागून पर्यावरणीय संकट वाढत आहे. समाजवादी विचारधारा पर्यावरणीय शाश्वततेला प्रोत्साहन देते. नैसर्गिक साधनसंपत्तीचा विवेकबुद्धीने वापर, पुनरुत्पादनक्षम ऊर्जा स्त्रोतांचा विकासआणि पर्यावरण संरक्षणाच्या उपाययोजना समाजवादी धोरणांतर्गत येतात. उदाहरणार्थ, स्कॅन्डिनेव्हियाई देशांनी पर्यावरणीय शाश्वततेसाठी समाजवादी धोरणे अंगीकारून प्रदूषण आणि पर्यावरणीय संकटांचा सामना करण्याचे प्रयत्न केले आहेत.
समाजवादीविचारधारामूलतःभौतिकवादीआणिवैज्ञानिकदृष्टिकोनस्वीकारते.कार्लमार्क्सआणिफ्रेडरिकएंगेल्सयांसारख्यासमाजवादीविचारवंतांनीधर्मालाएक'अफू'मानलेआहे.त्यांच्यामते,धर्महालोकांनात्यांच्या परिस्थितीबद्दल सुसंवाद साधण्यासाठी आणि परिस्थितीचा प्रतिकार न करता सहन करण्यासाठी एकसाधन आहे. धर्मामुळे लोकांचे लक्ष त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीकडेनजाता धार्मिकविधींमध्येआणिआस्तिकतेमध्येअडकून राहते. धर्मसमाजातील लोकांना एकत्रबांधतो, त्यांना मानसिक आधार देतो आणि त्यांच्या जीवनातील अडचणींना सामोरे जाण्याची प्रेरणा देतो. धर्माच्या माध्यमातून लोकांचे नैतिक मूल्ये, संस्कार आणि सामाजिक नियम ठरवले जातात. त्यामुळे धर्म हा समाजाचाएकअविभाज्यभागबनलाआहे. समाजवादी विचारधारा आणि धर्म यांच्यातील संघर्ष हे एकऐतिहासिक वास्तव आहे. समाजवादाच्याकाही प्रमुख धोरणांमध्ये धर्माची भूमिका कमी करणेकिंवा धर्मनिरपेक्षता अंगीकारणे हे महत्त्वाचे आहे. यामुळे धार्मिक श्रद्धा असलेल्या समाजांत समाजवादाचा प्रसार होण्यात अडथळे आले आहेत.समाजवादी विचारधारा रोजगार सुरक्षेला प्राधान्य देते. भांडवलशाहीत बेरोजगारी ही एक मोठी समस्या आहे. परंतु, समाजवादी धोरणे रोजगार सुरक्षा आणि श्रमिकांच्या हक्कांचे संरक्षण करते. किमान वेतन कायदे, कामाच्या तासांची मर्यादा, सुरक्षित कामाचे वातावरणआणि श्रमिक संघटनांचा हक्क समाजवादी विचारधारेतून आलेले आहेत. यामुळे श्रमिकांना योग्य वेतन आणि कामाचे चांगले वातावरण मिळते.समाजवादी विचारधारा आर्थिक स्थैर्य आणि न्याय्यतेला प्रोत्साहन देते. वित्तीय संकटे आणि आर्थिक मंदीच्या काळात समाजवादी धोरणे आर्थिक स्थैर्य प्रदान करतात. सरकारी हस्तक्षेपाद्वारे अर्थव्यवस्था नियंत्रित करून वित्तीय स्थैर्य साधता येते. उदाहरणार्थ, २००८ च्या आर्थिक मंदीत अनेक देशांनी समाजवादी धोरणे वापरून आर्थिक स्थैर्य साधले होते. भांडवलशाही व्यवस्थेने मोठ्या प्रमाणात आर्थिक वाढ आणि संपत्ती निर्माण केली आहे. उत्पादकता वाढवून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जीवनमान सुधारण्यास मदत केली. त्यामुळे लोकसंख्येचा मोठा भाग भांडवलशाहीकडे आकर्षित झाला आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्था नवीन बाजारपेठा तयार करून रोजगार निर्मिती करते. व्यापार आणि व्यवसायाच्या संधींमुळे लोकांना आर्थिक स्थैर्य मिळवण्यासाठी मार्ग उपलब्ध होतात. भांडवलशाहीमध्ये तंत्रज्ञान आणि नवोपक्रमांना प्रोत्साहन दिले जाते. उद्यमशीलता आणि नवकल्पनांच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेची क्षमता वाढवली जाते. समाजवादात केंद्रित नियंत्रणामुळे आर्थिक कार्यक्षमतेत अडथळा निर्माण होतो. व्यावसायिक निर्णय घेताना शासकीय हस्तक्षेपामुळे अर्थव्यवस्था मंदावते. समाजवादातील संपत्तीचे समान वितरणामुळे लोकांमध्ये काम करण्याची प्रेरणा कमी होते. मेहनतीच्या तुलनेत फळ कमी मिळाल्याने काम करण्याचा उत्साह कमी होतो. भविष्यातील परिणामाच्यादृष्टीने देखील विचार करणेगरजेचे आहे. भांडवलशाहीमुळे आर्थिक असमानता वाढते. काही लोक प्रचंड संपत्ती मिळवतात तर बहुसंख्य लोक आर्थिक दृष्ट्या दुर्बल राहतात. यामुळे सामाजिक असंतोष वाढण्याची शक्यता आहे.



मोठ्या कंपन्या आणि कॉर्पोरेशन्स संपत्तीचे केंद्रीकरण करतात. ज्यामुळे लहान व्यवसाय आणि स्थानिक उद्योगांना नुकसान होते. यामुळे रोजगाराच्या संधी कमी होऊ शकतात. भांडवलशाहीच्या तात्कालिक नफ्याच्या मागे लागून दीर्घकालीन पर्यावरणीय नुकसान होऊ शकते. नैसर्गिक साधनसंपत्तीचा अव्यवस्थित उपभोग आणि प्रदूषणामुळे भविष्यात पर्यावरणीय संकटाचा सामना करावा लागू शकतो. भांडवलशाही व्यवस्थेत आर्थिक असुरक्षेचे प्रमाण जास्त असते. मंदी, बेकारी आणि वित्तीय संकटे यामुळे समाजातील कमजोर घटकांना त्रास होऊ शकतो.
समतोल साधण्याचे उपाय शोधले पाहिजेत. बाजारपेठेतील असमानता कमी करण्यासाठी नवीन आर्थिक मॉडेल्सचा विचार करणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ मिश्र अर्थव्यवस्था,ज्यामध्ये सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्र एकत्र काम करून आर्थिक विकासाला गती देतात. भांडवलशाहीतल्या तोट्यांचा परिणाम कमी करण्यासाठी सामाजिक सुरक्षा जाळे निर्माण करणे आवश्यक आहे. बेरोजगारी भत्ता, आरोग्य सेवाआणि शिक्षण यासारख्या मूलभूत गरजांसाठी सरकारकडून पुरेशा निधीची व्यवस्था केली पाहिजे. पर्यावरणीय समस्या आणि आर्थिक विकास यांच्यातील समतोल साधण्यासाठी शाश्वत विकासाचे ध्येय ठेवणे गरजेचे आहे. उद्योग आणि व्यवसायांनी त्यांच्या धोरणांमध्ये पर्यावरणीय जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. भांडवलशाहीत श्रमिकांचे हक्क आणि अधिकार संरक्षित करणे महत्त्वाचे आहे. न्याय्य वेतन, सुरक्षित कामाचे वातावरणआणि संघटनेचा हक्क यांची खात्री केली पाहिजे. अर्थव्यवस्थेच्या बदलत्या गरजांसाठी शिक्षण प्रणालीत सुधारणा करणे आवश्यक आहे. लोकांना नवीन कौशल्ये शिकवून त्यांना रोजगारासाठी तयार करणे महत्त्वाचे आहे. नॉर्वे, स्वीडन आणि डॅन्मार्क सारख्या देशांनी मिश्र अर्थव्यवस्था अंगीकारून सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक विकासाचा समतोल साधला आहे. या देशांमध्ये खाजगी व्यवसायाच्या जोडीला सामाजिक सेवांना प्राधान्य दिले जाते. अमेरिकेत ग्रीन न्यू डीलसारख्या योजनांच्या माध्यमातून पर्यावरणीय शाश्वतता आणि आर्थिक विकासाचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळे पर्यावरणीय संकटांचा सामना करताना आर्थिक विकास साधता येतो.
सार्वजनिक खाजगी भागीदारी मॉडेलद्वारे सरकार आणि खाजगी क्षेत्र एकत्र येऊन पायाभूत सुविधा आणि सेवांच्या पुरवठ्याला गती देऊ शकतात. यामुळे दोन्ही क्षेत्रांच्या लाभांचा फायदा होतो. भांडवलशाही आणि समाजवाद या दोन परस्परविरोधी विचारधारांमधील संघर्ष ही एक ऐतिहासिक प्रक्रिया आहे. भांडवलशाहीच्या वाढत्या प्रभावामुळे समाजवादी विचारधारा कमजोर होत आहे, पण त्याचे भविष्यातील परिणाम गंभीर ठरू शकतात. आर्थिक असमानता, पर्यावरणीय संकटेआणि सामाजिक असंतोष या समस्यांचा सामना करण्यासाठी नवीन उपाययोजना करणे गरजेचे आहे. समतोल साधणारी आर्थिक धोरणे, शाश्वत विकासाचे ध्येयआणि सामाजिक न्याय यांचा विचार करूनच भांडवलशाही आणि समाजवाद यांच्यातील ताण कमी करता येऊ शकतो. यामुळे एक संतुलित आणि न्याय्य समाज निर्माण होण्यास मदत होईल. आजच्याकाळातसमाजवादीविचारधारा अत्यंतमहत्त्वाचीआहे. आर्थिक असमानता कमी करणे, सामाजिकन्यायसाधणे, सार्वजनिक सेवांचे महत्त्व अधोरेखित करणे, पर्यावरणीयशाश्वतता, बेरोजगारी आणि रोजगार सुरक्षा, आर्थिक स्थैर्ययांसारख्या मुद्द्यांवरसमाजवादी विचारधारेची भूमिका अनिवार्य आहे. समाजवादी विचारधारा भांडवलशाहीच्या तोट्यांचा सामना करून एकसमतोल आणिन्याय्यसमाजनिर्माणकरण्यासाठीमदतकरते. त्यामुळे, आधुनिक युगात समाजवादी विचारधारेचे महत्त्ववाढतच आहे आणि ते समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि.जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# सांस्कृतिक अतिक्रमणाचा वाढता प्रादुर्भाव कुटुंबसंस्थेसाठी घातक



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सांस्कृतीक अतिक्रमण दिवसेंदिवस वाढत चाललं आहे आणि हे अतिक्रमण रोखण्यासाठी आपण कुठेतरी कमी पडतोय.तंत्रज्ञान युगातील प्रगती अगदी कौतुकास्पद आहे.गृह तारे यांचा शोध घेणारा मानव खरया अर्थाने माणुसकीचा वेध घेण्यात मात्र स्पेशल अपयशी ठरतो आहे.सध्याच युग हे विज्ञान तंत्रज्ञान युग म्हणून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे.हि कौतुकास्पद अभिनंदनीय बाब आहे. अगदी प्रत्येकाला कौतुक वाटेल या वेगाने आपली प्रगती होत असताना या प्रगतीला गालबोट पण खूप वेगाने लागताना दिसत आहे. दिवसेंदिवस नात्यांतील विभक्ती करणं झपाट्याने वाढत आहे हे अगदी सत्य असुन सामाजिक दृष्ट्या हि अधोगती आहे.अस म्हटलं तरी अयोग्य होणार नाही. प्रत्येक व्यक्ती किंवा जीव हा स्वतंत्र अस्तित्व म्हणून जन्माला येत असतो.**

म्हणून नैसर्गिक दृष्ट्या कोणीही कोणावर जबरदस्ती अथावा अन्याय करू शकत नाही.जीवन जगण्याचा अधिकार हा प्रत्येकाला आहे.परंतु हे जीवन जगत असताना नैसर्गिक धर्म पालन झाले पाहिजे. नैसर्गिक धर्मात कुटुंब हि संकल्पना समाविष्ट होते.कुटुंब या संज्ञेला शक्य तेवढा तडा न जाऊ देता प्रत्येकाने आपल्या स्वातंत्र्याचा योग्य वापर करून जीवन व्यतित केले पाहिजे . जेणेकरून आपल्याकडून इतरांना त्रास होणार नाही.तसेच आपल्या अधिकारावर अतिक्रमण हि होणार नाही याची परिपुर्ण दक्षता घेतली गेली तर नात्यांतील विभक्ती करणं न होता प्रत्येकाला आप आपल्या विवेकानुसार जीवन जगण्यात अडचण निर्माण होणार नाही.व कुटुंब हि संकल्पना मजबुत होईल.कुटुंब हि संकल्पना तशी विस्तृत असते.अगदी पंचवीस तीस वर्षे अगोदरच पाहिलं तर कुटुंब म्हणजे अगदी चुलते चुलती आजी आजोबा सख्खे भाऊ चुलत भाऊ असा विस्तृत दांडगा समुदाय म्हणजे कुटुंब असायचं. तरी देखील खुप आपुलकी प्रेम जिव्हाळा असायचा तो वरकरणी नाही. अंतःकरणातुन असायचा आणि तो अगदी कृतीतून दिसायचा. पण सध्या कुटुंब म्हणजे फक्त पती पत्नी आणि मुलं इथपर्यंत आलंय अलिकडच्या काळात तर आई वडील पण या संकल्पनेतून बाहेर पडले.फक्त पती पत्नी म्हणजे कुटुंब झालं.आणि खरी गंमत इथंच आहे.पती पत्नी एवढं लहान कुटुंब होऊन सुद्धा यांच्या मध्ये वारंवार वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने मतभेद निर्माण होत आहेत. आणि याचा शेवट विभक्ती करणात होत आहे.मग नेमकं हे सगळं काय चाललंय.आणि हे कुठपर्यंत जाऊन थांबणार आहे. आणि मग सगळ्याला नेमकं जबाबदार कोण आहे. सध्याच्या युगातील होणा-या घडामोडी वर चिंतन मंथन करण क्रमप्राप्त आहे.सगळयात विचित्र बाब तर हि आहे कि पती,पत्नी आई-वडील यांच्या पासुन मुलं तसेच अनेक जीवाला जीव देणारे मित्र हे सगळे कसे क्षणार्धात विभक्त होत आहेत.हे सध्या च्या युगातील सगळ्यात विदारक चित्र आहे.याला कारणीभूत नेमकं कोण आहे. याचे समजिक परिणाम आणि त्यावरील उपाययोजना भविष्यातील समाज व्यवस्था टिकण्यासाठी आवश्यक आहेत.मोह,माय,लोभ वृत्ती या अवगुणांचा वाढता प्रभाव तसेच , भौतिक संसाधन यांचं वाढत महत्व दिवसेंदिवस ढळत चालेली नितिमता ,संयमाचा अभाव ,अफाट वेगाने ,वाढत असलेला अंहकार आणि दुर्बल होत चाललेले धर्म संस्कार दुरदृष्टी चा अभाव या सगळ्या बाबी मुळे कोणाचेही महत्व कोणाच्या लेखी राहिलेल नाही.मी स्वतः योग्य आहे बरोबर आहे.आणि मला खूप ज्ञान आहे मी एकटाच खुप हुशार चाणक्ष आहे.या आविर्भावात होत असलेल आचरण आणि छोट्या छोट्या गोष्टी मुळे होणारे मनभेद त्यातुनच उचल जाणार टोकच पाऊल. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे लहान होण्यासाठी किंवा दोन पावलं मागे येण्यासाठी कोणीही तयार नाही.मग मार्ग कसा निघणार.आणि मग शेवटी त्याची परिणिती हि विभक्त करणात होणारच.हे वास्तविक सत्य आहे.निसर्गाने दिलेल जीवन शांततामय मार्गाने जगण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे.समाज व्यवस्था बंधनं ह्या बाबी पेक्षा नैसर्गिक न्याय हा खुप महत्वाचा आहे.ज्ञान वृध्दींगत होऊन प्रत्येक व्यक्तीला संयमित होण्याची आवश्यकता आहे . स्वतः हुन कोणीही कोणाच्याही नैसर्गिक अधिकारांवर गददा आणता कामा नये.आणि नैसर्गिक न्याय स्वातंत्र्य वापरताना सद्सद विवेक बुद्धी जागृत असली पाहिजे.जेणेकरून आपलं स्वातंत्र्य हे इतरांना त्रासदायक होणार नाही . प्रत्येकाने आपल्या आचरणात खुप लवचिकता हि दैनंदिनी जीवनात कृतीतून दाखवली पाहिजे. स्वार्थचा लवलेशही नसला पाहिजे.कुठल्याही नातेसंबंधां मध्ये स्वार्थाने प्रवेश केला.कि नातं संपुष्टात आलं म्हणून समजा.म्हणून नातेसंबंध कोणतेही असु द्या त्यामध्ये प्रचंड विश्वास,असला पाहिजे. परोपकार, निष्ठा,प्रमाणिकता जोपासली पाहिजे , समजुतदार वृत्ती,संयम आवश्यक आहे आणि अहंकार तुलनात्मक अभ्यास, करण्याची वृत्ती,नसली पाहिजे.आपल्या सहकाऱ्याचा एखाद्या निर्णय आपल्यला आवडला नाही योग्य वाटला किंवा तो आपल्या मनाविरुद्ध आहे किंवा आपल्यावर अन्यायकारक आहे असं आपल्याला वाटत असेल तर मग अशा वेळी आपण आपल्या ज्ञानावरून लोकशाही पद्धतीने आपलं मत त्या व्यक्तीला सांगु शकतो.त्यासाठी टोकाचा निर्णय भुमिका घेण्याची आवश्यकता अजिबात नाही.कारण जीवनात वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने अनेक असे नातेसंबंध निर्माण होत असतात. मग यापैकी किती नातेसंबंध शेवटच्या श्वासापर्यंत टिकतात तर अगदी नगण्य कारण कुठलेही नातेसंबंध हे ज्ञानावर आधारित असले पाहिजे.आणि नातेसंबंध हे जर ज्ञानावर आधारित असतील तर मतभेद होतील.परंतु कटुता निर्माण होऊन मनभेद निर्माण होणार नाहीत.आणि विभक्ती करणही होणार नाही.म्हणूनच नातेसंबंधात भावनिकतेपेक्षा ज्ञानला खुप महत्व आहे.ज्ञान हे नातेसंबंध टिकण्याचा आधारस्तंभ आहे.म्हणून ज्ञानावर आधारित कोणतेही नातेसंबंध कधीच खंडीत होऊ शकत नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# संविधान पूजनीय नाही तर आचरणीय ग्रंथ




प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या खासदारांची संख्या खूप कमी म्हणजे चारशे पार करता आली नसल्याने संविधान ग्रंथ कपाळाला लावला. कपाळाला यासाठी लावला की , प्रचारात भाजपा निवडणूकीत जिंकले की, संविधान बदलणार आहेत. संविधान वाचवायचे असेल तर त्यांना मत देऊ नका असा विरोधकांनी प्रचार केला होता. त्यामुळेच त्यांना लोकसभेच्या कमी जागा मिळाल्या आहेत.असे भाजपावाल्यांना वाटत आहे. म्हणून देशाचे प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी संविधान आपल्या कपाळाला लावून, संविधानापुढे नतमस्तक होऊन मी म्हणजे आम्ही संविधानाला किती मानतो, संविधानाचा किती आदर करतो हा सांगण्याचा केविलवाणी प्रयत्न केला आहे.**

खरे तर संविधान हा ग्रंथ कपाळाला लावायचा नाही किंवा त्याच्या पाया पडायचा ग्रंथ नाही. त्याची पूजा करायचा तर अजिबातच ग्रंथ नाही तर त्या ग्रंथातील नियमाप्रमाणे म्हणजे कलमाप्रमाणे आपला देश चालवायचा आहे. म्हणजेच भारतीय संविधान हे आचरणीय आहे. त्या भारतीय संविधानातील कलमानुसार प्रशासकीय कामकाज करणे, त्यानुसार सर्वांना वागायला भाग पाडणे हे महत्त्वाचे आहे. भारतीय संविधानानुसार देशातील जनतेला सुखी ठेवायचे आहे, भारतीय संविधानानुसार देशातील जनतेचे संरक्षण करायचे आहे, भारतीय संविधानानुसार देशातील जनतेला शिक्षण, आरोग्य,पाणी,नोकरी या सुविधा देऊन त्यांचे कल्याण साधायचे आहे, भारतीय संविधानानुसार स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायाचे पालन करून देशातील जनतेला एकात्मतेच्या धाग्यात गुंफावयाचे आहे, भारतीय संविधानानुसार देश चालवायचा असतो, भारतीय संविधानानुसार धर्मनिरपेक्षतेचे व वैज्ञानिकतेचे तत्व समाजात रूजवायचे असते. ह्या साऱ्या गोष्टी मात्र भारताचे प्रधानमंत्री विसरलेल्या दिसतात किंवा त्यांच्या सत्ताधाऱ्याकडून होताना दिसत नाहीत. भारतीय संविधानानुसार देश चालताना दिसत नाही. लोकांना न्याय मिळत नाही. उलट लोकांची दिशाभूल करून त्यांच्या मानेवर अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, धर्मांधता, जातीयता, विषमता यांचे ओझे आपल्या कृतीतून टाकले आहे. याविषयी प्रमोद मुनघाटे दै.लोकसत्ताच्या लेखात म्हणतात की, " महाराष्ट्रातील विद्यापीठांत अलीकडे 'प्राचीन भारतीय विज्ञानांचे' शिक्षण देण्याची मोहीमच सुरू झाली आहे. २०२० च्या नवीन शैक्षणिक धोरणात 'भारतीय ज्ञान परंपरे'चे शिक्षण व संशोधन करण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार 'पारंपरिक शास्त्र' आणि 'प्राचीन विद्या' यांचे अभ्यासक्रम तयार करून ते राबवविले जात आहेत. माजी कुलगुरू डॉ. वसंत शिंदे हे 'सल्लागार' असलेल्या पुण्यातील एका उच्च शिक्षणसंस्थेत 'पुष्पक विमानविद्या' शिकविली जाते, मुंबई विद्यापीठाने 'मंदिर व्यवस्थापन' शिकवणे सुरू केले आहे. रामटेकच्या कालिदास संस्कृत विद्यापीठात 'फलज्योतिष्या'चा अभ्यासक्रम राबविला जातो. तर नागपूर विद्यापीठाने अलीकडेच हिंदू धर्म-संस्कृतीचे धडे देण्यासाठी एका धार्मिक संस्थेशी करार केला आहे. धोरणात तरतूद असलेल्या 'भारतीय ज्ञान परंपरे'चा नेमका उद्देश कोणता होता आणि जगातील कोणत्याही विद्यापीठांच्या अभ्यासक्रमाच्या कक्षेत येत नसलेले तथाकथित 'शास्त्र' आणि 'विद्या' भारतीय विद्यापीठांत शिकविण्यामागे नेमका उद्देश कोणता असे गंभीर प्रश्न निर्माण होतात. वस्तुतः विद्यापीठ हे संशोधनाचे आणि ज्ञान निर्मितीचे केंद्र असते. त्यामुळे तिथे कोणताही विषय वर्ज्य असू शकत नाही. पण शास्त्रकाट्याच्या कसोटीवर पूर्वीच निरर्थक ठरलेल्या अशास्त्रीय विषयांना छद्मा-विज्ञानाच्या स्वरूपात पुनरुज्जीवित का केले जात आहे? आणि एकाच सांस्कृतिक व धार्मिक परिघातील प्राचीन परंपरा व कर्मकांडांचे प्रशिक्षण देण्याचे 'आदेश' जेव्हा विद्यापीठांना देण्यात येतात, तेव्हा संशय निर्माण होतो."( दै. लोकसत्ता २ जुलै २०२४ ) हे अशा पध्दतीनं संविधानाला मान्य नाही. हे कृत्य संविधान विरोधी आहे. याच अशा अनेक गोष्टींचा प्रधानमंत्री यांनी गाजावाजा केला. असंविधानिक मूल्य समाजात रुजविले. मानवी कल्याणाच्या सगळ्या गोष्टी बाजूला फेकून दिल्या नव्हे गुंडाळून टाकल्या. भारतीय प्रधानमंत्री यांनी हीच परंपरा विविध राज्यात राबवायला सुरुवात केली. विविध राज्यानेही अगदी तशाच पद्धतीने सत्तेचा दुरुपयोग करून भारतीय संविधानाची मोडतोड करून सर्वसामान्य माणसांवर विविध गोष्टीतून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. नको त्या गोष्टींना खतपाणी घालण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे देशातील जनता कदरली होती. दहशतीत जीवन जगत होती. अनेकांना बेघर केले होते. अनेकांच्या नोकऱ्या गेल्या होत्या. अनेकांचे रोजगार हिरावून घेतले होते. नोकऱ्यात विविध प्रकारचे बदल घडवुन आणून वेगवेगळे जीआर काढून नोकरदाराचेही कंबरडे पार मोडून काढले होते. त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले होते आणि अजुनही करत आहेत.म्हणजेच देशातील व विविध राज्यातील जनता, शेतकरी, सामान्य माणूस, महिला, बेरोजगार, उद्योजक त्रस्त झाले होते.परीक्षातील घोटाळे, नोकरीतील घोटाळे अशा अनेक चुकीच्या गोष्टी व सरकारच्या चुकीच्या निर्णयाची झळ सर्वांनाच बसली होती. विविध शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार,अमली पदार्थांच्या विळख्यात अडकलेला तरूण, आरक्षणाचे मुद्दे, जाती-जातीत भांडणे लावण्याचे कटकारस्थान, जुनी पेन्शन योजना नाकारणे या साऱ्या गोष्टींना जनता फार कंटाळली होती.हे सरकार बदलून टाकले पाहिजे म्हणूनच त्यांनी आपल्या हातात असणाऱ्या लोकशाहीचा हक्क बजावला आणि हे होत्याचे नव्हते ते करून दाखवले. आपल्या देशात विविध जातीची, विविध धर्माची माणसे राहतात. पण तरीही आपण फक्त आणि फक्त हिंदुत्व, हिंदुत्व घेऊन इतर धर्मीयांची हेटाळणी केली, त्यांना तुच्छ लेखले, त्यांच्याबाबत भेदभाव केला आणि भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्ष तत्व पायदळी तुडविले. एकाच धर्माचा उदो उदो करून इतरांच्या जीवनावर हल्ला चढवला हे कितपत योग्य आहे. आपले पद हे संविधानिक आहे हे मात्र विसरून गेलात. डॉ . अनंत राऊत म्हणतात की," संविधानामागच्या तात्विक भूमिकेने पुराणातील अदभुततावाद, पारलौकिकतावाद आणि पोकळ कल्पनाविलास नाकारलेला आहे आणि अनुभवजन्य अशी वास्तवाधिष्ठित तात्विक भूमिका स्वीकारलेली आहे. म्हणूनच संविधानामागील तात्विक भूमिकेत ईश्वर कल्पनेला, अवतारवादाला, पुनर्जन्म सिद्धांताला, दैवनशीबवादाला, नियतीवादाला व स्वर्ग नरकादी कल्पनांना कोणतेही स्थान नाही. संविधानामागील तात्विक भूमिका ही आध्यात्मिक, पारलौकिक नाही तर ती पूर्णपणे ऐहिक स्वरूपाची आहे. माणसांचे जन्मापासून मृत्यूपर्यंतचे जीवन मूल्यात्म, नैतिक, सुखी व संपन्न बनविणारी तात्विक भूमिका आपल्या संविधानाने घेतलेली आहे ".( भारतीयांचा पवित्रा आचार ग्रंथ भारताचे संविधान- डॉ . अनंत राऊत पृ.२२ ) हीच महत्वपूर्ण भूमिका आपल्या देशाचे प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी व त्यांचे मंत्रीमंडळ विसरलेले होते.हे आपण त्यांच्या संसद उद्घाटन, संसदेतील सेंगोल प्रकरण ,राममंदिर कार्यक्रम, महाराष्ट्रात सरकार स्थापन करताना सत्यनारायण पूजा घालणे, देशातील विविध राज्यात सत्तेसाठी पक्ष फोडून अनैतिक वर्तन करणे,अनु.जाती जमातींना निधी न देणे ,खाजगी विद्यापीठ आरक्षण काढून टाकणे या अशा अनेक नानाविध गोष्टीवरून दिसून आली आहे. ती भूमिका सर्वांना सुखी करणारी नव्हती. विषमता निर्माण करणारी होती आणि आहे. भारतीय संविधानात १४ ते १८ या अनुछेदाच्याद्वारे दिलेला समानतेचा हक्क या देशातील सर्व प्रकारची विषमता पूर्णपणे नष्ट करून देशांमध्ये सर्व माणसात समता प्रस्थापित करणारे आहे. हे कायद्यापुढे सर्व समान ह्या तत्वाला विविध राज्यातील सरकारने तिलांजली दिली नाही का? मणिपूर मध्ये घडलेली घटना, अनेक गावागावात दलितांना मंदिरात जाण्यावरून केलेली मारहाण, गावागावात जातीमुळे टाकलेले बहिष्कार,नोकरीत न भरलेल्या जागा, पदोन्नतीत केलेली विषमता, शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या, खून, बलात्कार, मारामाऱ्या, महागाई ,स्त्रियावरील अन्याय अत्याचार, दिल्लीतील जंतरमंतर वर जाळलेले संविधान, शाळेचे खाजगीकरण, आरक्षणावरून जाती-जातीत भांडणे, निधी व्यवस्थित न राबविणे व न खर्च करणे, अभ्यासक्रमातून चातुर्वर्ण्यव्यवस्था आणणे यासारख्या अनेक गोष्टी आपल्या सरकारच्या काळात घडल्या नव्हे तर घडवून आणल्या. ह्या सर्व गोष्टी संविधानाच्या विरोधात नाहीत का? कोणतेही सरकार हे जनतेचे मायबाप असते. मायबाप आपल्या मुलांना समतेने वागवण्याचा प्रयत्न करतात. तीच भूमिका सरकारची असायला हवी पण आपले सरकार प्रचंड प्रचंड विषमतेने वागत आहे. हे वरील गोष्टीवरून दिसून येते. मग आपण कसे काय म्हणता की, संविधान बदलणार आहेत असा खोटा प्रचार केला. संविधानाची प्रचंड मोठ्या प्रमाणावर मोडतोड करून, भारतीय जनतेची हेळसांड करून आपलेच घोडे दामटले तरीही आपण नाही म्हणता. म्हणून देशात किंवा राज्या राज्यात कोणाचेही किंवा कोणत्याही पक्षाचे सरकार असो त्या सरकारने सर्व जाती धर्मातील माणसांना सोबत घेऊन मानवी कल्याणाचे कार्य करणे म्हणजे भारतीय संविधानाप्रमाणे कार्य करणे, आचरण गरजेचे आहे. संविधानाच्या आचरणाविषयी डॉ.अनंत राऊत म्हणतात की, "संविधानाचे आचरण करणे म्हणजे आपल्यातील घातक उपद्रवशीलता नष्ट करून आपल्या मनाला उपक्रमशीलतेची व उपकारकतेची सवय लावणे, सत्याने वागणे, असत्याला नाकारणे, कुणीही कुणाचे शोषण न करणे, भ्रष्टाचार न करणे, संविधानानुसार आचरण करणे म्हणजे न्यायाने वागणे, स्वतः कुणावर अन्याय न करणे व समाजात कुणाकडूनही कुणावरही अन्याय होणार नाही यासाठी सतत जागरूक राहणे. संविधान आचरण म्हणजे राष्ट्रनिष्ठ बनणे, ध्येयवादी बनणे, मूल्यात्मक बनणे, नैतिक बनणे, क्रियाशील बनणे, बुद्धिवादी, विज्ञानवादी व समतावादी बनणे. संविधानाचे आचरण करणे म्हणजे भारतीयाने भारतीयांचा आदर करणे. माणूस म्हणून माणसाचा आदर करणे, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करणे, त्यातून सुचित होणाऱ्या मूल्यांचे पालन करणे. आपल्या राष्ट्रीय नेत्यांचा व त्यांच्या विचारांचा आदर करणे, भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता वृध्दिंगत करण्यासाठी झटत राहणे. देशाच्या संरक्षणासाठी व समाजसेवेसाठी सिद्ध राहणे, धर्म, भाषा, प्रांत व वर्ग भेदांच्या कुंपणांना ओलांडून बाहेर पडणे, स्त्री पुरुष विषमतेला नष्ट करून स्त्री वर्गाची उचित प्रतिष्ठा राखणे." ( भारतीयांचा पवित्र आचारग्रंथः भारताचे संविधान- डॉ . अनंत राऊत पृ.१५ ) हीच अशा विविध बाबीतून आपण सविधानाची अंमलबजावणी करायला हवी तरच राष्ट्र, देश,समाज यांची प्रगती होईल. वरील सर्व गोष्टी संविधानानुसार राज्यकर्ते, लोकप्रतिनिधी, अधिकाऱ्याकडून, शासकीय कर्मचाऱ्याकडून बहुतांशी होताना दिसत नाहीत. संविधान कपाळाला लावणे म्हणजे एक प्रकारची ती अंधश्रद्धा आहे. ती अंधश्रद्धा भारतीय समाज मनात न रुजवता प्रत्येकाने संविधानाचे आचरण करून संविधानाची कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. त्यामध्येच देशहीत, राष्ट्रहीत, समाजहित आणि मानवहीत आहे म्हणजेच संविधान पूजनीय नाही तर आचरणीय ग्रंथ आहे.




# नाच गं घुमाच्या निमित्ताने...



प्रा. माया सूर्यकांत मुळे
9423342097

आधुनिक केसरी

**आपल्या पारंपारिक खेळातल हे गाणं आजही किती समर्पक ठरत आहे. सिनेमा जरी हल्ली प्रदर्शित झाला असला तरी नाचणारी घुमा; मूळ विषय अगदी जुनाच आहे नव्हे घुमाचा परिघ दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. तिला करावी लागणारी कसरत, तिची होणारी तारांबळ, धावपळ खूप वाढते आहे. काळाच्या ओघात बदलेली कुटुंबव्यवस्था; एकत्र कुटुंबाचे हळूहळू झालेले विभक्तीकरण परिणामी खालावलेली आर्थिक सुबत्ता, स्थावर आणि जंगम मालमत्तेचे पूर्वापार चालत आलेले स्वरूप आता विभागले गेल्याने; त्याची तुकड्यांमध्ये झालेली विभागणी आणि नव्याने उभी राहिलेली आर्थिक आव्हाने.**

दैनंदिन जीवनातील खर्च, राहणीमानातील बदल, शैक्षणिक खर्च, वैद्यकीय खर्च; अकस्मात उदभवणाऱ्या वैद्यकीय गरजा, कौटुंबिक जबाबदाऱ्या, तसेच सरकारी नोकऱ्यांचे कमी होत जाणारे प्रमाण आणि पर्यायाने एकूणच रोजच्या जिवनाबद्दलची असुरक्षितता या आणि अशा अनेक कारणांमुळे घुमे चे नाचणे, अधिकाधिक कठीण होत आहे. तिच्या समोरची आव्हाने विस्तारताना दिसून येत आहेत. पूर्वी घर सांभाळणे, घरातली कामे आणि सर्व सदस्यांची सेवा- शुश्रुषा, रीती- भाती, सण- वार आणि रानातली कामे एवढाच परिघ होता. आता बदलत्या काळानुसार तिला कुटुंबाची आर्थिक जबाबदारी देखील स्वीकारून पार पाडावी लागत आहे. नव्हे ती स्वीकारणे क्रमप्राप्त आहे. कारण दोघांनी मिळून केलं तरचं सर्व आर्थिक गणितं जुळून येत आहेत नाहीतर कुणा एकाचीच फरफट होतांना दिसते. तसेच पुढचा मुद्दा म्हणजे भविष्याची आर्थिक सुरक्षितता नाही. जर काही आकस्मिक वैद्यकीय गरजा उदभवल्या, अपघात घडला तर याची कोणतीच हमी नाही की, कुटुंब कसे चालवणार? एकटीने कुटुंबाची जबाबदारी कशी पेलणार? यासाठी तिला स्वतः ला आर्थिक स्वावलंबी होणे या काळात अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी नोकरी करणे, कामधंदा करणे, स्वतः कडे जे कौशल्य आहे ते वापरून आर्थिक नियोजन, आत्मनिर्भर होणे. अत्यंत गरजेचे आहे. बदलत्या भूमिकांसाठी तयार होताना तिला स्वतः मध्ये अमुलाग्र बदल घडवून आणावे लागत आहे. त्यासाठी नवनवीन गोष्टी आत्मसात करणे, शिकणे अनिवार्य होऊ लागले आहे. तिची, केवळ चूल आणि मूल ही भूमिका कधीच मागे पडली आहे. तिला आता शिक्षण घेणे स्वतः च्या पायावर उभे राहणे सर्व प्रकारच्या बदलांशी जुळवून घेणे अनिवार्य आहे. मुलगी शिकलेली आणि नोकरी करणारी पाहिजे यामागचा अदृश्य हेतू काहीसा असाच असावा सद्यस्थिती पाहता. या भूमिका वठवतांना त्यांची आपसातील सीमारेषा किती हळवी, नाजूक आणि समांतर आहे. याचे भान तिला सतत हेलावून टाकत असते. कितीदा दमछाक होते, जीव कासावीस होतो, नकोसा होतो, घुसमट होते, चिडचिड होते, शरीरातील हॉर्मोन्स धोक्याची घंटा वाजवतात, वाढणारं वय-कमी होणारी ऊर्जा यांचा ताळमेळ सुटत असतो आणि ती सगळं जुळवून आणण्यासाठी नेटाने लढत असते!




# कष्टाची कमाई श्रेष्ठ

आधुनिक केसरी न्यूज

एका गावात दोन चोर राहत होते. ते प्रत्येक दिवशी चोरी करत आणि आलेले धन तीन हिस्से मध्ये वाटून घेत. आपापला हिस्से स्वतःसाठी व एक हिस्सा ईश्वराला ठेवतात.असे खूप दिवस चालत होते .एका रात्री ते चोरीसाठी दुसऱ्या गावात निघाले. बरीच वेळ भटकंती करूनहीसुद्धा त्यांना काही चोरी करण्याची संधी मिळाली नाही.ते दोघेही थकून एका मंदिरात बसले. तेथे त्यांना एक साधू संत मादिरामध्ये झोपलेले दिसले. त्यांनी संताला उठवले व म्हणाले कि काही असेल तर द्या नाही तर मारून टाकले जाऊ.

संताने त्यांना विचारला तर त्या चोरांनी सांगितले कि आम्ही चोर आहोत. आम्ही चोरी करतो .हे ऐकून संत म्हनाले, तुम्ही करता ते चांगलेआहे की वाईट याचा कधी विचार केला ?

चोर म्हणाले," आम्ही चांगलेच करतो कारण आम्ही चोरी करून जे धन मिळवतो ते आम्ही तीन हिस्से मध्ये वाटतो. एक एक भाग आम्ही घेतो आणि तिसरा भाग ईश्वराला चरणी अर्पण करतो.

हे सगळे ऐकल्यावर संत त्यांच्या जवळील एक जिवंत कोंबडा काढला आणि त्यांना दिला व म्हणाले "आज तुम्ही काहीही चोरी करू शकले नाहीत त्यामुळे तुम्हीला हा कोंबडादेऊ शकतो बाकी माझ्याकडे काही नाही.पण आता चोरापुढे प्रश्न पडला कि आता याचे हिस्से कसे करायचे. ते दोघेही चोर आश्चर्यचकित झाले. संताने त्यांना आशय समजावून म्हाणाले कि चोरी हा जगण्याचा पर्याय नाही. तुम्ही कष्टाची कमाई करून त्यातील एक हिस्सा ईश्वरचरणी ठेवा. ते खरे सार्थक आहे .हे सगळे म्हणणे त्या चोराला पटले आणि ते दोघेही संताला नमस्कार करून चोरी सोडून द्यायचा निर्णय करून तेथून निघून गेले.



# पंकजाताईच्या नेतृत्वावर लोकांचे प्रेम का ?

राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**2019 ला परळी विधानसभा मतदारसंघातुन पराभुत झाल्यापासुन आजपावेतो भाजपा नेत्या पंकजाताई गोपीनाथ मुंडे सत्तापदावर कुठेच नाहीत. संघटनात्मक वेगवेगळी पदं मिळाली. पण राजकारणात संवैधानिक पद असेल तर लोकही गुळाच्या ढेपीसारखे चिकटुन रहातात. पण हे असं एक नेतृत्व पाच वर्षे सत्तेत नसतानाही त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांची गर्दी कमी झाली नाही. कदाचित दोन गुणा अधिक वाढली. खरं तर याचं गणित कळत नाही की लोक त्यांच्यावर प्रेम करतात कसे?कारण ज्यांच्याकडे देण्यासाठीही काही नव्हतं. एव्हाना त्यांनी सत्ता पदावर यावं यासाठी कार्यकर्ते, हितचिंतक आणि सामान्य जनतेंनी देवही पाण्यात ठेवले होते. लोकसभेची संधी मिळाली. त्यात निसटता विजय झाला.**

पराभव हितचिंतकाच्या एवढ्या जिव्हारी लागला ज्यातुन चार-पाच आत्महत्या झाल्या. पक्षाने विधान परिषदेच्या माध्यमातुन त्यांना राजकिय प्रतिष्ठा दिली. प्रश्न हा पडतो की या नेतृत्वावर सामान्य जनतेचे प्रेम असण्याचे कारण काय? त्याचे उत्तरही यातच सापडतं की हे नेतृत्व समाजातील वंचित, उपेक्षित, शेतकरी, कष्टकरी,सामान्य जनतेच्या कल्याणाच्या विचाराने चालतं. पोटात कुणाविषयी पाप नाही. कुणाचा द्वेष ना कुणाची निंदा सकारात्मक आणि पारदर्शक राजकारण ही जमेची बाजु. स्व.मुंडे साहेबांचा सक्षम वारसा चालवण्याची अंगी असलेली क्षमता. त्यामुळेच कुठेही संवैधानिक पदावर नसताना मागच्या पाच वर्षापासुन समुद्राच्या लाटेसारखी त्यांच्याभोवती राहिलेली गर्दी हेच दर्शवते की, आम्हाला नेतृत्वाची गरज असुन तो पर्वकाळ आता येवुन ठेपला. विधान परिषदेच्या माध्यमातुन त्यांच्या राजसत्तेचा मार्ग खुला झाला. आता भविष्यात यापेक्षाही अधिक निश्चित राजयोगाचा मुकुट त्यांच्या शिरपेचात दिसल्याशिवाय रहाणार नाही.

अनादि वर्ष काळापासुन मागे जायचं झालं तर साधु संत, महात्मे, महापुरूषालाही वेगवेगळ्या त्रासाला सामोरे जावा लागलं असुन जगाचा बाप प्रभु रामचंद्र 14 वर्षे वनवासात गेला. पाच पांडवांच्या अंगी समुद्र गिळंकृत करण्याचे बळ असुनही त्यांना संघर्ष करावा लागला. संत तुकाराम महाराज असो किंवा इतर अनेक संत ज्यांना त्यांच्याही काळात कठोर प्रसंगाला सामोरे जावे लागलं. महापुरूषांच्या बाबतीत अनेक उदाहरणे देता येतील. मात्र ज्यांच्या अंगी संयम, सहनशिलता, विनयता आणि दुरदृष्टी असते अशी माणसं वेळप्रसंगी आलेल्या संघर्षाला तोंड देत असतात. स्पष्ट सांगायचं झालं तर पंकजाताई म्हणजे विझलेला कोळसा नव्हे तर जळजळता निखारा होय. संधी मिळेल तिथं कार्यकर्त्यांच्या रूपाने काम करणं यातही त्या कधीच मागे राहिल्या नाहीत. पक्षाने त्यांना राष्ट्रीय सचिव पदावर संधी दिली. मध्यप्रदेश सह प्रभारी म्हणुनही जबाबदारी टाकली. अगदी उत्तमरित्या त्यांनी आलेली जबाबदारी संघटनात्मकरित्या पार पाडली. खरं तर राजकारणात काम करणारे पुढारी लबाडी करण्यात जास्त पारंगत असतात. त्याहुन अधिक सत्य पदाची धारणा धरणारेही बरेच असतात. ज्यांच्या अंगी मुळातच नैतिकता, सहनशिलता, सोशिकता, समर्पण, त्याग असे गुण मुळात असतात अशा माणसाला सुख असो किंवा दुःख कुठलाही पिरिअड त्रासदायक ठरत नाही. पण आलेल्या दुःखाचा सामना करण्याची क्षमता एवढी मोठी असते की त्यातुन मग सुखाचे फुलारेही फुलायला लागतात. हे नेतृत्व प्रामाणिक, पारदर्शी आणि हितचिंतक कार्यकर्त्यांच्या भावनेला गवसणी घालणारे होय. सत्तेत नसताना त्यांनी नेहमीच समाजात राहुन लोकांची सेवा केली. सुख दुःखात धावुन जाणे हा त्यांचा मानवतावाद लपुन राहिला नाही. एव्हाना 2014 साली राज्यात संघर्षयात्रेच्या माध्यमातुन



परिवर्तनाच्या लढाईत त्यांचा खारीचा वाटा राहिला. तदनंतर पालकमंत्री म्हणुन राज्यात आणि बीड जिल्ह्यात ज्या प्रकारे त्यांनी काम केलं न भुतो न भविष्यती विकासाची महागंगा जिल्ह्यात खेचुन आणणारा पालकमंत्री म्हणजे हे नेतृत्व. त्यांच्या अंगी असलेला एक सद्‌गुण महत्वाचा वाटतो सकारात्मक राजकिय भुमिका नेहमीच पार पाडतात. कुणाचा द्वेष किंवा निंदा करणे हा त्यांचा धर्म नाही. विरोधकांनाही आपलंसं करण्याची ताकद त्यांच्यात असुन सत्तापदावर असताना विरोधकांच्या गावात केलेला विकास लोक विसरले नाहीत. पाच वर्षात प्रेम करणारी जीवाभावाची माणसं माशाच्या जाळ्यासारखी त्यांनी विणली. कुणालाही स्वतःपासुन दुर जावु दिलं नाही. मध्यंतरी शक्ती भक्ती यात्रा काढुन राज्यभरात संवाद साधला. त्यांना राजकिय प्रतिष्ठा मिळण्याची वाट हितचिंतक पहात होते. मात्र कुणाच्याही नशिबात चढउतार असतात. संघर्षाला जो सामोरे जातो तो निखारा कधीच विझत नाही. उलट जळता रहातो. लोकसभा निवडणुकीसाठी संधी मिळाली. खरं तर त्यांचा नैतिकदृष्ट्या पराभव झाला नाही. अगदीच म्हटलं तर जवळच्या लोकांनीही घात केला. शिवकालीन उदाहरण द्यायचं झालं तर ज्या किल्याच्या चाव्या सुर्याजी पिसाळाच्या हाती दिल्या त्याच पिसाळांनी विरोधकांच्या कडून पैशाच्या मोहापोटी इमानदारी विकली आणि किल्याच्या चाव्याच विरोधकांना देवुन टाकल्या. ज्यामुळे दरवाजा खुला झाला आणि दुश्मन मध्ये शिरले. तेच पंकजाताईच्या बाबतीत लोकसभा निवडणुकीत पहायला मिळालं. जवळ राहुन नव्हे तर ताटात जेवणाऱ्यांनीच विष कालवल्याचे प्रकारही केले. शेवटी राजकिय नेते भरवसाही आपल्याच लोकावर टाकत असतात. पण आपलेच धोका देतात आणि गद्दारी करतात. हा देखील अनुभव त्यांना मिळाला. कुणी खिशात हात टाकले? कुणी काम केलं नाही? गद्दारी कुणी केली? लांबुन लांबुन अंग चोरून कुणी काम केलं? हा सारा हिशोब पंकजाताईकडे नाही असं नाही. पण गंमत अशी आहे की बदमाशगिरी करणारेच काल मुंबईत गळ्यात हार घालायला पुढे आलेले दिसले. त्यालाच तर मग राजकारण म्हणतात. असो. वेळप्रसंगी कदाचित नेतृत्व हिसाब चुकता करेल पण एवढंही त्यांच्या पोटात पाप कुणाविषयी राहत नाही. म्हणुनच तर लोक त्यांच्यावर प्रेम करतात. शिव्या देणाऱ्यांच्या तोंडात त्या कधी मारत नाहीत. उलट शिव्या देणाऱ्यालाही आत्माभुती होते त्या पश्चातापात तो गळुन जातो. कदाचित ज्यांनी लोकसभेत धोका दिला, त्यांना पश्चातापही होत असेल. एक गोष्ट खरी आहे की एक दिवस अशा चांगल्या नेतृत्वाचा येतोच. त्यांना विधान परिषदेत पक्षाने संधी दिली. महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातील सामान्य अगदी फाटक्या तुटक्या माणसाला कमालीचा आनंद झाला. ही संधी म्हणजे त्यांच्या राजयोगाच्या रस्त्याचे द्वारे खुले झाले असंही म्हणता येईल. आज आमदार म्हणुन विधान परिषदेत जावुन बसल्या. उद्या पक्ष आणखीन काही योग्य जबाबदारी त्यांच्यावर निश्चित देईल यात शंका नाही. कॅबीनेट मंत्री होतील किंवा त्याहुन अधिक जबाबदारी वाढु शकते.कारण राज्यात असं हे नेतृत्व ज्यांच्याभोवती ओबीसी समाजाचं जाळं तर आहे शिवाय इतर सामान्य लोक देखील प्रेम करतात. सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे लोक प्रेम करतातच कसे? कारण ज्यांच्याकडे काही देण्यासाठी नाही अशा पुढाऱ्यांच्या दारात सामान्य माणुस येत नाही. कार्यकर्ते तर लांबच. त्याच भुमिकेत पंकजाताई असताना लोक चिटकुन राहिले. त्याचं कारण एकुण लिहिलेला उठाठेव म्हणावा लागेल. काळ बदललेला आहे. पुढाऱ्यांना देखील कार्यकर्ते तेजाब लावुन तपासुनच घ्यावे लागतील. कारण धोकाधडी करणाऱ्यापासुनही सावध रहाणे महत्वाचे. असं असलं तरी ज्यांचा आत्मा मोठा तो महान त्यापैकीच हे नेतृत्व कदाचित साऱ्या गोष्टी विसरून पुन्हा या राज्यात महायुतीची सत्ता येण्यासाठी दबंग रूपाने राजकिय मैदानात उतरून बॅटिंग केल्याशिवाय रहाणार नाही.

# समर्पित जीवनाचा आदर्श : देशहितवादी

आधुनिक केसरी

**श्रीरामपूर येथील सुसंस्कृत, सेवाभावी व्यक्तिमत्व म्हणजे सुखदेव सुकळे सर. मुळातच कौटुंबिक संस्कारशिलता, सेवा, निष्ठा हा त्यांचा स्थायीभाव. रयत शिक्षण संस्थेतील एक रयतनिष्ठ अधीक्षक ते समाजकार्यातील सेवाशील व्यक्तिमत्व असा त्यांचा जीवनप्रवास. माजी केंद्रीय कृषी मंत्री डॉ. अण्णासाहेब शिंदे, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात आणि ज्येष्ठ विधीज्ञ रावसाहेब शिंदे यांच्या विचार आणि कार्यावर त्यांची प्रचंड निष्ठा. या बहुआयामी व्यक्तिमत्त्वांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचावे हा त्यांचा अट्टाहास. या उत्तुंग व्यक्तींचे विचार, मूल्यरुपी धन हे पुढच्या पिढीला मिळावेत, असा त्यांचा या लेखनामागील ध्यास. याच ध्येयाच्या ध्यासातून सुखदेव सुकळे यांचे 'देशहितवादी' पुस्तक आकाराला आले आहे.**

या तिनही व्यक्तीमत्त्वांची स्वतंत्र चरित्र, आत्मचरित्र आहेत; परंतु त्या पलीकडे जाऊन त्यांच्या जीवनचरित्र लेखनातील दुर्लक्षित पैलू म्हणजे या पुस्तकाचा आशय. अतिशय चाणाक्ष, राजहंस दृष्टी ठेवून सकारात्मक वृत्तीने मांडलेला हा लेखनप्रपंच. संयमित जाणिवेने आणि संशोधक वृत्तीने आत्मानुभवातून घेतलेला हा लेखनशोध. अत्यंत सहज साध्या सोप्या भाषेतील ही शब्दसाधना वाचकाला गुंतवून ठेवते. अनुभवसंपन्न सेवाशील, संस्कारशील वृत्तीने श्रद्धा आणि सबुरी जपलेली ही शब्दसुमने. नव्या जाणिवेने आणि आपुलकीच्या भावबंधातून या तीनही व्यक्तींवर केलेले हे लेखन वाचकांच्या मनात आदर्श व प्रेरणा निर्माण करणारे आहे.

'देशहितवादी' या पुस्तकाला ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी दिलेली प्रस्तावना गतकाळातील स्मृतींमध्ये चैतन्य निर्माण करते. समाजपोषक सुधारणा घडवून आणण्यासाठी समाजप्रेम, बौद्धिक सामर्थ्य, परिश्रमशीलता आणि निरपेक्ष सेवाभाव असावा लागतो. या विचार कार्याचा परिपाक म्हणजे 'देशहितवादी' हे चरित्रात्मक पुस्तक. कृषी क्रांतीचे जनक, राष्ट्रभक्त, सहकार महर्षी, शिक्षण तपस्वी या तिन्ही व्यक्तिमत्वांचा चरित्रात्मक कार्याचा कर्तृत्वशील, अनुभवशील, चिंतनात्मक शोध सुखदेव सुकळे यांनी आपल्या आत्मचिंतनातून घेतला आहे. लेखकाचे मनोगत या कर्तृत्वावर प्रकाश टाकणारे तेवढेच हृदयस्पर्शी आहेत.

हा लेखनप्रपंच नव्या पिढीला दिशादर्शक आणि दीपस्तंभीय आहे. परागकणासारखी या पुस्तकातील वैशिष्ट्ये वेचून घ्यावी अशी आहेत. महात्मा गांधी, महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्य आणि कर्तृत्वाची छाप त्यांच्या विचारशील मनात कायमची कोरलेली आहे. या तीनही व्यक्ती स्वातंत्र्यसंग्रमातील लढवय्ये आहेत. शेती, शेतकरी, कामगार, आदिवासी, सहकार, उद्योग, न्याय, शिक्षण, साहित्य, आरोग्य याप्रती या व्यक्तींनी आपले जीवन समर्पित केलेले आहे. या सर्वक्षेत्रात त्यांचा दबदबा, रचनात्मक विधायक कार्य आदर्शवत आहे. या विचार कार्याचा प्रपंच अतिशय सखोलपणे लेखकांनी या पुस्तकातून मांडलेला आहे. एकमेकांच्या विचार कार्यातील अनुभवसंपन्न गुंफण ही या पुस्तकाचा आत्मा आहे. या देवमाणसांच्या परिस्पर्शाने आपल्या जीवनाचे सोने झाले आहे, हा मूल्यभाव त्यांच्या लेखनातून ठिकठिकाणी व्यक्त होतो. याच तपस्वींच्या प्रेरणेने आणि उच्चतम संस्कारांनी नीतीच्या मार्गाने त्यांचे फुललेले जीवन त्यांच्या मनाची धन्यता आहे. वाचन आणि लेखनाचे संस्कार या तपस्वींचं देणं आहे. हा मौलिक विचार ते उदधृत करतात.

देव दगडात नाही तो माणसात आहे, ही




रावसाहेबांची शिकवण त्यांना रावसाहेबांच्या रूपाने देवस्वरूप वाटते. हे निस्सीम प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकीचा ओलावा या सर्वच लेखनातून जाणवतो. या लेखनातील हा विचार म्हणजे ही शब्दरूपी सुमने आहेत. हा सुगंध पुढे सतत दरवळत राहणार आहे. जीवनाचे खरे वैभव स्वच्छ, निर्मळ आणि नीतिमान जीवन जगण्यात आहे. समाजसंस्कार अनेक संस्कृती जगण्यासाठी या तपस्वीच्या विचारांचा प्रबोधनाचा खळाळता झरा म्हणजे 'देशहितवादी' हे पुस्तक एकदा हातात पडले की परत न ठेवावे असे. हे मौलिक शब्दरुपी धन विचारांच्या श्रीमंतीत भर टाकणारे आहे.

या चरित्रात्मक पुस्तकाची सुरुवात समर्पणातून होते. प्रेमाची सावली आणि कुटुंबाचा आधार बनलेले मोठे बंधू स्व. नामदेवराव सुकळे आणि गरीबीचे चटके खात घराला घरपण देणाऱ्या पत्नी स्व. पुष्पा सुखदेव सुकळे यांना हे पुस्तक समर्पित आहे. अर्धांगिनीविषयी शेवटच्या मलपृष्ठावर लिहिताना ते भाऊक होतात. पत्नीच्या संगतीची देणगी आणि व्यक्त केलेल्या कृतज्ञताभावाची जाणीव वाचकांच्या अंतःकरणात ओलावा निर्माण करते. एकूण तीन भागांमध्ये विभागलेल्या या पुस्तकातून तीनही तपस्वीवर प्रकाशझोत टाकलेला आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा खऱ्या अर्थाने हा आढावा झराच आहे. या पुस्तकातील विचाररुपी दवबिंदू सामाजिक, शैक्षणिक, सहकार आदी क्षेत्रातील जीवनमूल्यांची खाण आहे. या पुस्तकाची २४७ पृष्ठे अमूल्य विचारांचा ठेवा आहे. संस्थापक, सचिव विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठान, श्रीरामपूर हे या पुस्तकाचे प्रकाशक असून प्रकाशित ऑफसेट पुणे यांनी मुद्रणाचे काम केले आहे. अविनाश हरकल यांची अक्षरजुळणी तर व्ही. डी. वेलणकर, अनिता कुलकर्णी यांचे चैतन्यशील मुखपृष्ठ वाचकांचे मन वेधून घेते. या पुस्तकाची पहिली आवृत्ती ३० जानेवारी २०२४ रोजी प्रकाशित झाली. या पुस्तकाचे मूल्य २५० रुपये इतके आहे. जाणकार जिज्ञासू आणि चोखंदळ वाचकांनी या पुस्तकाचा शब्दरूपी लाभ घ्यावा, अशी अपेक्षा आहे.

'देशहितवादी' या पुस्तकाच्या प्रकाशनाविषयी......

देशहितवादी या चरित्रात्मक पुस्तकाचा प्रकाशन समारंभ ४ फेब्रुवारी २०२४ रोजी श्रीरामपूर येथील महादेव मळ्यात नामदार बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते झाला. यावेळी शशिकलाताई शिंदे, दुर्गाताई तांबे, भगीरथ शिंदे, अनिल शिंदे, डॉ. राजीव शिंदे, डॉ. प्रेरणा शिंदे, भागचंद चुडीवाल, पत्रकार प्रकाश कुलथे, डॉ. बाबुराव उपाध्ये, शिवाजीराव भोर, माजी प्राचार्य टी. ई. शेळके, माजी प्राचार्य शंकरराव गागरे, काशिनाथ गोराणे बाबा, प्रकाश निकम पाटील, डॉ. बाबासाहेब शेंडगे, शिवाजीराव बारगळ यांच्यासह अनेक हितचिंतक उपस्थित होते. हा प्रकाशन सोहळा आनंद व स्मृती द्विगुणित करणारा ठरला आहे. सुखदेव सुकळे यांच्या 'देशहितवादी' या पुस्तकाच्या आधारे मांडलेला हा लेखनप्रपंच तपस्वींच्या समर्पित जीवनाचा आणि कार्यकर्तृत्वाचा आलेख आहे.

# हेचि व्हावी माझी आस | जन्मोजन्मीं तुझा दास



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

आधुनिक केसरी

**पंढरिसी जा रे आलेनो संसारा | दिनाचा सोयरा पांडुरंग || वाट पाहे उभा भेटीची आवडी | कृपाळू तांतडी उतावीळ || मागील परिहार पुढे नाही शीण | झाली या दर्शन एकवेळ || तुका म्हणे नेदी आणिकांचे हाती | बैसला तो चित्ती निवडेना || विठुरायाची आनंदवारी... घडो माझ्या हृदय मंदिरी. हेच एकमेव मागणं मागत प्रत्येक जण विठुरायाच्या दारी जात आहे. आज वारीच्या प्रवासात कोणताच भेद नाही. कोणतेही बंधन नाही आणि सर्व काही स्वच्छेने स्वतःसाठी सुरू आहे. त्यामुळे तो आनंद गगनात मावेनासा आहे. हा अवर्णनीय आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत आहे. आज प्रत्येकाला वाटत आहे.**

मी माझ्या विठू माऊलीला भेटायला जात आहे, मी वर्षभर माझ्या विठुरायाच्या भेटीची वाट पाहिली आहे, परंतु आपल्या पेक्षा जास्त वाट तर विठू माऊली पाहत आहे. असे तुकाराम महाराज म्हणतात, **मातेची अवस्था काय जाणे बाळ | तिसी तो सकळ चिंता त्याची || विठ्ठल विठ्ठल येणे छंदे | ब्रह्मानंदे गर्जावे || वाये टाळ टाळ्या टाळी || होईल होळी विघ्नांची | विठ्ठल आधी अवसानी |विठ्ठल मनी स्मरावा || तुका म्हणे विठ्ठलवाणी | वदा कानी आईका ||** या वारीच्या वाटेवर चालताना प्रत्येकाचा भाव शुद्ध झाला आहे, अंतःकरणात भक्ती प्रेम निर्माण झाले आहे. प्रत्येकाच्या मनाने एकच ध्यास घेतलेला आहे,
**हेचि दान देगा देवा | तुझा विसर न व्हावा || यालाच तुकाराम महाराज म्हणतात, पवित्र तें कुळ पावन तो देश | जेथें हरीचे दास जन्म घेती || कर्मधर्म त्यांचा झाला नारायण | त्याचेनि पावन तिन्ही लोक ||**

या परमानंदाची प्राप्ती या सुखसोहळ्यातच अनुभवता येते परंतु हा आनंद चिरकाल टिकत नाही कारण आपल्या मनामध्ये निर्माण झालेला भाव सुद्धा टिकून राहत नाही. मनीचा भाव हा वेळ काळ आणि परिस्थिती यानुसार बदलत राहतो. आज आपल्याला विठू माऊली शिवाय दुसरं कोणीच दिसत नाही, माऊली शिवाय काही ऐकूच वाटत नाही, माऊली शिवाय दुसऱ्या कोणाविषयी बोलावसं वाटत नाही, परंतु ही स्थिती कायम राहत नाही ही स्थिती कायम राहण्यासाठी आपल्याला संत संग हा नित्याचा असायला हवा. जोपर्यंत संत संग नित्याचा राहत नाही, तोपर्यंत आपला भावही दृढ राहणार नाही. त्यामध्ये चढ आणि उतार होणार आहे. यालाच संत तुकाराम महाराज म्हणतात, असो जीव भाव तुझ्या सर्व पायी | तुझे मागणे आणिक व्यर्थ काई || दिनानाथ हे साक्ष तुझी जनासी | दिने तारिली पातकी थोर दोषी || तुका राहिला पायीं तो राख देवा | असे मागतो तुमची पादसेवा ||

जो पर्यंत मनात सेवा भाव आहे, आचरणात नम्र पणा आहे, तो पर्यंतच भगवंताच्या हृदयात स्थान आहे, आपण जर लौकिकासाठी प्रत्येक गोष्ट करत असेल तर पदरात दुःख पडल्याशिवाय राहणार नाही. प्रत्येक ठिकाणी हौसे, नवसे, गवसे असतात, परंतु आपण त्यांच्या कर्माकडे पाहिल्याने आपले आचरण बदलते, मनाची चलबिचल वाढते, आणि कळत नकळत पणे आपण चुकीच्या मार्गाने प्रवास सुरु करतो. यालाच संत तुकाराम महाराज म्हणतात, **ऐसें कैसे झाले भोंदू | कर्म करोनि म्हणती साधू || अंगा लावूनिया राख | डोळे झाकुनी करिती पाप || दावूनी वैराग्याची कळा | भोगी विषयांचा सोहळा तुका म्हणे सांगो किती | जणू तयांची संगती ||**
म्हणून आपण कर्म करत असताना इतरांच्या कर्माकडे न पाहता आपण आपल्या स्वहितासाठी जागृत राहिला पाहिजे. भगवंता वरती असणारा आपला विश्वास नित्याचा असणारा दृढभाव हा टिकून कसा राहील यासाठी प्रयत्नशील असलं पाहिजे त्यासाठी आपल्याला संत भगवंत शास्त्र कळायला हवं. जोपर्यंत संतांनी सांगितलेल्या शास्त्रातील मर्म कळत नाही तोपर्यंत संतांच्या मनीचा भाव आपल्यापर्यंत पोहोचू शकणार नाही. आपणच आपल्या मनाला इंद्रियांना नम्र राहण्याची सवय लावायला हवी. कारण संत सांगतात, नम्र झाले भूता | त्याने कोंडीले अनंता || सर्व संत स्वतःला दास म्हणून घेतात आणि आपण मात्र स्वतःला भगवंताचे मालक मानतो. तसे आपले आचरण करताना प्रत्येक जण दिसून येतो. संत सांगून गेले मुंगी होऊन साखर खा, हत्ती होऊन लाकडं फोडू नका. परंतु आपल्याला सामान्य रूपाने वावरायला मन तयार होत नाही. प्रत्येकाला विशेष रूपाने प्रकट व्हायचं आहे. विशेष रूपाने लौकिक प्राप्त करून घ्यायचा आहे. आणि जेव्हा विशेष रूपाने आपण आचरण करतो तेव्हा आपल्याकडे फक्त दुःख आणि दुःखच असतं. म्हणून आपण सामान्य राहून स्वतःला संतांचा भगवंताचा दास समजून आचरण करायला हवं. याला संत म्हणतात, अंगात आला ताप देवा तू माझा बाप , अंगातून गेला ताप ,देवा मी तुझ्या बापाचा ही बाप || जेव्हा असा विषय भाव राहील मनामध्ये तेव्हा आपल्या हातून भगवंताची सेवा घडणार नाही. आणि हा भवसागर तरुन जाण्यासाठी मोक्षाच्या वाटेने जाण्यासाठी या जीवन प्रवासात अडथळे निर्माण होतीच राहतील. म्हणून मनामध्ये सेवाभाव टिकून राहण्यासाठी संतांचा संग असायला हवा यालाच संत म्हणतात, संगत करे साधू की तो हो जाये दो दो बात |संगत करे गंधे की तो मिल जाये दो दो लाथ || मग आपण संगत कोणाची करतो त्यावरून ह्या मनाची जडणघडण होत असते. संतांनी उपाधी पेक्षा अधिष्ठानाला अधिक महत्त्व दिलेला आहे. कारण अधिष्ठान हेच एकमेव सत्य आहे . बाकी सर्व गोष्टी त्या अधिष्ठानावर अद्यारूपीत झालेल्या आहेत. मग अध्यारोपित झालेल्या ह्या जगतरुपी मायेला न भुलता आपण त्याचे मूळ अधिष्ठान असणारे स्वस्वरूप जाणून घ्यायला पाहिजे, समजून घ्यायला पाहिजे. आणि त्या स्वरूपाचा संग घ्यायला पाहिजे. जोपर्यंत आपण स्वरूपाचा संग धरत नाही तोपर्यंत भगवंत कळत नाही. आपण प्रत्येक जण संतांच्या सांगण्याचा शब्दार्थ लक्षात घेतो आणि त्याप्रमाणे स्वतःच्या पामर बुद्धीने त्याचा विपर्यास करून आचरण करतो आणि सतत सुखदुःख भोगतो. म्हणून संतांचं म्हणणं त्यातील मर्म समजणं अत्यावश्यक आहे. आपण साधूला शरण जाऊ पाहतो, व्यक्तीला गुरु समजून स्वतःची फसगत करून घेतो, संत सांगतात, देहाच्या बांदोडी न पडिजे | सुखदुःखाचा सागरी न बुडीजे || सुखे सुखात्मे घडीजे माझिया अंगा || संपूर्ण चराचरसृष्टीमध्ये जे ओतप्रोत भरलेलं जे तत्व आहे, ते तत्व भरून जे उरलेला आहे तो मात्र भगवंता आहे. आपण नेहमी चराचरसृष्टीमध्ये तत्वरूपाने भरलेला भगवंत पाहतो ,परंतु संत सांगतात जो तत्त्वरूपाने भरलेला आहे तो भगवंत नाही भरून उरला आहे तो भगवंत आहे. चर्मदृष्टीने जे जे पाहु ते सर्व काही नाशवंत आहे, आणि तत्त्वदृष्टीने जे जे काही पाहू ते चिरकाल टिकणारे आहे. याला संत म्हणतात, आम्ही कधी जन्मालाही येत नाही, कधी मरतही नाही, आम्ही कधीचे कधीचे , आम्ही देवाचिये आधीचे (तत्वरूपाने) आम्ही वैकुंठवासी , आलो याची कारणासी. या अशा खऱ्या संतांची ओळख आपल्याला व्हायला हवी. चर्मदृष्टी दिसणाऱ्या गोष्टींना आपण सत्य मानतो आणि स्वतःची फसगत करून घेतो. परंतु चर्मदृष्टींचे दिसत नाहीत ते शाश्वत आहे आणि त्या शाश्वताची ओळख आपल्याला व्हायला हवी. त्या शाश्वताची अनुभूती आपण घ्यायला हवी. म्हणजेच आजचा जो सोहळा आपण भोगत आहोत तो नित्याचा होईल. तो होणारा आनंदच चिरकलनटिकणारा असेल, क्षणिक नसेल. चर्मदृष्टी जाऊन तत्त्वदृष्टी आपल्याकडे येईल त्यावेळेस खरंतर आपण सुख सोहळा भोगत असू, त्यासाठी संत भगवंत शास्त्र हे आपल्याला कळायला हवं. आपण कोणाचं ऐकलं पाहिजे, कोठे बोललं पाहिजे, काय खाल्लं पाहिजे याचा विवेक जर आपल्याला असेल तर आपलं जीवन व्यर्थ जाणार नाही. परंतु आपल्याला काय खावं काय प्यावं कुठे जावं कुठे जाऊ नये याचे देखील भांन नसेल तर मात्र आपण या चौऱ्यांऐंशी लक्ष योनीमध्ये फिरत राहू आणि हे सुखदुःख भोगत राहू. म्हणून संत सांगतात आपण सेवा द्यायला शिकलं पाहिजे सेवा घ्यायला नाही. जोपर्यंत आपण सेवा देत नाही, सेवा करत नाही तोपर्यंत आपल्या मनामध्ये प्रेम निर्माण होणार नाही. आपल्या मनामध्ये सेवा रुपी भाव तयार होत नाही म्हणजेच आपण उपाधीला सत्य मानलं. उपाधीचा अहंकार आपल्या मनामध्ये घर करून राहिलेला आहे. आणि म्हणून आपण कोणालाही शरण जायला मागत नाही. आणि संत आपल्या मनातील हाच अहंकाराचा भाव बाजूला करून या अहंकाराचे रूपांतर प्रेमामध्ये करतात. म्हणून संत संग घडायला हवा, संत संगामध्ये आपल्याला राहता यायला पाहिजे. त्याला संत म्हणतात, मनी नाही भाव आणि देवा मला पाव ,देव आशाने पावायचा नाही रे ,देव काय बाजारचा भाजीपाला नाही रे|| जोपर्यंत शाश्वत गोष्टीची ओळख होत नाही तोपर्यंत आपल्या मनी असणारी आस कधीही पूर्ण होऊ शकणार नाही. याला संत सांगतात जोपर्यंत मनामध्ये इच्छा निर्माण होत राहतात तोपर्यंत आपण स्वस्वरूपाजवळ राहू शकत नाही. जेव्हा मनातून इच्छा निर्माण होणं कमी कमी होत जाईल तसं आपलं स्वरूपाजवळ जाण्याचा प्रवास सुरू होईल. परंतु आपण पावलोपावली इच्छा व्यक्त करत असतो. स्वतःसाठी करतो आणि सांगतोय इतरांसाठी , हा भाव आपला तयार आहे. म्हणजेच आपण आपले स्वतःच स्वतःचे फसगत करून घेत आहोत. म्हणून आपल्या चित्तामध्ये समाधानी वृत्ती असणं म्हणजेच आपण भगवंताजवळ आहोत . याला संत म्हणतात , " झाले समाधान तेच देवाचे दर्शन" आपल्या अंतकरणांमध्ये समाधान असेल तर आपल्याला कोठे जाण्याची गरज नाही, आपलं मन अस्वस्थ आहे म्हणून आपण दारोदार फिरत आहोत. जिकडे तिकडे भगवंताला शोधत आहोत. यालाच संत तुकाराम महाराज म्हणतात, **जयाचिये द्वारी सोन्याचा पिंपळ | अंगी ऐसे बळ रेडा बोले || करील ते काय नव्हे महाराज | परी पाहे बीज शुद्ध अंगी || जयाने घातली मुक्तीची गवांदी | मिळविली मांदी वैष्णवांची || तुका म्हणे तेथे सुखा काय उणे | राहे समाधानी चित्ताचिया ||**



संत साहित्यातील तत्वज्ञान भाग -14

आपण जे जे कर्मे करतो मग ती मनाने असेल अंतकरणाने असेल देहाने असे वाणीने असेल ती सर्व कर्मे आपण संतांच्या चरणी अर्पण करायला हवीत. जोपर्यंत सर्व कर्मे आपण भगवंता चरणी अर्पण करत नाही तोपर्यंत आपण सुखदुःखाच्या सागरामध्येच अडकून राहणार. आपल्याला मोहाचा क्षय करायचा असेल या मोक्षाच्या मार्गाने जायचं असेल तर आपण सर्व कर्मे अर्पण करायला शिकलं पाहिजे. परंतु आपलं मन असं आहे चांगल्या गोष्टींचे श्रेय स्वतःकडे घेत आणि वेदनादायी प्रसंग अनुभवला की आपण भगवंताला बोल लावतो. पण तो याला संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, हे मजिस्तव झाले, परि म्या नाही केले ,ऐसे जेणे जाणीतले , तो सुटला गा || माऊली या ठिकाणी सांगतात, मी कोणती गोष्ट करत नाही मी तुम्हाला सुखही देत नाही आणि मी तुम्हाला दुःखही देत नाही, सुखदुःख ही तुम्ही तुमच्या कर्माने अनुभवत असता. म्हणून आपले आचरण आपले कर्म शुद्ध भावाने आपण करायला हवी. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा स्वार्थ असता कामा नये जोपर्यंत मनात मनीचा स्वार्थ भाव कमी होत नाही तोपर्यंत आपण परमार्थाच्या वाटेवर चालू शकत नाही. परमार्थाच्या वाटेवर चालत असताना आपल्याला आपले आचार विचार उच्चार दृष्टी यामध्ये बदल केला की भगवंत आहेच आहे. त्या प्राप्तीचीच प्राप्ती आपल्याला करून घ्यायची आहे परंतु त्यासाठी आपला समर्पण भाव फार महत्त्वाचा आहे. याला तुकाराम महाराज म्हणतात, **बोलीली लेकुरे | वेडी वाकुडी उत्तरे || करा क्षमा अपराध | महाराज तुम्ही सिद्ध || नाही विचारिला | अधिकार म्या आपला || तुका म्हणे ज्ञानेश्वरा | राखा पायापें किंकरा ||**

म्हणून या मायारूपी जगात वावरत असताना आपण देह भाव बुद्धीने न वावरता स्वरूप स्थितीत लीन राहायला हवं. कारण स्वरूपापासून आपण लांब गेलं की आपण आपल्याच नकळत कधी विषयांमध्ये अडकत जातो. हे आपले आपल्यालाही लक्षात येत नाही. याला संत सांगतात, विषय विषयाचा पडे पाडू || गोड परमार्थ लागे कडू || अन कडू विषय जीवाशी गोडू झाला || जेव्हा आपल्याला विषय गोड वाटायला लागतात तेव्हा आपण स्वरूपापासून भगवंतापासून खूप दूर आलो आहोत, हे स्वतःच्या मनाला समजून सांगायला हवं. आणि जेव्हा विषय ऐकायला बोलायला नको वाटतात तेव्हा मात्र आपण स्वरूपा जवळ आहोत. तो अवर्णनीय आनंद आपल्या चेहऱ्यावरून दिसून येत असतो. कारण आपल्या मनातील प्रत्येक भाव हा चेहऱ्यावर प्रगट होत असतो. म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात, 'आम्हा कळते बडबडीची वाणी अथवा सत्य" त्या ठिकाणी सावध व्हायला शिकलं पाहिजे. आपली इच्छा अपेक्षा ह्या सर्व भगवंतमय असायला हव्यात. याला तुकाराम महाराज म्हणतात, **हेची व्हावी माझी आस | जन्मोजन्मी तुझा दास || पंढरीचा वारकरी | वारी चुको नेदी हरी || संतसंग सर्वकाळ | अखंड प्रेमाचा सुकाळ || चंद्रभागे स्नान | तुका मागे हेचि दान ||** आपण संतांचा प्रत्येक विचार हा पिंडावरती समजून घ्यायला हवा कारण जोपर्यंत तो पिंडावरती घेत नाही तोपर्यंत तो आपल्याला समजून येत नाही याला संत सांगतात "पिंडी ते ब्रह्मांडी" जोपर्यंत पिंड कळत नाही तोपर्यंत ब्रह्मांड कळू शकत नाही. म्हणून स्वतःच्या पिंडावर संतांच्या विचारांचा विचार करायला हवा, जोपर्यंत विचारांचा विचार होत नाही तोपर्यंत ती मनात असणारा अहंकार भाव याचा लय होऊ शकत नाही, यालाच ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, "विचारूनही अहंकार सांडीजे मग अस्तिच वस्तू होईजे ||"जोपर्यंत विचाराने आपण सूक्ष्म होत नाही तोपर्यंत सूक्ष्मातला सूक्ष्म असणारा परमार्थ आपल्याला कळू शकत नाही. म्हणून संतांच्या विचाराप्रमाणे जायचं असेल त्यासाठी मनामध्ये दृढ विश्वास असायला हवा, भक्ती असायला हवी, प्रेम असायला हवं. कारण संत सांगतात, चाले हे शरीर कोणाचिया सत्ते | कोण बोलवितो हरीविण || देखवी ऐकवी एक नारायण | तयाचे भजन चुकू नका || पण आपण प्रत्येक गोष्ट करत असताना मनामध्ये अपेक्षा धरून ती करत असतो आणि म्हणून त्याचे फलित म्हणून आपल्याला सुखदुःख भोगावे लागतात. जर आपल्याला सुखदुःखाच्या पलीकडे जायचं असेल तर मनामध्ये कोणतीही इच्छा निर्माण होणार नाही याकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. कारण आपल्या मनामध्ये निर्माण होणारा वैराग्य विवेक ह्या गोष्टी काळानुरूप परिस्थितीनुरूप बदलतात. आपण कोणत्याही वृत्तीमध्ये स्थिर राहत नाही, गोष्टीकडे आपण पाहू त्या त्या गोष्टींचे प्रतिबिंब आपल्या मनावरती पडते आणि आपल्या मनातील वृत्ती निर्माण होऊ लागतात. आपलं लक्ष नसेल आणि पाठीमागे साप असेल तर भय नाही परंतु सापाला समोरून पाहता लगेच वृत्ती निर्माण होतात.अगदी ताद्वतच जसं समुद्र आहे त्या समुद्राच्या पाण्यामध्ये हवा मिसळली की लाटा तयार होतात. त्यातील हवा विरून गेली की पाणी आहे तसंच राहतं. परंतु आपण पाहत असताना फक्त लाटा किंवा समुद्र पाहतो, त्या पाण्याकडे आपलं लक्ष जात नाही. तसंच ज्या स्वरूपावर मन विषयात गुरफडल्याने सुखदुःख होतात ,आपण फक्त त्या मनाकडे पाहतो आपण त्यात तत्त्वाकडे स्वरूपाकडे पाहत नाही. आणि म्हणून आनंदाची आणि आपली गाठभेट होत नाही. म्हणून प्राप्त झालेला आनंद चिरकाल टिकून ठेवायचा असेल तर मनामध्ये कोणतीही इच्छा निर्माण होणार नाही असा प्रयत्न आपण करायला हवा. त्यासाठी मनामध्ये गुणही नको आणि दोषही नको. यालाच संत तुकाराम महाराज म्हणतात, **ज्ञानियांचा गुरु राजा महाराव | म्हणती ज्ञानदेव तुम्हा ऐसे || मज पामरा हे काय थोरपण | पायीची वाहाण पायी बरी ||**

# शिक्षण महाग झालंय...?



दिनेश संन्यासी
जालना

आधुनिक केसरी

**"मनुष्यात आधीपासूनच अस्तित्वात असलेल्या दैवी परिपूर्णतेचे प्रकटीकरण" म्हणजे शिक्षण अशी शिक्षणाची व्याख्या स्वामी विवेकानंद यांनी केलेली आहे. याचा अर्थ असा की जे मनुष्यात आधीपासूनच म्हणजे जन्मजात गुण आहेत त्यांचाच विकास होणार. विविध क्षेत्रातील यशस्वी असलेल्या लोकांच्या जीवनगाथांमधून आपण हे अनुभवलं आहे. याचाच विरोधी अर्थ असा झाला की जे गुण माणसात नाही ते कोणी टाकू शकत नाही. शाळा प्रत्येकास तसे शिक्षण देऊ शकत नाही, कोणत्याच बोर्डचा सिलॅबस हे करू शकत नाही. आपल्याकडे पेरणीपूर्वी शेतीचे परीक्षण करण्याची सुविधा आहे. कोणत्या जमिनीत कुठलं पीक घेणे योग्य राहील हे परीक्षणातून कळू शकते, परंतु दुर्दैवाने शिक्षणाच्या सुरुवातीला अशी चाचणी घेण्यात आपण कमी पडतोय. अवास्तव अपेक्षा, स्पर्धेत अपयशी होण्याची भीती, टाय, बूट, सूट, कोटाचे आकर्षण, इंग्रजीला भाषा न समजता "परिपूर्ण ज्ञान" अशा समजांना बळी पडून आपण मुलांच्या शिक्षणाची सुरुवात करत असतो.**

बन भी गया तो बहुत खराब इंजिनियर बनूँगा... थ्री इडियट सिनेमाचा हा डायलॉग सगळे जण विसरले असतील. आवडीच्या क्षेत्रातील निर्णयाविषयी बोलत असतानाच हा डायलॉग आलेला होता. (हसणं बंद होईपर्यंत थ्री इडियट चित्रपट बघावा, बरेच काही शिकण्यासारखे आहे.) परंपरेला सोडून जगावेगळा विचार करणं आपल्याला पटतं, त्यातलं सारं कळतं पण वळत नाही, त्याला कारण एकमेव असतं अयशस्वी होण्याची भीती. "कामात भरपूर आनंद घेता येणं, पोटाला पुरेल इतका पैसा कमवता येणं व प्रत्येक क्षणाचा आनंद घेता येणं" याशिवाय यशस्वी होण्याची व्याख्या दुसरी काय असू शकते. पण त्यासाठी अंगिभूत गुण ओळखणे खूप महत्त्वाचे आहे. शास्त्रीय भाषेत यालाच बुद्धिमत्ता असं म्हटलं आहे. नऊ बुद्धिमत्ता :- हॉवर्ड ग्रीन नावाच्या अमेरिकन सायकॉलॉजिस्टने वेगवगळ्या कौशल्यांबद्दलची मांडणी केली आहे. त्याच्या मते बुद्धिमत्ता ही एकच गोष्ट नाही. तिचे नऊ वेगवेगळे प्रकार आहेत. १. गणिती-तार्किक : गणितं सोडवणं आणि कुठच्याही विषयाचा तार्किक दृष्टिकोनातून विचार करणं हे गणिती-तार्किक बुद्धिमत्तेत येतं. २. भाषिक : भाषिक बुद्धिमत्ता म्हणजे भाषा, शब्द वापरण्याची क्षमता व आवड. वाचनावर प्रेम, शब्दांच्या वेगवेगळ्या छटांची जाण, व्याकरणाची मूलभूत जाण, ही भाषिक बुद्धिमत्ता असलेल्यांकडे असते. ३. अवकाश-कालात्म : त्रिमितीय विश्वात नक्की कुठला बिंदू कुठे आहे आणि काळाच्या प्रवाहात ते कसे वाहतात याची मनातल्या मनात ज्यांना उत्तम कल्पना करता येते त्यांच्याकडे अवकाश-कालात्म बुद्धिमत्ता आहे असं म्हणता येतं. ४. सांगीतिक : संगीताच्या सर्व पैलूंचं ज्ञान आणि त्यांबद्दलचं आकर्षण ही सांगीतिक बुद्धिमत्तेची देणगी आहे. ५. शारीरिक : स्वतःच्या शरीरावर, हालचालींवर उत्तम ताबा असणं म्हणजे शारीरिक बुद्धिमत्ता असणं. ६. नैसर्गिक : झाडं-पानं-फुलं, आकाश-पाणी-माती, पक्षी-प्राणी-कीटक यांसारख्यांचं आकर्षणं, त्यांच्याशी नातं जोडण्याची क्षमता ही नैसर्गिक बुद्धिमत्तेतून येते. ७. भावनिक-बाह्य : समाजात वावरताना इतर व्यक्तींशी जुळवून घेणं, त्यांच्याशी मैत्री करणं, त्यांच्या भावनांबाबत सहानुभूती बाळगणं ही कला भावनिक-बाह्य प्रकारच्या बुद्धिमत्तेमुळे येते. लोकसंग्रह करणं, दीर्घकालीन नाती निर्माण करणं, टीममध्ये काम करणं यासारखी 'सॉफ्ट स्किल्स' भावनिक-बाह्य प्रकारची बुद्धिमत्ता वृद्धिंगत केल्याशिवाय जमत नाहीत. ८. भावनिक- अंतर्गत : स्वतःच्या भावना, चिारप्रक्रिया, क्षमता आणि मर्यादांची योग्य जाण असणं आणि त्याहीपलीकडे आयुष्याचा मार्ग आखण्यासाठी त्यांचा वापर करता येणं हे भावनिक-अंतर्गत बुद्धिमत्तेमुळे जमतं. ९. अस्तित्वनिष्ठ : आपल्या मानवी अस्तित्वाबद्दल खोलात जाऊन विचार करण्याची क्षमता. या बुद्धिमत्ता एकमेकांशी संबंधित असतात. नक्की कुठच्या प्रकारची बुद्धिमत्ता जोपासावी? या प्रश्नाचं उत्तर म्हणजे ज्याची त्याची आवड जिथे आवड असते तिथेच सवडही असते आणि तिथे कंटाळा नसतो, उत्साह असतो. पुढे जाऊन त्याच बुद्धिमत्तेशी संबंधित क्षेत्र करिअरसाठी निवडावे (असे तज्ज्ञ मार्गदर्शकही सांगतात.) आपल्या मुलाचा किंवा मुलीचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर या नऊपैकी सहा-सातमध्ये तरी (किमान) प्रगती हवी. मुलांना समजून घेण्यासाठी पालकांनी या गोष्टीचा अभ्यास करायला हवा. नाही तर "जाना था जापान, पँहोच गये चीन, समझ गये ना..असं होतं.

# पावसाळ्यामध्ये जपा मुलांचे आरोग्य

आधुनिक केसरी

पावसाळा म्हटलं की, आनंदाची लहर आपोआपच सर्वत्र पसरते, श्रावण मासाच्या हर्षाला साथ हिरवाईने नटलेल्या निसर्गाचे सौंदर्य आपल्याला मोहबते. पण त्या गारव्याच्या ऋतूत काही आजाराने संक्रमण हे बरोबर येतात. पावसाळ्यात पाणी आणि हवेद्वारे पसरलेल्या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे सर्दी , खोकला, अतिसार,



कावीळ, मलेरिया यासारख्या आजाराचा धोका वाढतो. तसेच काही मुलांना खाण्यापण्यातून गॅस्ट्रो अँटी व्हायरसमुळे समस्या उद्भवते. लहान मुलांची रोगप्रतिकारशक्ती मोठ्या माणसापेक्षा कमी असल्याने त्यांची विशेष काळजी घ्यावी लागते. पावसाळ्यात मुलांचा आहार सात्विक आणि सौम्य ठेवावा. जेणेकरून पोषक तत्त्वांची पूर्तता होईल. कोणते पदार्थ टाळावेत, हे जाणून घेणे महत्त्वाचे असते. पावसाळ्यातील आहार हिरव्या पालेभाज्या अत्यंत पौष्टिक असल्या तरी पावसाळ्यात त्यांचे सेवन टाळावे. असे अनेक डॉक्टर सुचवतात. या ऐवजी ओटस, गहू, तांदूळ यासारख्या पदार्थांचा आहारात समावेश करावा. पालेभाज्या काळाच्या असतील तर स्वच्छ धुऊन आणि शिजवून खावावे, कारण पावसाळ्यात आद्रतेमुळे पालेभाज्यावर माती आणि जिवाणू, चिकटलेले असतात. ज्यामुळे संसर्गाचा धोका वाढतो. दही शरीराला थंडावा देते, सर्दी पडसं खोकला घशात समस्यांना निमंत्रण मिळतं. मुलाने ते आजारी पडल्यास वेळेवर उपचार पण यामुळे खवखव अशा दहाच्या सेवन केल्यास आणि करणे महत्त्वाचे आहे अन्यथा संक्रमण वाढू शकते. दही ताजे नसेल तरीही समस्या उद्धव शकते. पावसाळ्यात पचनक्रिया कमजोर होते, त्यामुळे कॉफी पिण्याने पचनक्रिया आणखी कमी होते. मुलांना कॉपी देण्याऐवजी फिल्टर केलेले किंवा उकळलेले पाणी द्यावे. मुलांना स्ट्रीट फूड्स पासून दूर ठेवावे. घरी बनवलेल्या पदार्थांमध्ये स्वच्छता राखावी आणि स्वयंपाक करताना स्वच्छ पाणी वापरावे. चायनीज पदार्थ रस्त्यावर तयार केले जातात, जे आरोग्य आहेस हानिकारक असतात. दूषित पदार्थांचा वापर फ्लोरीवरचा वापर यामुळे मुलांना आजार जडू शकतात पावसाळ्यात चाट, भजी, भेळ खाणे हानिकारक असते. या पदार्थांमध्ये वापरले जाणारे घटक स्वच्छतेची काळजी न घेता तयार केली जातात, त्यामुळे अतिसार, कॉलरा, कावीळ होऊ शकते. रस्त्याच्या कडेला मिळणारे दिवशीही हानिकारक ठरू शकतात. त्यापेक्षा ताजे फळे, सलाड खाण्याचा सल्ला दिला जातो. फळांचा ज्यूस घरी तयार करून मुलांना देणे अधिक सुरक्षित असते त्याकरिता पालकांनी आपल्या पाल्याच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे हे काळाची गरज आहे.

सुनील पुजारी सोलापूर
99 230 26 230

# मागणें ते आम्हा नाहीं हो कोणाशी।

आधुनिक केसरी

**बोला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम पंढरीनाथ महाराज की जय, चला माऊली, चला माऊली ज्ञानबा ,तुकाराम ज्ञानोबा तुकाराम चा जयघोष करीत वारकरी देहभान विसरून पंढरीच्या दिशेने निघाले आहेत त्यांच्या मुखात, पाहू द्या रे मज विठोबाचे रूप। लागलीसे भूक डोळा माझ्या।।असे म्हणत अंतःकरणातून विठुरायावर प्रेम करणारे लाखो वारकरी गावागावातून पंढरीच्या दिशेने निघालेले आहेत. त्यामध्ये शेकडो जातीची वारकरी एकत्रित येऊन राष्ट्रीय एकात्मता दर्शवल्याने सर्वत्रच सलोख्याचे व सौहार्दाचे वातावरण तयार झाले आहे. कितीतरी दिंड्या व पालख्या मधून संताच्या अंभगाचे गोड आवाज कानी येत आहेत.अवघे गरजे पंढरपुर । चालला नामाचा गजर। टाळ घोष कानीं येती। ध्यानी विठ्ठलाची मूर्ती।खरोखरच या पृथ्वीतलावर असणारा हा सुख सोहळा इतरत्र कुठेही नाही म्हणून तो पाहण्यासाठी वारकरी पंढरीला जात आहे.**



असा सुख सोहळा स्वर्गी नाही. पंढरीच्या वारीला निघालेला वारकरी फक्त दर्शन घेऊन परत येतो, एवढाच उद्देश त्यामागे नाही, या वारीमध्ये भक्ती बरोबर नैतिकता, आदर, सदाचार, सहिष्णुता,



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

विवेक, चारित्र्य, बंधुभाव, समानता, परोपकार ही जीवनमूल्ये शिकायला मिळतात. कसलाही धर्मभेद, जातीभेद, वंशभेद लिंगभेद येथे नाही. स्वार्थीपणा व ढोंगीपणाचा येथे काही फायदा होत नाही. शुद्ध मनाने वारी केली जाते. पंढरीचा पांडुरंग हा साधा भोळा,नवसाला पावणारा, सहज उपलब्ध होणारा, कटेवर हात ठेवून प्रत्येकाचे गा-हाणे ऐकणारा आहे. जळी, स्थळी, पाषाणी तो भरून उरला आहे. म्हणून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली म्हणतात. सर्व सुखाचे आगर । बाप रुखुमा देवीवर संसारात राहुन विठ्ठलाची भक्ती करता येते. त्यामुळे वारकरी शेतीतील पेरणीची कामे आटपून पंढरीच्या वारीला निघाला आहे. दिंडीत वारकरी एकमेकांना माऊली म्हणून हाका मारतात. येथे वयाचे बंधन नाही, शंभरी उलटून गेली तरी उत्साह कमी झालेला नाही, इतकी ऊर्जा या वारीमध्ये कशी मिळते हे कधीही न सुटणारे फार मोठे कोडे आहे, म्हणून अनेकांना वारक-यामध्ये पांडुरंग दिसतो. पंढरीचा पांडुरंग हा सर्वांना हास्य वदनाने आनंदी करतो. भरभरून आशीर्वाद देतो. म्हणून कोणत्याही वारकऱ्याला पंढरीच्या पांडुरंगाची भीती वाटत नाही. कारण त्यांच्या हातात कोणतेही आयुधे नाहीत. म्हणून बहुत सुकृताची जोडी। म्हणून विठ्ठली आवडी असे भक्त म्हणतात. परमेश्वराला प्रसन्न करून घ्याचे असेल तर तुम्हाला तीर्थव्रत, जप, तप अजिबात करण्याची गरज नाही.
योग, याग, व्रतवैकल्ये या साधनाची बिलकुल आवश्यकता नाही, म्हणून संत सावता महाराज म्हणतात. प्रपंची असुनी परमार्थ साधावा। वाचे आळवावा पांडुरंग ।।
मोट, नाडा, विहीर दोरी। अवघी व्यापली पंढरी।।
अशा पद्धतीचे पांडुरंगाचे वर्णन ते अभंगातून करतात. ते विठुरायाला कधीही भेटण्यास पंढरपूरला गेले नाहीत, प्रत्यक्ष पंढरीचा पांडुरंग त्यांना भेटायला आले. ते वारकरी संप्रदायातील श्रेष्ठ आणि ज्येष्ठ संत म्हणून त्यांचा लौकिक आहे.अध्यात्म आणि भक्ती,आत्मबोध,लोकसंग्रह, कर्तव्य आणि सदाचार याची बेमालूम सांगड त्यांनी घातली.अनिष्ट रूढी, प्रथा,परंपरा,अंधश्रद्धा,कर्मटपणा, दांभिकता व बाह्य अवडंबर याबाबत त्यांनी कोणाचीच भिडभाड ठेवली नाही. पंढरीच्या पांडुरंगा कडे ते काय आळवणी करतात ते आपल्याला अभंगाच्या पहिल्या चरणात पाहायचे आहे. मागणें ते आम्हा नाहीं हो कोणाशी। आठवावे संतासी हेचि खरें।।1।। हे परमेश्वरा तुझ्याकडे आम्ही अशी आळवणी करतो की आम्हाला कोणाजवळही कुठेही, काहीही मागून घ्यायचे नाही,आम्ही कोणाला त्रास देणार नाही,आम्ही कोणापुढे हात पसरणार नाही, फक्त आम्हाला संतांची आठवण यावी ते आमच्या सदैव स्मरणामध्ये कायम राहावेत हीच आमची खरी मागणी परमेश्वराकडे आहे. त्यामुळे आम्हाला त्यांनी भेटावं हीच मनीषा आम्ही बाळगतो.
अशी विनवणी संत सावता माळी परमेश्वराकडे मागतात, पूर्ण भक्त आम्हा ते भक्ती दाविती। घडावी संगती तयाशींच।।2।। अभंगाच्या दुसऱ्या चरणात संत सावतानी आपण भक्ती करण्यासाठी तयार आहोत, संत हेच परिपूर्ण आहेत, त्यांनी आम्हाला भक्तीचा योग्य मार्ग दाखवावा.
तुमच्या सहवासामध्ये आम्ही नेहमी असावं ही आमची मनोकामना आहे.चांगल्या व्यक्तीसोबत राहिल्यानंतर चांगलेच गुण मिळतात.वाईट यासोबत राहिल्या नंतर वाईटच घडते, म्हणून ते येथे म्हणतात.आम्हाला चांगली तुझी संगत घडू दे .या संगतीचा आम्हाला सतत लाभ व्हावा होऊ दे. परमार्थासाठी प्रपंचाचा त्याग करण्याची गरज नाही. आपल्या मळ्याचा माळी प्रत्यक्ष पांडुरंगच आहे. आपण शेतीत थोडे बी पेरले तर त्याचे कितीतरी पोते धान्य होते. ही विठ्ठलाची कृपा आहे. म्हणून त्यांनी भक्तीचे मळे फुलविले. सात्वीक फुले देवाला वाहिली ,त्याचा सुगंध महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात दरवळला आहे. त्यांच्या मळ्यात कोणत्याही बाजूला गवत उगलेले ते काढून स्वच्छ ठेवत असत. म्हणून त्यांनी अखंड पांडुरंगाचे नामस्मरण करून आषाढी कार्तिकीची वारी, रात्रीचे भोजन,
नामसप्ताहाच्या पंक्ती, कीर्तन, प्रवचन या सर्व गोष्टी परमेश्वराच्या सानिध्यात राहण्यासाठी ते करत असत. धार्मिक अंधश्रद्धेतून लोकांना बाहेर काढण्यासाठी नेहमी प्रयत्न करतात पशुहत्या,पक्षीहत्या त्यांना मान्य नव्हती. मानवाचा आहार शुद्ध शाकाहारी असावा. असे त्यांना सतत वाटे. देवाच्या नावावर अंगारे -धुपारे करू नये, असे ते प्रबोधनवादी संत होते.म्हणून ते परमेश्वराकडे एकच मागणी मानतात .की तुमची संगत आम्हाला हवी आहे. संत सावता म्हणे कृपा करी नारायणा. देव तोची जाणा असे मग परमेश्वराला ते म्हणतात. आमच्यावर कृपा कर आम्हाला संतांची भेट घडव. कारण संत हेच आमचे परमेश्वर आहेत. म्हणून परमेश्वराला ते नेहमी मागणे मागतात. तुमची संगत आम्हाला द्या. हीच मागणी त्यांनी केलेली आहे. संत सावता दिवस रा-त्र आपल्या शेतात राब राब राबतात. सारखे पांडुरंगाचे नाम त्यांच्या मुखात असते. ज्या ज्या ठिकाणी सावता रहात असे त्या त्या ठिकाणी त्याला हरीच दिसत असे चला तर सृष्टीमध्ये परमेश्वर भरलेला आहे त्याचे अस्तित्व सर्वत्र पसरलेला आहे काळे आईची ती सेवा करीत होते म्हणून आई त्यांना भरभरून देत होती .त्यांच्या फुललेल्या शेतीकडे पाहून लोक कौतुक करत होते. कांदा मुळा भाजी ।अवघी विठाई माझी असेही सावता महाराज परमेश्वराला विनंती करतात की, आम्हाला संतांची भेट घडून द्यावे, वाईट लोकांसोबत संगत नको म्हणून ते परमेश्वराला मागणी घालतात संताच्या भेटीचा ध्यास त्यांच्या अभंगातून व्यक्त होतो .सावता म्हणे कृपा करी नारायणा। देव तोचि जाणा असे मग।।3 ।। अभंगाच्या तिसऱ्या चरणात संत हे परमेश्वराचे रूप आहे. म्हणून हे नारायणा, माझ्यावर कृपा कर. आणि मला संताची गाठ घालून दे. असे अभंगातून भक्ताच्या हृदयातील खरा कळवळा ते शब्दात व्यक्त करतात. संत हेच आम्हाला खरा भक्ती मार्ग दाखवतात ०ते पूर्ण भक्त आहेत. त्यांच्यासोबत आम्ही राहिलो की खरी भक्ती काय असते? हे आम्हाला कळते म्हणून संत संगे सर्वकाळ आम्हाला त्यांची सोबत दे.असे विनवणी ते पांडुरंगाकडे करताना दिसतात. संत सावता हे परमेश्वराला त्यांच्या अंतःकरणापासून विनवणी करतात.आम्हाला संतांची भेट घालून दे संत हेच खरे पूर्ण भक्त असून ते भक्तांना भक्तिमार्ग दाखवतात संपूर्ण अभंगात त्यांच्या देवाला भेटण्याची तळमळ आपल्याला दिसून येते म्हणून तुकाराम महाराज पंढरीच्या पांडुरंगाकडे फक्त तुझा सहवास आम्हाला दे असे म्हणतात. आज कालचा तरुण असे काही मागील का असे तुम्हाला वाटते. आजचा तरुण परमेश्वराकडे काय मागत असेल ? हा संशोधनाचा विषय आहे. आजच्या तरुणाकडे संगत चांगली नाही. वाईट संगत आहे.त्यामुळे तो वाया जात आहे. तो रस्त्यावर येत आहे.आणि दुसऱ्याला तो पैसे मागत आहे. त्यामध्ये त्याचे समाधान नाही म्हणून तुम्ही परमेश्वराचं सहवास मागा सगळेच तुम्हाला मिळेल अशा शब्दांत संत सावता परमेश्वराला विनवणी करतात. आषाढी वारीच्या सर्व भाविक भक्तांना विठूमाऊली प्रतिष्ठान गोकुळवाडीच्या वतीने खूप खूप शुभेच्छा

# पळवाट...

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग 56

ज्यांना कामाचा कंटाळा असतो त्यांच्याकडे पळवाटा खूप असतात. काही लोक तर प्रत्येक कामातून पळवाट काढण्यात तरबेज असतात. जसं लहान मुलांना शाळेत जाण्याचा कंटाळा आला की त्यांचं पोट दुखतं. लिहिण्याचा कंटाळा आला की हात दुखतो. जेवण आवडलं नाही की भूक नसते. अशा पळवाटांची सवय कदाचित लहानपणापासूनच लागते. बसमध्ये संकटकालीन मार्ग असतो. म्हणजे ती पळवाटच असते .अशा काही पळवाटा असाव्यात, पण प्रत्येक वेळी, प्रत्येक ठिकाणी पळवाटा काढून कसं जमेल .?
ते कार्य मग पूर्णत्वास जाणारच नाही. एखादी मोठी इमारत असेल तर तिच्यात काही गुप्त मार्ग असतात. संकट काळात वापरण्यासाठी. पण काही कामचुकार त्या मार्गाचा वापर पळवाटा म्हणून करतात .जसं यशाकडे जाण्यासाठी कोणताही शॉर्टकट नसतो. तसंच ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी पळवाटेने जाऊन उपयोग नाही. तिथे सरळ मार्गानेच जावं लागेल. कधी काही एकत्रित कार्यक्रम असतील तर काही महाभाग तिथून काढता पाय घेतात. पळवाट शोधतात. यात दुसऱ्यांना मदत करण्याची त्यांची भावना नसते. उलट जे मदत करतात त्यांना उचकून देतात. अरे बाबा तू नको करू काही पण इतरांना करू दे. उदाहरणार्थ दत्ताला शेजारचे काका म्हणाले तू ड्युटीला जात आहेस तर येताना मेडिकल मधून माझ्या गोळ्या आणशील .. दत्ताच्या पळवाटा बघा.. तेव्हा मेडिकल बंद असते.. तो फार महागडा आहे... माझ्या रस्त्यात मेडिकल नाही.. तिकडून सिग्नल असतात मी दुसऱ्या रस्त्याने जातो.. तो औषधी बदलून देत नाही.. त्याचा माल बोगस असतो... मी विसरलो..
तुम्ही जेनेरिकच घ्या.... त्याच्याकडे जेनेरिक नाही.... अशा अनेक पळवाटा दत्ता सांगतो. समाजात असे दत्ता भरपूर असतात पळवाटा शोधणारे आणि सांगणारे. दुसऱ्यांना मदत करण्याची इच्छा नाही किंवा इच्छा नसते. कोणी काम करत असेल तर त्याला नीट करू द्यायचे नाही. किंवा त्यांना नावं ठेवायची. पळवाटा शोधणारे लोक समाजापासून दूर जातात. समाजऋण त्यांना फेडायचे नसते. चांगल्या कामापासून पळवाट काढायची आणि बेगडी लोकांसोबत वेळ वाया घालवायचा.निरर्थक गप्पा केल्याने काहीही साध्य होत नाही. आयुष्याचा किती महत्त्वाचा वेळ हे लोक वाया घालवत असतात. साधी सरळ वाट सोडून आडमार्गाची पळवाट लोकांना सोपी वाटते...

# लय भारी सुगरण

आधुनिक केसरी



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

आज आपण पिठल्याचा अजून एक नवीन आणि खमंग, टेस्टी असा प्रकार बनवू की जे खास पद्धतीने बनते. पिठलं हा महाराष्ट्रीयन पारंपारीक पदार्थ असा आहे की जे बनवण्यासाठी कमीतकमी साहित्य तर लागतेच आणि वेळ सुद्धा खूपच कमी लागतो. म्हणूनच घाईच्यावेळी झटपट भात पिठलं किंवा पिठलं भाकरी बनवली की झाला स्वयंपाक तयार. पूर्वी फोन नव्हते तेंव्हा परगावाहून अवेळी अचानक कोणी पाहुणा यायचा, तेंव्हा बाहेर हॉटेल्स नसायची अशावेळी लांबून दमून आल्यावर भूक ही तशीच भरपूर लागलेली असायची त्या आलेल्या पाहुण्याला. कारण आतासारखे वाटेत काहीच खाण्यापिण्याची सोय नव्हती, दळणवळणाची फारशी सोय नव्हती. त्यामुळे पाहुणे आलेले दिसले की गृहिणी आधी पिठलं भात ,भाकरी बनवायला लागायच्या . म्हणजे हातपाय धुवून थोडे पाणी पिऊन होईपर्यंत पाने वाढली जायची. घरात बाकी काही नसले तरी साठवणीसाठी भाज्या नसल्या तरी उसळींसाठी आणलेली कडधान्य तरी असतातच. मग त्यातल्याच एखाद्याचे झटपट खमंग पिठलं बनवणे हा सुगरणींच्या पाककौशल्याचा एक नमुना आज आपणही असंच एक खूपच आगळे वेगळे असे वाटाण्याचं पिठलं बनवू. चला मग लगेंच...

**साहित्य :** 1 वाटी अख्खा वाटाणा, 1 वाटी बारीक चिरलेला कांदा, 8..10 लसूण पाकळ्या, किंचित आल्याचा तुकडा, 1 वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, पाव वाटी चिंचेचा कोळ, लिंबाएवढा गुळ, 1 चमचा धनेजिरे पावडर, 7..8 हिरव्या मिरच्या, 2 चमचे नारळाचा चव , कढीपत्ता, तेल,चवीनुसार मिठ, फोडणीचे साहित्य.

**कृती :** प्रथम वाटाणा कढई मध्ये थोडे मिठ घालून त्यात खमंग भाजून घ्यावा. तो छान हलका होईल. मग तो कढईतून चाळणी मधुन मिठ चाळून बाजूला काढून ठेवावा. मग थोडासा कोमट झाला की मिक्सर मधून थोडासा जाड सर दळून घ्यावा . नंतर मिक्सर मधून आलं, लसूण ,हिरवी मिरची ,निम्मी कोथिंबीर , नारळ हे सर्व फिरवून वाटण बनवून घ्यावे . गॅसवर एका बाजूला साधारण पाऊण लिटर पाणी गरम करण्यास ठेवावे . दुसरीकडे कढईमध्ये साधारण 3 चमचे तेल घालून गरम करण्यासाठी ठेवावे . ते व्यवस्थित गरम झाले की मोहरी ,जिरे , हिंग , कढीपत्ता , हळद घालून थोडासा कांदा वरून घालण्यासाठी ठेवून बाकीचा घालावा . तो थोडासा कच्चेपणा जाऊन पारदर्शक झाला की त्यात वाटण घालावे व ते व्यवस्थित परतावे . मग धनेजिरे पावडर किंवा आवडत असेल तर थोडा गरम मसालाही घालावा . त्यानंतर वाटण्याचे जाडसर बनवलेले पीठ घालून त्यात थोडे थोडे गरम पाणी घालावे व छान मिक्स करावे म्हणजे गाठी होणार नाहीत . पाणी थोडे जास्त घालावे कारण हे न वाफवता केलेले असल्यामुळे थोडे जास्त उकळावे लागते . त्यासाठी जास्त पाणी घालावे . मग चिंचेचा कोळ, गुळ चवीनुसार मीठ घालून व्यवस्थित ढवळावे . नंतर थोडी कोथिंबीर घालून छान शिजवले की सर्व मस्त एकजीव होऊन मस्त टेस्ट येते . शेवटी सर्व्हिंग बाऊल मध्ये काढून त्यात बाकीचा सर्व कांदा घालावा . कच्च्या कांद्याची चव मध्येच खूप भन्नाट लागते . आता आपले हे एकदम वेगळे वाटाण्याचे पिठलं तयार आहे .
एका ताटात छोट्या बाऊल मध्ये हे गरम गरम पिठले घालून भाकरी सोबत जेवण्यास द्यावे .

**वैशिष्टय:** वाटाणे मिठावर भाजून घेण्याऐवजी भट्टीवर मिळतात ते आणले व मिक्सर मधून भरडून पिठले केले तरी चालते . चिंचगुळामुळे एक आंबट गोड छान चव येते . कांद्याची पात एकदम बारीक चिरून वरून घातली तर खूप सुरेख हिरवेगार दिसतेही आणि चावीलाही बेस्ट लागते . हे नुसते बनवून बाऊल मध्ये गरम गरम काढून त्यात कांद्याची पात ,बारीक शेव घालून चाट मसाला भुरभूरावा व आवडत असेल तर किंचीत लिंबाचा फ्रेश रस घालावा व खाण्यास द्यावा . हे ब्रेड सोबतसुद्धा खूपच टेस्टी लागते . मधल्यावेळी खायला बनवण्यासाठी सुद्धा मस्त डिश आहे . नक्की बनवा .



# चित्ताचें आसन। तुका करितो कीर्तन ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**तुकोबा संसाराचे एक महान शल्य चिकित्सक! त्यांचे चरित्र आणि अभंग सर्वच रोगांवर मुजारत औषध आहे. तुकोबांचे संपूर्ण आयुष्य संघर्षात गेले. घर सांभाळता सांभाळता तुकोबा संसारात मेटाकुटीला आले. दोन बायका, एकीला दम्याने ग्रासलेले तर दुसरी स्वभावाने एकदम कडक लक्ष्मी! असे असतांना 'घरचं झालं थोडं अन् व्याह्याने धाडलं घोडं.' दुष्काळाने घेरले. संसार जर्जर झाला. आघाताच्या कचाट्यात सापडलेला माणूस वादळातील चिपाडासारखा क्षीण-दिन होउन जातो. सैरभैर होतो. त्याला काहीच सुचत नाही. मग स्वतःचे नियंत्रण स्वतःवर रहात नाही. जवळपास सर्वांच्याच जगण्यात असे आणीबाणीचे प्रसंग अनेकदा येतात. या प्रसंगीच माणसाची खरी ओळख होते.**

संसार मोठा मजेशीर आहे. जो सर्वांनाच जाळून-पुरून उरतो तो संसार! विद्वान, अनेक ग्रंथांचे वाचन करणारे, मोठमोठी तपश्चर्या करणारे तपस्वी, चिंतनशील व्याख्याते, पंडित, ज्ञानी वगैरे वगैरे लोक संसाराच्या एका फटक्यात गारद झालेला इतिहास अजून जग विसरले नाही. अनेक वाचक-चिंतक, स्वतःला हुशार समजणारे लोक कधी काय वर्तन करतील याचा नेमच नाही. यालाच तर संसार म्हणतात! विश्वामित्र असो की रावण, राम असो की कृष्ण, बुद्ध, पैगंबर असो की येशू, संसाराने कुणालाच सोडले नाही. संघर्ष आणि संघर्ष सर्वांच्याच वाट्याला आला. त्यातून मार्ग काढतांना आपले लक्ष विचलित न होऊ देता ही मंडळी पुढे चालत राहिली, परिणामी त्यांची दिशा जगाने स्वीकारली. मित्रहो, धर्म म्हणजे गुणधर्म! तहान-भूक लागते. गरम पोळते, थंड झोंबते! झोप सर्वांना हवीच आहे. सर्व माणसे सारखीच आहेत. कुणालाही निसर्गाने एखादी गोष्ट अथवा एखादे अंग जास्त किंवा कमी दिले नाही. सर्वांना समानतेने जन्माला घालतो आणि शेवटी मातीत मिसळतो तो निसर्ग न्याय सर्वांना समानच! माणसाने माणसाला वेगवेगळ्या रंगात, धर्मात, वर्णात, जातीत विभागून आपला स्वार्थ साध्य केला. लहान लेकरू पहा ना. त्याला काय देणे घेणे नसते. ते सहज टाळी वाजवते, हसते, बागडते! तिथे आपल्याला खरा माणूस पाहायला मिळेल. जसजसा माणूस प्रगत झाला, मोठा झाला असा डांगोरा पिटला गेला, तसतसा माणूस संकुचित, मर्यादित, दुष्ट, दुर्जन होत गेला. मग त्याला स्वार्थाने विळखा घातला. विविध अयामाने त्याचे निखळ-निरागस जीवनतत्व व्यापून त्याच्यातील खरा माणूस अक्षरशः झाकाळून गेला, मरून गेला! अशा मरगळलेल्या माणसातील जागृती, चैतन्य मानव्य भाव चेतविण्यासाठी महान विचारवंत सोबतीला असणे काळाची नितांत गरज बनली!

दिशादर्शक, होकायंत्र माणसे अलीकडे शोधतांना अट्टहास करावा लागतो. ते कठीण असेल तर विचारवंत, ग्रंथ यांची सरळ-सहज सोबत करून राहिल्यास आपले वर्तमान सुसह्य होऊ शकते. अडचणी आणि आडमार्ग सर्वांनाच छळतात. सूर्य सगळीकडेच समान प्रकाश देतो. काळ कितीही आघातपूर्ण असला तरी त्या आघातांचा सामना करण्याची क्षमता विचाराने आपल्यात यायलाच हवी. अनेक माणसे विविध ग्रंथ वाचतात परंतु त्यातील विचार अंगीकारत नाहीत, परिणामी त्या ग्रंथ वाचनाचा योग्य विनियोग झालेला दिसत नाही. अनपढ, अज्ञानी, अशिक्षित माणसात आणि वाचक माणसात काहीच फरक दिसत




नाही. ही माणसे म्हणजे पढत मूर्ख! कधी कधी न शिकलेली ज्ञानोबा-तुकोबा-बहिणाबाई चौधरी यांच्यासारखी माणसे आपल्यासारख्या डिग्रीचे पुटोळे घेऊन फिरनारांच्या कानाखाली सणसणीत चपराक देऊन शांत करतात. त्यासाठी या लोकांचे अनमोल विचार समजून घ्यावे लागतील. तसे विचार आणि लेखन सोबतीला हवे असतांना जगद्गुरू तुकोबाराय पटकन धावून येतात. हातात हात घेऊन आपुलकीने

अवघ्या उपचारा। एक मनचि दातारा ॥१॥
घ्यावी घ्यावी माझी सेवा। दिन दुर्बळाची देवा ॥धृ॥
अवघियाचा ठाव। पायांवरी जीवभाव ॥२॥
चित्ताचें आसन। तुका करितो कीर्तन ॥३॥ (१२९१)

असे चार मोलाचे शब्द जाहीरपणे सांगून जातात. तुकोबांची वारकरी भक्ती आणि त्यांचे जीवन सर्वांच्यासमोर आहे. तुकोबांना भक्तीचे बाळकडू घरातून मिळाले होते. ज्याप्रमाणे वडिलोपार्जित संपत्ती पुढच्या पिढीकडे चालत येते तशी पंढरपूरची वारी, भजन, कीर्तन, लेखन परंपरा तुकोबांना वाडवडिलांकडून प्राप्त झाली होती. आपल्या शेतातील असणारे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, त्यात चालणारे नित्यनेम तुकोबांना करणे क्रमप्राप्त होते. असे असतांना तो नेम सहजतेने भाग त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला. सहज भजन, त्यातून गायन आणि नंतर कीर्तन असा अनायास प्रवास घडत गेला. त्यात तुकोबाराय अभंग लिहू लागले. लोकांना त्यांच्या अभंगात आपले भंगणारे जीवन सापडू लागले. जीवनाचे दोर कुठेतरी तुकोबांच्या अभंगांसी जुळू लागले. कीर्तन करणारे तुकाराम अभंग लिहिताहेत हे ऐकून त्यांच्या भोवतालच्या लोकांना आनंद होणे साहजिक होते. तुकोबा लिहितांना सहज आणि सोपे लिहितात. याचा परिणाम म्हणजे लोकांना त्यांचे शब्द हे आपल्याच अंतर्मनाचा आवाज वाटू लागला. त्यात तुकोबा स्वतः संसाराने गांजलेले होते. असे असतांना देखील ते आपला नित्यनेम करू लागले. संसारापेक्षा तुकोबांना एकांत प्रिय वाटू लागला. विटलेला संसाराची त्यांना किळस यायला लागली. यातूनच तुकोबा तासंतास एकांतात बसू लागले. लोकांत नकोसा झाला. आपले मन आणि त्याचा सरळ आपल्या शब्दांशी संबंध जोडतांना तुकोबाराय चिंतनशील अभंग लिहायला लागले. कोणत्याही कामासाठी माणसाचे मनच त्यांना प्रधान वाटू लागले. त्यातूनच वरच्या अभंगांसारखे अनेक अभंग तुकोबा सहज लिहून गेले. नियमित विचार करण्याच्या ओघात तुकोबाराय स्वतःच्या आणि तुमच्या-माझ्या मनाला काही महत्वपूर्ण निर्देश देतात. त्यांच्या इतर अभंगांप्रमाणे हा अभंगही तेवढाच मौल्यवान आहे. प्रस्तुत अभंगात तुकोबाराय त्यांनी स्वतःकाय केले याचा लेखाजोखा मांडतात. जीवनात सर्वच बाबींवर एकमेव उपाय म्हणजे मानवी मन! अमेरिकेतील सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ, सर्जन आणि जगप्रसिद्ध लेखक डॉ.बर्नी सिगेल (एम.डी.) आपल्या लव्ह, मिडीसीन अँड मिरेकल या ग्रंथात मानवी मनाच्या अनुषंगाने अनेक महत्वपूर्ण बाबी कृतीपूर्ण कार्यक्रम आखून जगासमोर आणतात. "अनेक धर्म अगर तत्वज्ञान आपला मार्ग आपण कसा शोधावा हे सांगतात. त्या सर्वांचे एकच सांगणे असते की; आपल्या भावनाकडे लक्ष द्या. तुम्ही जर तुमच्या शरीराने दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष केले तर त्याचे परिणाम तुम्हाला सोसावे लागतात. जो स्वतःच्या जीवनाचा शोध घेत राहतो तो ते गमावतो आणि जो ते हरवून जाण्याची इच्छा बाळगतो त्याला ते मिळते." "तुमच्या मनात जे दडले आहे ते जर तुम्ही व्यक्त होऊ दिले नाही तर त्या मनात दडलेल्या गोष्टीमुळे तुमचा नाश होईल."माणसाने नेहमी स्वतःचा आवाज ऐकला पाहिजे." त्यामुळे तुकोबाराय इथे सर्व बाबीवर मन हेच एकमेव औषध आहे याचा वारंवार उल्लेख करतात. मन नियंत्रित करणे म्हणजेच ईश्वराची सर्वोच्च सेवा! मनापुढे आपण आणि तुकोबाराय दुर्बळ आहोत. तुकोबाराय इथे मानस सेवा करतांना आपल्या अनुभवातून सांगतात. हीच सेवा सर्वोच्च सेवा आहे. मन हे अवघ्या महत्वपूर्ण गोष्टींचा ठाव आहे. त्यासाठी मन भावनेने तुकोबाराय स्वतःतील आणि समोरच्या देवाला शरण आले आहेत. तुकोबा मनापासून सुरु केलेल्या प्रवासाला चित्तापाशी आणून ठेवतात. चित्ताचें आसन। तुका करितो कीर्तन हा तुकोबांचा आपल्याला आणि कीर्तनकारांना मोठा मोलाचा संदेश आहे. कीर्तन म्हणजे आंतर्बाह्य निर्मळ होऊन लोकांना सरळ-सोपे जीवन समजावून सांगणे! ते प्रत्येकजण करू शकतो. एक शिक्षक हा उत्तम कीर्तनकार असतो. मन आणि चित्तातील फरक समजून घेणे गरजेचे आहे. मन माणसाला अमर्याद ठेवते. त्याला आणखी हवे असते. सत्ता, संपत्ती, वासना, इतर इच्छा मन करतंच असते. त्याला आवर घालणे भल्याभल्यांना जमले नाही, तेच करायला सांगतात तुकोबाराय! मन आपल्याला कधीच असं वाटू देत नाही की आपण संपृक्ततेच्या टप्प्यावर पोहोचलो आहोत. ते नेहमी अतृप्त असतं. त्यासाठी त्या मनाला चित्ताची जोड देणे अत्यावशक आहे. चित्त म्हणजे आपला विवेक! मनाच्या नियंत्रणाचा पुढचा महत्वपूर्ण टप्पा म्हणजे आपला विवेक! इथे तुकोबाराय स्वतः चित्ताचे आसन घालून कीर्तन करतात. अगोदर मनाला आटोक्यात ठेवत ठेवत त्यांचा मुक्काम चित्त आसनावर येवून थांबतो. इथे तुकोबाराय महान तपस्वी-योगी आहेत. जे अनेकांना साध्य झाले नाही ते साध्य झाल्याचा हा जिवंत दाखला आहे. माय-बापहो! तुकोबाराय समजून आपल्या सोबतीला ठेवा. त्या लोक कवीला समजून घ्या. आपली विद्वत्ता-संपत्ती वगैरेचा आनंदाने उपभोग घ्यायचा असेल तर तुकोबांना पर्याय नाही. तुकोबांचे अभंग संसारातील सर्वच प्रश्नावर एकमेव उत्तर आहे. तुकोबा समजून घेतांना आपल्या जीवनात हे विचार रुजणे क्रमप्राप्त वाटते. आज आपण मिडिया आणि इंटरनेटवर सगळे जग एका क्लीकवर जरी आणत असलो तरी आपण आपल्याला कंट्रोल करू शकतो का? करत आहोत का? या सर्वांची उत्तरे आपल्याला तुकोबांच्या अभंगात सापडतील. त्यासाठी नेमाने तुकोबांचा गाथा वाचायला हवा. तो समजून जीवन आनंदाने जगणे सहज शक्य आहे. तेंव्हा चला, तुकाराम आपला सन्मित्र करूयात! जय तुकोबाराय!

# भाजपा राज थांबवायचे असेल तर ?



सागरकुमार झनके
संपर्क क्र. 9822575244

आधुनिक केसरी


**एखादा गड किल्ला सर करायचा असेल तर यासाठी सूक्ष्म नियोजन व तशी तयारी असावी लागते ही छत्रपती शिवाजी महाराजांची कूट नीती होती. म्हणूनच त्यांनी मुठभर मावळ्यांच्या जोरावर स्वराज्य निर्माण केलं,याला इतिहास साक्ष आहे. आयुष्यात त्यांनी कधी कधी दोन पावलं मागे येऊन नंतर गरुड झेप घेतली.**

जळगाव जा. विधानसभा मतदार संघाच्या राजकीय इतिहासाची पाने उलटली तर इथेही विरोधकांचा असाच संघर्ष गेल्या वीस वर्षापासून निरंतर सुरू आहे. पण भाजपा विरोधकांना आजपर्यंत ईथे कधीच यश मिळाले नाही. याचे चिंतन यावेळी होणे हे भाजपा विरोधकांसाठी काळाची गरज आहे. म्हणून भाजपा विरोधकांनी यावेळी दोन पावलं मागे येऊन पाच वर्षासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या खांद्यावर येत्या विधानसभा निवडणूक रणांगणाची पताका दिली तर निवडणूक निकाल हा काही वेगळाच व भाजपा विरोधकांच्या मनासारखा लागू शकतो. असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. सन २००४ पासून जळगाव जा. विधानसभा मतदारसंघात भाजपा राज आहे.त्याची पाळेमुळे खोलवर रूजलेली आहे.याला खऱ्या अर्थाने कारणीभूत असण्यामागे काँग्रेस व राष्ट्रवादी तसेच वंचित बहुजन आघाडी हेच कारणीभूत असल्याची वस्तुस्थिती कोणीच नाकारू शकत नाही. एक नव्हे तर अनेक कारणामुळे लोकसभा निवडणुकीत सुद्धा याच जळगाव जा. विधानसभा मतदारसंघाने शिवसेनेच्या खासदारांना नेहमीच भरभरून मते दिली. लोकसभा असो की विधानसभा भाजपाला रोखणे हे अजूनही इथल्या काँग्रेस व राष्ट्रवादीला कधीच जमले नाही. लोकसभा तर आताच होऊन गेली. यात काँग्रेस व राष्ट्रवादी इथे पुन्हा सातव्यांदा सपशेल अपयशी ठरली आहे. असो,आता तीन महिन्यावर विधानसभा निवडणूक आली आहे. मागच्या चार विधानसभा निवडणुकांच्या आकडेवारीचा विचार केला तर यावेळी काँग्रेस व राष्ट्रवादी तसेच बाळासाहेबांच्या वंचित आघाडीने नरमाईची भूमिका घेणे गरजेचे आहे.ईथे बदल घडवायचा असेल तर या पंचवार्षिक निवडणुकीत थांबणे हाच एक जालीम इलाज आहे. तरच यांना नको असलेला भाजपा इथे (२०२४ ला) थांबवु शकते. नाहीतर पुन्हा येथे 'येरे माझ्या मागल्या' या निवडणूक निकालानंतर भाजपाविरोधकांना म्हणावे लागेल, २००४ च्या विधानसभा निवडणुकीत येथे भाजपाचा उदय काँग्रेसच्या चुकांमुळेच झालेला आहे. काँग्रेसच्याच काही संग्रामपूर जळगाव तालुक्यातील राजकीय सरंजामदारांनी तेव्हाच्या भारिप बमसला जाणीवपूर्वक सहकार्य केले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मतांचे विभाजन होऊन भाजपाचे डॉ.संजय कुटे निवडून हे आले व ते आजही आमदार पदावर कायम आहेत. २००९ च्या विधानसभा निवडणुकीत कृष्णराव इंगळे निवडून येण्याची पूर्ण शाश्वती असतांना सोनिया काँग्रेसने रामविजय बुरुंगलेंना उमेदवारी दिली. त्यामुळे कृष्णराव इंगळे गट प्रचंड नाराज झाला होता व त्या नाराजिचा फटका रामविजय बुरुंगलेंना जोरदार बसला. बुरुंगले यांचा टिकाव लागत नाही हे माहीत असतांनाही काँग्रेसच्या मुकुल वासनिक यांनी रामविजय बुरुंगले यांना २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा रिपीट करून मैदानात उतरवले. पण या निवडणुकीत बुरुंगले यांचे मताधिक्य घसरले. जमत नाही हे माहीत असूनही मुकुल वासनिकांनी रामविजय बुरुंगले यांचे उमेदवारीसाठीच हट्ट धरण्यामागे तेव्हा फार मोठे रामायण होते. तर मुकुलजी वासनिक यांच्यामुळेच जिल्हा काँग्रेसचा सत्यानाश झाल्याचा आरोप अनेक निष्ठावान काँग्रेसचे कार्यकर्ते खाजगीत आजही बोलतांना करतात. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसमध्ये फारच रस्सीखेच होती पण त्यावेळी डॉ. स्वाती वाकेकर यांना उमेदवारी मिळाल्याने प्रसेंजित पाटील यांचा गट प्रचंड नाराज होता. हा गट अखेरपर्यंतही डॉ. स्वाती वाकेकरांच्या प्रचारासाठी मैदानात उतरलाच नाही. तसेच काँग्रेस मधील तीन अक्षरी आडनाव असलेल्या सामाजिक राष्ट्रीय नेता म्हणून घेणाऱ्या एका नेत्याने तर जळगाव जा. मतदार संघात त्यांचे समाजात घरोघरी फिरून डॉ.स्वाती वाकेकरांच्या विरोधात उघड उघड प्रचार केल्याचा इतिहास आहे. अशा एकूण चारही टर्ममध्ये या मतदार संघात आपसी मतभेदामुळेच काँग्रेसला सपाटून पराभव स्वीकारावा लागला. राष्ट्रवादी काँग्रेसची सुद्धा हीच परिस्थिती येथे आहे. गट बाजी असल्याने जळगाव जा विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादीचे कार्यकर्ते सध्या सैरभैर झालेले दिसत आहेत. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीचे वारे आता जोरधार वाहू लागले आहेत. 'फिरसे गिनो पांडेजी' अशी अवस्था पाचव्यांदा होऊ नये यासाठी काँग्रेस व राष्ट्रवादी तसेच वंचित बहुजन आघाडीने यावेळी सावध होणं आवश्यक आहे अर्थात तुम्हाला इथे भाजपा राज नको असेल तरच.... वरच्या स्तरावर स्वाभिमानीचे सर्वेसर्वा शेतकरी नेते खा. राजू शेट्टी यांची महाविकास आघाडीशी युतीसाठी बोलणी सुरू आहे. जळगाव जा. मतदार संघ स्वाभिमानी शेतकरी संघटनेला दिला तरच स्वाभिमानी शेतकरी संघटनेशी त्यांची युती होऊ शकते. म्हणून यावेळी सर्व भाजपा विरोधकांनी दोन पावलं मागे येऊन स्वाभिमानीला हा मतदारसंघ द्यावा. यासाठी त्यांनी पॉझिटिव्ह होणे आवश्यक आहे. कारण या मतदारसंघात स्वाभिमानीची मोठी राजकीय ताकद व संघटन चांगले आहे. त्याची प्रचिती आता चार महिन्यांपूर्वी संग्रामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अटीअतटीत पार पडलेल्या निवडणुकीत दिसून आली. म्हणून भाजपा राज थांबवायचे असेल तर हा स्वाभिमानीचा रासायनिक राजकीय फॉर्मुला आज उपयोगाचा आहे. अन्यथा जळगाव जा.मतदार संघाचे भाजपा विरोधकांसाठी काही खरं नाही. याचा महाविकास आघाडी कडून सारासार विचार होणे आवश्यक आहे. कारण अजूनही वेळ गेली नाही .चिंतन करायला अजून तीन महिन्याची वेळ आहे.

# अभिनयातील भीष्माचार्य

आधुनिक केसरी

ट्रॅजीडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील भीष्माचार्य दिलीपकुमार यांचा आज तिसरा स्मृतिदिन. तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ७ जुलै २०२१ रोजी दिलीपकुमार यांचे



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

वृद्धपकाळाने वयाच्या ९८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीतच नव्हे तर संपूर्ण देशात शोककळा पसरली होती. दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयाचे चालते बोलते विद्यापीठच हरपले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. दिलीपकुमार यांचा जन्म ११ डिसेंबर १९२२ रोजी पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले. दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होते. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले. तिथे त्यांनी लष्करी कँटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले. दुसऱ्या महायुद्धात लष्करी कँटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले. मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली. दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे हे त्यांचे परिचित डॉ मसानी यांना समजले तेंव्हा डॉ मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बाराशे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली. वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले. १९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल - ए - आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा...मैने मांग लिया संसार....या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले. देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही. १९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला या चित्रपटात त्यांनी तिहेरी भुमीका साकारली. त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोज कुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला. या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले.

# आपतग्रस्त शेतकऱ्यांसाठी स्वाभिमानीचा मदतीचा हात

## संग्रामपूर, जळगाव, शेगाव तालुक्यात मोफत बियाणे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जामोद :** आधी केले मग सांगितले असं एक संत वचन आहे. याच वचनाला बाधिल राहून या खरीपच्या हंगामात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने जळगाव जामोद विधानसभा मतदार संघातील आपतग्रस्त शेतकऱ्यांसाठी एक सत्कार्य करण्याचा येथोचित प्रयत्न केला. पेरलेली जमीन ताशी लागल्यावर या उपक्रमाची सुरसचर्चा आता संपूर्ण मतदारसंघात होत असून लाभधारक शेतकरी धन्यता व्यक्त करत आहेत. नैसर्गिक संकट शेतकऱ्यांचा पिच्छा सोडायला तयार नाही. उजाडलेलं २०२४ हे वर्ष शेतकऱ्यांसाठी फारच आर्थिक चक्र बिघडवणारं आहे. कारण २०२३ मध्ये वर्षभरात ४ ते ५ वेळा नैसर्गिक संकट येऊन गेली. त्यामुळे शेतकरी राजा मेटाकुटीस आलेला आहे. ही सर्व परिस्थिती जवळून बघितल्यावर स्वाभिमानीचे कार्यकर्ते व स्वाभिमानी शेतकरी संघटनेला भरीव मदत करणारे हात पुढे आले. यातून स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी संग्रामपूर, जळगाव, शेगाव तालुक्यातील आपतग्रस्त शेतकऱ्यांना पेरणीच्या तोंडावर बियाण्याचे वाटप केले. यामध्ये उच्चप्रतीचे दर्जेदार १२०० बॅग कापूस बियाणे व ६५० बॅग तुर बियाणेचा वाटप करण्यात आला. वाटप झालेल्या शेतकऱ्यांमध्ये सर्वाधिक अल्पभूधारक शेतकऱ्यांचा समावेश आहे. २०२३ या वर्षात झालेल्या अतिवृष्टीत अनेक शेतकऱ्यांचे संसार उघड्यावर आले आहेत. सरकारकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीची वाट पाहून शेतकरी थकले. फक्त घोषणा होतात प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत म्हणूनच स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने यावर्षी मोफत बियाणे वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून बियाणे मिळाले म्हणून आम्ही यावर्षी शेतीची पेरणी करू शकलो अशा प्रतिक्रिया अनेक शेतकऱ्यांनी माध्यमांशी बोलतांना व्यक्त केल्या आहेत. तर याबाबत स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी राबवलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून प्रशंसा होत आहे. स्वाभिमानीचे विदर्भ अध्यक्ष प्रशांत डिक्कर यांच्या संकल्पनेतून बियाणे वाटपाचा उपक्रम राबवण्यात आला. यावर्षी बियाण्याचा वाटप केला पुढच्या वर्षी खरीप हंगाम अटोपताच ना



नफा ना तोटा या तत्त्वावर जळगाव जामोद मतदार संघातील सर्व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जमिनीचे नांगरणी, वखरणी करीता शेतकऱ्यांना ट्रॅक्टर उपलब्ध करून देण्याचा संकल्प स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विदर्भ अध्यक्ष प्रशांत डिक्कर यांनी आत्ताच जाहीर करून टाकला आहे. आर्थिक कमकुवत शेतकऱ्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने घेतलेला पुढाकार हा शेतकऱ्यांमध्ये नव चैतन्य निर्माण करणारा आहे हे विशेष.



# कोमल निंबाळकर मुख्यमंत्रीपदी, उपमुख्यमंत्रीपदी संदेश चव्हाण

## साधना पाटील विद्यालयात विद्यार्थी संसद निवडणूक उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित साधना पाटील प्राथमिक विद्यालय नरसिंगपूर येथील विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये रुजावीत, तसेच भारताचा भावी नागरिक हा निवडणुकी संदर्भात जागरूक झाला पाहिजे. भविष्यात मतदान करताना एक जागरूक नागरिक म्हणून मतदान केले पाहिजे व योग्य उमेदवाराची निवड केली पाहिजे. यासाठी अशा उपक्रमाची आवश्यकता आहे. असे मत साधना पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक नरेंद्र पवार यांनी व्यक्त केले. साधना पाटील विद्यालयातील २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी संसद निवडणूक विद्यालयाचे मुख्याध्यापक नरेंद्र पवार यांच्या संकल्पनेतून शाळेतील तंत्रस्नेही शिक्षक सागर पाटील, सुनील मोरे यांनी केलेल्या आधुनिक नियोजनातून शनिवारी (दि.६) जुलै रोजी शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक प्रकिया नुकतीच आयोजित करण्यात आली होती. निवडणुकीसाठी सर्वप्रथम मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांपासून विविध

**विद्यालयातील निवड झालेले मंत्रिमंडळ :** मुख्यमंत्री कोमल सूर्यकांत निंबाळकर, उपमुख्यमंत्री संदेश रवींद्र चव्हाण, अभ्यास मंत्री अंजली मालकर व सार्थक सूर्यकांत निंबाळकर, स्वच्छता मंत्री श्रावण गायकवाड, क्रीडामंत्री संस्कार बारगळ व राजेश्वरी गुंजाळ, शिस्तमंत्री नंदिनी सोनवणे, वैष्णवी पवार सांस्कृतिक व परिपाठ मंत्री श्वेता चव्हाण, शालेय पोषण आहार मंत्री शौर्य दाभाडे, बागकाम मंत्री वासुदेव राठोड व तन्वी मोरे

खात्यांच्या पदांसाठी अगोदर इच्छुक विद्यार्थी अर्ज दिले व नंतर उमेदवार ठरविण्यात आले. विद्यार्थी उमेदवारांना विविध चिन्हांची निशाणी देण्यात आली तसेच उमेदवारांना प्रचारासाठी कालावधी देण्यात आला होता. उमेदवारांनी शालेय विद्यार्थीरूपी मतदारांच्या गाठीभेटी घेत प्रभावी प्रचार केला. ताई, दादा, दीदी, भाऊ अशी आर्जव घालून मतदारांना आपलेसे करण्यासाठी विनवण्या केल्या. मतदानाच्या दिवशी गुप्त पद्धतीने इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीनवर मतदान घेण्यात आले. सर्व मतांची काटेकोर, निःपक्ष मतमोजणीनंतर विजेत्यांची नावे जाहीर करण्यात आली. या निवडणुकीत अकरा पदांसाठी निवडणुकीची प्रक्रिया पार पडली. इयत्ता चौथी ते नववीतील २३२ विद्यार्थ्यांनी मतदानाचा हक्क बजावला. विजेत्यांच्या चेहऱ्यावर आनंद तर पराभूतांच्या मनात नंतरच्या निवडणुकीत यशस्वी होऊ ही भावना दिसून आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.मिलिंद पाटील व संस्थेचे सचिव टी.एस कदम, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रभाकर मनगटे, संचालक नितीन पाटील, संस्था प्रतिनिधी हर्षदा कदम यांनी शालेय निवडणुकीत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. शाळेचे मुख्याध्यापक नरेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहशिक्षक सागर पाटील तर निवडणूक अधिकारी म्हणून सुनील मोरे, नितीन मगर, नामदेव पवार यांनी जबाबदारी पार पाडली. निवडणूक मतमोजणी अधिकारी म्हणून अमोल घुगे व श्रीराम जाधव यांनी काम पाहिले. तसेच कार्यक्रम यशस्वीतेसाठी विजया कुमावत, मंजिरी कदम, प्राजक्ता तागवाले, छाया तुपे, सुभाष आघाडे या सर्वांनी कार्यक्रमासाठी अथक परिश्रम घेतले. विजयी उमेदवारांचे जंगी स्वागत करण्यात आले.

# शाळांमधील प्रवेश झाले 'ओव्हरफ्लो'

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या शाळेत प्रवेश फुल्ल झाल्याने खासगी संस्थेला भाडेतत्त्वावर दिलेल्या शाळा मनपाच्या ताब्यात घेऊन प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना त्या शाळेत प्रवेश द्या अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) चे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांच्यावतीने मनपा आयुक्त जी श्रीकांत यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या सर्व शाळा आता स्मार्ट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रवेशासाठी पालकांच्या रांगा लागत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. परंतु, महापालिकेने सन २०१७ ला विद्यार्थी संख्या कमी असल्याचे कारण पुढे करत ५ शाळा बंद करून खासगी संस्थेला भाडेतत्त्वावर दिलेल्या आहेत. त्यापैकी काही शाळेने महानगरपालिकेचे लाखो रुपयांचे भाडे थकविलेले आहे. सन २०२४ ला तेच कारण पुढे करत खासगी विकासकांना मनपाच्या १४ शाळा भाडेतत्त्वावर देण्याचा निर्णय घेतला आहे. मनपाच्या शाळेमध्ये प्रवेश फुल्ल झाल्यामुळे व विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी पालकांचा वाढता ओघ बघता ज्या मनपाच्या शाळा खासगी संस्थेला भाडेतत्त्वावर दिलेल्या आहेत त्या महापालिकेच्या ताब्यात घेऊन त्याठिकाणी स्मार्ट शाळा सुरू कराव्यात. त्याचप्रमाणे यावर्षी १४ शाळा भाड्याने देण्याचा घेतलेला निर्णय मागे घ्यावा. तसेच महापालिकेने सुरू केलेल्या सीबीएसई पॅटर्नच्या शाळांचे एक हजार रुपये शुल्क आकारले जात आहे. ते त्वरित बंद करून अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना निःशुल्क प्रवेश द्यावा या सर्व मागण्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) गटाचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांच्या शिष्टमंडळाने मनपा आयुक्त जी श्रीकांत यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावर जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे, पवन पवार, संदीप अहिरे, आकाश साबळे, सुरेश साळवे याच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# लखोजीराजे, अचलोजीराजे, रघुजीराजे, यशवंतराव यांची स्मृती म्हणून देवगिरीवर स्वराज्य प्रेरणास्तंभ उभारणार : राहुल भोसले

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

**दौलताबाद :** येथे स्वराज्य तोरण समिती महाराष्ट्र राज्य यांची बैठक संपन्न झाली. सन २५ जुलै १६२९ रोजी आई जिजाऊंच्या आयुष्यातील काळाकुट्ट दिवस. जिजाऊंचे वडील लखुजीराजे, दोन सख्खे भाऊ अचलोजी आणि रघुजी, एक भाचा यशवंतराव, देवगिरी किल्ल्यावर विश्वासघाताने निजामाने ज्यांची कत्तल केली. यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देवगिरी किल्ल्यावर स्वराज्य प्रेरणास्तंभ उभारण्यातील येईल, अशी माहिती स्वराज्य तोरण प्रतिष्ठानचे कार्यवाह भोसले घराण्याचे वंशज राहुलजी भोसले यांनी दिली ते या निमित्ताने देवगिरी गावातील दत्त मंदिर आश्रम येथे ६ जुलै शनिवार रोजी आयोजित केलेल्या बैठकीत



बोलत होते. यावेळी व्यासपीठावर इस्कॉनचे रुक्मिणी रमण प्रभुदास महाराज, विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांताध्यक्ष संजय आप्पा बारगजे कार्यक्रमाचे संयोजक मनीष पाटील सहसंयोजक श्री.अशोक मुळे शंकर जाधव तसेच सुभाष महाराज गवळी, रविंद्र पाटील, नितीन उदमले उपस्थित होते. यावेळी बोलताना राहुल भोसले पुढे म्हणाले जिजाऊंच्या आई म्हाळसाई आणि दोन भावजयी या चितांवर सती गेल्या आणि जिजाऊंचे माहेर उजाड झाले. एका दिवसात माहेरची सात जण चितेवर गेली. हा आक्रोश, हे अपार दुःख, ही खदखद, सल घेऊन जिजाऊ सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून पोटातील दोन महिन्याचे बाळ शिवाजीला घेऊन शिवनेरीवर पोहोचल्या शहाजी राजांनी बंड पुकारले. कुठेही सुरक्षित थारा मिळत नसतांना शिवनेरी गडाचे किल्लेदार समोर आले. त्यांनी वचन दिले. पोटातील स्वराज्य सूर्य मुठी आवळून उगवतीची वाट पहात होता. इतिहासातील अशा घटनांचे विस्मरण होऊ नये, आपल्या छत्रपतींच्या स्वराज्याने काय काय किंमत मोजली याची जाणीव आजचे स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या पिढीला व्हावी म्हणून एक छोटासा प्रयत्न आपण करतो आहोत. देवगिरी गडावर २५ जुलै रोजी २०२४ रोजी स्वराज्य प्रेरणास्तंभाचे भूमिपूजन संपन्न होणार आहे या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने यावे असे आवाहन राहुलजी भोसले यांनी केले. विश्व हिंदू परिषदेचे प्रांताध्यक्ष संजय आप्पा बारगजे मनोगत व्यक्त करताना म्हणाले छत्रपती शिवाजी महाराजांनी ३५० वर्षांपूर्वी हिंदू साम्राज्याची प्रेरणा दिलेली आहे देवगिरी हा पहिला स्वातंत्र्याचा प्रेरक किल्ला आहे सर्व किल्ल्यांचा आणि स्वातंत्र्याचा इतिहास देवगिरी किल्ल्यापासून आणि छत्रपती शिवाजी महाराजांपासून सुरू होतो म्हणून आपल्याला इथे त्यांचा प्रेरकस्तंभ उभा करावयाचा आहे. प्रमुख अतिथी पूजनीय रुक्मिणी रमण प्रभुदास महाराज यांनी मनोगत व्यक्त केले सूत्रसंचालन शिवाजी गायकवाड यांनी, तर आभार प्रदर्शन सहसंयोजक अशोक मुळे यांनी केले. संजय कांजूने, सुरेश चुनुके, रामू इंगळे, विश्वनाथ डंगारे बापू कांजूणे, उद्धव पवार, राजू कांजूणे, सतीश जाधव, किशोर जाधव, योगेश पाडळे, नंदकुमार मुळे, रामा सुरसे, सत्यम चुनुके, सुरज जाधव, विशाल बळी, वेदांत आनंदे, रोहन कांजूने, कल्याण कांजूने, बंटी पवार, किशोर पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# टी-२० विश्वचषक विजेत्या संघाला अकरा कोटींचे पारितोषिक

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : विधिमंडळात कर्णधार रोहित शर्मांसह सहकाऱ्यांचा विशेष सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** भारत हा क्रिकेटमध्ये विश्वगुरू आहे. हे आपल्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाने सिद्ध केले आहे. पराभवाच्या छायेतून विजय खेचून आणून, कर्णधार रोहित शर्मा आणि त्याच्या संघाने भारतीयांची छाती अभिमानाने फुलून यावी अशी कामगिरी केली आहे, अशा शब्दांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विश्वविजेत्या भारतीय संघावर कौतुकाची उधळण केली. तसेच भारतीय संघासाठी महाराष्ट्र शासनाच्यावतीने अकरा कोटी रुपयांचे विशेष पारितोषिक जाहीर केले. मुंबई महानगर प्रदेशात भविष्यात भव्य आणि आधुनिक असे स्टेडियम उभारण्यास गती देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.



टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार रोहित शर्मासह, त्याचे सहकारी सुर्यकूमार यादव, यशस्वी जयस्वाल, शिवम् दुबे, प्रशिक्षक पारस म्हाब्रे, संघ व्यवस्थापक अरूण कानडे यांचा आज विधानभवनातील मध्यवर्ती सभागृहात विशेष सत्कार करण्यात आला. खचाखच भरलेले हे मध्यवर्ती सभागृह आज क्रिकेटच्या जल्लोषाने दणाणून गेले. भारतीय राष्ट्रध्वज उंचावून सभागृहात भारत माता की जय आणि वंदे मातरम् च्या घोषणाही घुमल्या. '...हे जीवन म्हणजे क्रिकेट राजा, हुकला तो संपला या क्रिकेटमधीलच विक्रमादित्य लिटल मास्टर सुनील गावस्कर यांच्या आवाजातील गाण्याने आणि हिंदी चित्रपट "चक दे इंडिया..!' च्या जल्लोषी सुरांनी सभागृह सुरवातीपासूनच निनादून गेले. यातच टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार रोहित शर्मा आणि सहकाऱ्यांचं आगमन होताच सभागृहातील घोषणा आणखी टिपेला पोहोचल्या. या विशेष समारंभास विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, संसदिय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार ॲड. आशिष शेलार, दोन्ही विधीमंडळातील सदस्य, क्रिडाप्रेमी आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, ' या स्पर्धेत आपल्या भारतीय संघाने पाकिस्तानच्या संघाल हरवल तेव्हाच आपण अर्धा विश्वचषक जिंकला. सुर्यकूमार यादव च्या अजरामर झेलमुळे आपण विश्वचषक जिंकला आणि देशभरात गेले आठवडाभर जल्लोष सुरु झाला. आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील भारतीय संघाचं अभिनंदन केले आहे. या विजयामुळे देशवासियांचा, देशाचा गौरव झाला आहे, या भावनाने भारतीय संघाचे स्वागत करत आहेत. याच साठी काल विजेत्या संघाच्या स्वागतासाठी मुंबईत अरबी समुद्राच्या शेजारीच जनसागर उसळला होता. आपल्या या संघाने भारतच क्रिकेटमध्ये विश्वगुरू आहे हे सिद्ध केले आहे. मुंबई ही क्रिकेटची पंढरी आहे. आपले वारकरी विठ्ठलच्या दर्शनासाठी वारीमध्ये सहभागी झाले आहेत. तर काल क्रिकेटप्रेमी वारकरी याच भावनेने मुंबईकडे आले आहोते. मुंबईत दिवाळी-दसराच साजरा झाला. भारतीय संघात मुंबईकर चार खेळाडू आहेत. कर्णधार रोहीत शर्मासह, सुर्यकूमार हे विजयाचे शिल्पकार आहेत याचा सर्वांनाच अभिमान आहे. विशेष म्हणजे एकही सामना न हारता, या संघांने विश्वचषक जिंकला आहे, ही ऐतिहासिक कामगिरी असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. भारतीय संघातील मुंबईतील अनेक दिग्गज आणि महान क्रिकेटपटुंचा समावेश असल्याचा उल्लेख करून मुख्यमंत्री म्हणाले की, १९८३ चा विश्वचषक आपण कपिल देव यांनी घेतलेल्या त्या एका झेलमुळे जिंकलो होतो. कपिल देव यांचा तो झेल आणि सुर्यकूमार यादव यांचा या स्पर्धेतील झेल हा भारतीयांसाठी अजरामर क्षण ठरला आहे. हे विश्वविजेतेपद प्रत्येक भारतीयांच्या आकांक्षेचे प्रतिक आहे. या मुंबईकर खेळाडूंनी आपल्या नावाप्रमाणेच भारताची विजयी पताका जगात फडकवली आहे. त्यांनी यापुढेही भारतीयांना असाच आनंदोत्सव साजरा करण्याची संधी मिळवून द्यावी, यासाठी मुख्यमंत्र्यांनी भारतीय संघाला शुभेच्छा दिल्या. उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारतीय संघाने आपल्या सर्वांसाठी आनंदाचा क्षण आणला आहे. एका अपराजित संघाने विश्वचषक जिंकला आहे. रोहीत शर्मांनी अद्वितीय कामगिरी करत, भारतीय क्रिकेटच्या दिग्गजांच्या मांदियाळीत स्थान पटकावले आहे. रोहित यांनी कपिल देव, महेंद्रसिंह धोनी यांच्यानंतर आपला नावलौकीक केला आहे. कर्णधार म्हणून रोहित यांनी संघातील सहकाऱ्यांचा जिंकलेला विश्वास हा महत्वाचा आहे. त्यांची नेतृत्व शैली ही भारतीय संघाच्या कर्णधाराची परंपरा राखणारी आहे. मुंबईकर हे सर्व खेळाडू महाराष्ट्राचा अभिमान असल्याचेही सांगून आता मुंबई क्रिकेट असोसिएशनने मुंबईत 1 लाखापेक्षा जास्त क्षमता आधुनिक स्टेडिअम बांधण्याची सूचना त्यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनकडे केली. भारतीय संघाच्या स्वागतासाठी मुंबईकरांनी केलेली गर्दी अभूतपूर्व होती. मात्र कोणत्याही मुंबईकरांनी नियमांची शिस्त मोडली नाही, त्यामुळे त्यांनी मुंबईकराचे अभिनंदन केले. उपमुख्यमंत्री श्री पवार म्हणाले, की विधानभवनात असा दिमाखदार समारंभ होतो आहे, याचे मोठे समाधान आहे. चमत्कार घडेल असे वाटत होते आणि चमत्कार घडला. आपला क्रीडा रसिक आगळावेगळा आहे. मरिन ड्राईव्हला अभूतपूर्व गर्दी झाली होती. भारतीय या क्रिकेटवर प्रेम करतात, असे प्रेम जगात कुठेही दिसत नाही. यात अमेरिकासारखा संघ ही पुढे आला आहे. सुर्यकूमार यांचा झेल हा अप्रतिमच होता. अनेक दिग्गजांनी भारतात क्रिकेट रुजवले त्यामुळे आपल्याकडे उत्तम क्रिकेटपटू घडू शकले. यापुढे रोहित टी-२० खेळणार नाही.पण यापुढे ज्या-ज्यावेळी आपण टी-२० पाहू, त्यावेळी रोहितची आठवण आल्याशिवाय राहणार नाही.

विधानसभेचे अध्यक्ष ॲड. नार्वेकर म्हणाले की, भारतीय क्रिकेट संघाने प्रत्येकाला अभिमानाचा क्षण मिळवून दिला. क्रिकेटमुळे विधीमंडळ कामकाज करतांनाही मदत होते, असे सांगत त्यांनी विधिमंडळातर्फे खेळाडूंना शुभेच्छा देऊन आगामी काळात गौरवशाली क्षण मिळवून देण्याबद्दल त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, विधानभवनात प्रथमच अशाप्रकारचा कार्यक्रम होत आहे. हा सोहळा महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने होणारा सत्कार होता. खेळाडुंच्या विजयासाठी प्रत्येक नागरिकाने शुभेच्छा व्यक्त केल्या होत्या. या अभूतपूर्व विजयानंतर क्रिकेटसह सर्व क्षेत्रातील प्रगतीसाठी एकत्र यावे, असेही आवाहन उपसभापती डॉ.गोऱ्हे यांनी केले. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते कर्णधार रोहित शर्मा यांच्यासह सत्कारमुर्तींचे वैशिष्ट्यपूर्ण ट्रॉफी, विधानमंडळाचे स्मृतीचिन्ह, छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनाधिष्ठित मुर्ती, शाल आणि पुष्पगूच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कर्णधार रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, यशस्वी जयस्वाल, शिवम दुबे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रीयन असल्याचा आम्हाला अभिमान आहे. या सत्कार सोहळ्याने आनंदित झालो आहोत. काल आणि आज झालेले स्वागत आम्ही कधीच विसरू शकणार नाहीत. मुंबई पोलिसांनी केलेले नियोजन अप्रतिम होते. विश्वकरंडक जिंकणे हे आमचे स्वप्न होते. सर्व खेळाडूंनी बजावलेल्या सांघिक प्रयत्नांमुळे हा करंडक जिंकता आला. या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल त्यांनी संयोजकांचे आभार मानले.

## घिसेवाड यांना 'महाराष्ट्र भूषण' तर शेंडगेंना 'समाज रत्न' पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज





**भोकर :** येथील बहूजन चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते माजी सभापती नागनाथ घिसेवाड यांना "महाराष्ट्र भुषण" तर ओबीसी बहूजन चळवळीतील कार्यकर्ते नागोराव शेंडगेना "समाज रत्न" पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. मागील अनेक वर्षांपासून बहूजन,वंचित, उपेक्षित समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी व संविधानिक हक्क अधिकारासाठी परिश्रम घेत संघर्ष केला.त्याच्या कार्याची दखल घेऊन दैनिक रोखठोक वृतपत्र समूह कोल्हापूर तर्फे रविवारी(ता. १४) "शाहू स्मारक भवन,दसरा चौक कोल्हापूर" येथे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

## शालेय समितीच्या अध्यक्षपदी निवृत्ती तरटे यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील बाभुळगाव तरटे येथील जिल्हा परिषद शाळेच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी स्थापना निवृत्ती तरटे यांची निवड झाली आहे. बाभुळगाव तरटे येथे नविन शाळा व्यवस्थापन समिती स्थापना करण्यासाठी पालक सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी सर्व पालकांनी वर्ग निहाय प्रत्येकी दोन प्रतिनिधी निवडून दिले. त्यात महीला व पुरुष प्रतिनिधी मिळुन एकूण 9 प्रतिनिधी ची निवड करण्यात आली.तसेच उपस्थित सर्व पालकांनी लोकशाही पद्धतीने अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवड केली. यात अध्यक्षपदी निवृत्ती तरटे तर उपाध्यक्षपदी योगिता तरटे यांची निवड करण्यात आली. तर विष्णु तरटे,आजीनाथ तरटे,दत्ता तरटे, रामेश्वर तरटे,नम्रता तरटे,नंदा तरटे, सोनाली सोनवणे यांची सदस्यपदी निवड झाली. तर शिक्षणप्रेमी सदस्य विजय तरटे, ग्रा.प. सदस्य प्रतिनिधी विष्णू तरटे यांची निवड करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक श्रीमती



वैशाली जाधव यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून भुमिका पार पाडली.तर शिक्षक सय्यद सर यांनी सर्व पालकांचे आभार मानले. समाजसेवा ,शालेय विकास, विद्यार्थी हित जोपासण्यासाठी मी नेहमीच कटीबध्द राहील अशी भावना शालेय अध्यक्ष श्री निवृत्ती तरटे यांनी यावेळी व्यक्त केली. या निवडीबद्दल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती अनुराधाताई चव्हाण, भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, जिल्हा सरचिटणीस ऐश्वर्याताई गाडेकर, सांडू अण्णा जाधव, अभिषेक गाडेकर, मच्छिंद्र चव्हाण, राजू उबाळे आदींची शुभेच्छा दिल्या.

## शिवाजी विद्यालयाचे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र; पात्र विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालका देवी शिक्षण प्रसारक संस्था संचलित शिवाजी माध्यमिक विद्यालय सावळदबारा येथील पूर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये वर्ग पाचवी व आठवीचे विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेले आहेत पात्र विद्यार्थ्यांचा व पालकांचा जाहीर सत्कार करण्यात आला यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेच्या व शाळेच्या वतीने प्रोत्साहन पर पारितोषिक देऊन त्यांचा सत्कार संस्था प्रतिनिधी व प्राचार्य कोलते एन आर सर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळेस वर्गशिक्षक व विशेष शिक्षक यांचे सुद्धा विशेष आभार मानण्यात आले यानंतरही असेच यशाची परंपरा कायम ठेवावी असे शिक्षकांना आश्वासित केले पात्र विद्यार्थ्यांचे नावे*उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता 5 वी. व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता 8 वी. परीक्षेचा निकाल लागला असून यामध्ये इयत्ता पाचवी चे सहा विद्यार्थी पात्र झाले आहेत.

1) तुषार कृष्णा जूनारे
2) आशु राजेश तडवी
3) सोनाक्षी भागवत कोळपे
4)अंकिता प्रदीप सूर्यवंशी
5) सृष्टी न्यानेश्वर भुसारी
6) शुभांगी अनिल मानकर

सर्व पात्र विद्यार्थ्यांच हार्दिक हार्दिक अभिनंदन यावेळेस सर्व शिक्षक विकास पाटिल, विजय सिंग राजपूत, भास्कर खमठ, भास्कर ससाने, भूषण दिसले, ज्ञानेश्वर राठोड, विनोद जाधव, संजय जोशी, पोपटराव सोनवणे, मुकुंदा व्यवहारे , सुदाम राठोड, बाबासाहेब कोलते, राहुल भडक , अजबराव चव्हाण, श्याम जाधव, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.अशी माहिती प्रा.जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी बोलताना सांगितले.



# आ. सतीश चव्हाण यांच्याकडून वारकऱ्यांना ब्लँकेटचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

सुधाकर जेठे

**खुलताबाद :** पाडळी येथे आ सतीश भाऊ चव्हाण यानी पाडळी ते पंढरपुर पायी दिडी सोहळा जिकठाण येथे भाऊनी दिडीचे पुजन केले व वारक्यासाठी रग बॅलेकट वाटप करण्यात आले दिडी चालक सुरेश काका यानी भाऊचे स्वागत केले. समस्त वारकरी मडळी महिला मडळी व जिकठाण गावकरी तसेच संजय वहाटुळे भरत काळे भाऊसाहेब आहेवाड रामेश्वर आहेवाड राहुल गायके दौलत बापु, पुंडलीक आहेवाड, आजीनाथ ठोबरे पवन काळे सर्वेश्वर जाधव सागर आहेवाड अजुन आहेवाड, श्रीराम गायकवाड, दिपक आहेवाड, गणेश आहेवाड, शिवाजी बापु, किसन टेलर, बाळु गायकवाड, तेजराव काका, रोहीदास बाबा म्हस्के बाबा, तुकाराम गायके, रवि गायके, विजय आहेवाड, मन्साराम भाऊ अतुल महाराज दिलीप महाराज कचरू दादा बडु राऊत किशोर आहेवाड यांनी आ. सतीश चव्हाण यांचे आभार मानले.

# शासन नियमानुसार शुल्क आकारा; अन्यथा परवाना रद्द केला जाईल : तहसीलदार जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना लागू झाली आहे. सदर योजनेचे लाभार्थी ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज सादर करण्यासाठी आपल्या सेतुमध्ये गर्दी करत आहेत. त्यामुळे आपण शासन निर्णयाप्रमाणे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ह्या योजनेचा अर्ज स्विकृत करावीत. पात्र लाभार्थी यांचेकडून शासन नियमांनुसार योग्य ते शुल्क आकारून अर्ज ऑनलाईन प्रणालीव्दारे सादर करावेत. ज्यादा आकाराने शुल्क आकारल्याचे तक्रारी प्राप्त झाल्यास आपला परवाना रद्द करण्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे सर्व सेतू केंद्र संचालकांना नोटीस पाठवण्यात आली आहे. या सोबतच सर्व मंडळ अधिकारी, तलाठी यांना सद्य परिस्थितीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागु झाल्याने सदर योजनेचे लाभार्थी व पिक विमा योजनेसाठी शेतकरी तसेच शालेय प्रमाणपत्र बाबतचे चौकशी अहवाल बाबत विद्यार्थी यांचे मोठ्या प्रमाणात आपल्या कार्यालयात गर्दी होत आहे. त्यानुषंगाने आपण दररोज आपल्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून शेतकरी व नागरिकांची कामे पार पाडावीत तसेच विनापरवागी कोणीही कार्यालयात गैरहजर राहू नये, गैरहजर राहील्यास म.ना.से. शिस्त व अपिल नियमानुसार कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी, आशयाची नोटीस तहसीलदार राजेश जाधव यांनी काढली आहे.

# माझी लाडकी बहीण योजनेला सुलतानपूर येथे महिलांचा मोठा प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सुलतानपूर येथे माजी लाडली बहिन योजनेला सुल्तानपुर येथे भाडेगाव, देवळाना, कानडगाव, माटरगाव, वडोद, खाडी पिंपळगाव, येसगाव, जाफर वाडी, या सर्व गावातील महिलांनी जास्तीत जास्त अर्ज भरून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला मा.आमदार प्रशांत भाऊ बंब यांच्या मार्फत कामगार कल्याण तालुका अध्यक्ष अविनाश वेताळ यांचा संपर्क कार्यालय सुलतानपुर येथे एकुण 950 अर्ज जमा करण्यात आले याचं निमित्ताने हे काम कश्या पद्धतीने चालु आहे याची पाहणी करण्यासाठी मा.जिल्हा परिषद अध्यक्ष एल.जी.गायकवाड हे आले व त्यांनी अर्ज कश्या पद्धतीने भरायचे यांची माहिती देऊन सर्वांना मार्गदर्शन केले आणि जास्तीत जास्त महिलांनी याचे अर्ज भरून लाभ घ्यावा असे आवाहन केले या वेळेस अविनाश भाऊ मित्र मंडळ यांच्या वतीने त्यांचे सर्वांनी आभार मानले त्यावेळेस उपस्थित मा.जिल्हा परिषद अध्यक्ष एल.जी.गायकवाड, कामगार कल्याण तालुका अध्यक्ष अविनाश वेताळ, पत्रकार नईम शहा, कविता वेताळ, मेनका सोनवणे, आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# हॉटेलांसह अनधिकृत बांधकामांवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** महानगरपालिकेने सुरू केलेल्या अतिक्रमण निर्मुलन मोहिमेंतर्गत सलग चौथ्या दिवशी गोविंदनगर, लेखानगर, कालिकामंदिर आणि द्वारका परिसरातील १५ ते २० अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. मुख्यत्वे गच्चीवर थाटलेल्या अनधिकृत हॉटेलांवरही कारवाई केली जात आहे. उपरोक्त भागात व्यावसायिकांनी सामासिक अंतरातील बांधकाम, गच्चीवरील हॉटेल, दुकानांसमोरील शेड, बाहेरील बाजूस बांधलेले कठडे, ओटे आदी अतिक्रमण पथकाने उद्ध्वस्त केले. दुकानांसमोर अनधिकृतपणे लावलेले फलक काढून घेण्यात आले. रस्त्यावर थाटलेल्या अनधिकृत व्यावसायिकांचे साहित्य जप्त करण्यात आले. या मोहिमेत प्रामुख्याने गच्चीवरील अनधिकृत हॉटेलांवर कारवाई केली जात आहे. गोविंदनगर येथील हॉटेल जोजोची गच्चीवरील व्यवस्था आणि सामासिक अंतर, गच्चीवरील हॉटेल रेस्टो बार, काठे गल्लीतील हॉटेल गार्लिक, लेखानगर येथील हॉटेल शॅक, हॉटेल सचिन बार, मुंबई नाका येथील संदीप हॉटेल, कालिका मंदिराजवळील हॅपी टाइम्स आदी हॉटेलांसह आस्थापनांविरुध्द कारवाई करण्यात आली. परिसरातील छोटी-मोठी अतिक्रमणे काढून त्यांचे साहित्य जप्त करण्यात आले. तीन दिवसांपासून कॉलेजरोड आणि गंगापूर रोड परिसरात कारवाई सुरू होती. आता ती शहरात इतरत्र विस्तारत आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अशोक करंजकर यांच्या आदेशान्वये अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबविली जात आहे. नागरिकांसह व्यावसायिकांनी आपले अतिक्रमण स्वतःहून काढून घ्यावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# बहीण लाडकी असेल तर तिच्या मुलांना मोफत शिक्षण का नाही ? : भाकप

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जमा करण्यात आलेल्या रजिस्टर, वह्या, पेनचे वाटप गरजु व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना करण्यात आले. शिक्षण आणि शैक्षणिक साहित्य मोफत देण्याची जबाबदारी सरकारची असुनही सरकार ती पार पाडत नसल्याने लोकसहभागाचे आवाहन भाकप ला करावे लागते याबाबत खेदही व्यक्त करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भारतीय कम्युनिस्ट पक्षाने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी आवाहन केल्यानंतर शहरातील अनेक नागरिकांनी पैठण गेट येथील भाकप च्या स्टेजवर वह्या, रजिस्टर, पेन दान केले , त्या साहित्याचे वाटप गांधी भवन सिल्लेखाना येथे सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड, इंद्रकुमार जेवरीकर, गांधी स्मारक निधीचे कार्याध्यक्ष डॉ. मच्छिंद्र गोर्डे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या शहर सहसचिव कॉ. अनिता हिवराळे यांनी केले तर सुत्रसंचलन कॉ विकास गायकवाड यांनी केले.

बहीण जर लाडकी असेल तर तीच्या मुला मुलींना मोफत शिका नाही ? शिक्षणाचे बाजारीकरण करून देशाची संपत्ती असणार्या मुलांना शिक्षण नाकारणाऱ्या वर्तमान मनुवादी सरकार कडुन अपेक्षा करताच येणार नाही त्यासाठीच हे सरकार बदलावे लागेल असे आवाहन यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे शहर सचिव अँड अभय टाकसाळ यांनी केले.बचत गट करुन महिलांनी संघटीत व्हावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड यांनी केले, तर विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी डॉ. मच्छिंद्र गोर्डे यांनी शुभेच्छां दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कॉ राजु हिवराळे, कॉ.रफिक बक्श कॉ ज्योतीका गायकवाड, कॉ नितीन वाव्हळे ईत्यादींनी परिश्रम घेतले.

# गाजर गवताचा करा नायनाट; पिकांवर होतो परिणाम; मंडळ अधिकारी आर.जी. गुंडिले

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात सध्या अलीकडे खेळाची मैदाने, शेतजमिनी, रस्त्याच्या कडेला, मोकळ्या जागेत ग्रामीण भागात गाजर गवत धोकादायकपणे पसरत आहे. त्यामुळे गायी, म्हशी यांसारख्या जनावरांसाठी पौष्टिक गवत उगवायला जागा उरलेली नाही. दुसरीकडे गाजर गवत हे प्राणी आणि मानवांसाठी अत्यंत विषारी मानले जाते. या गवताच्या संपर्कात आल्यास खाज सुटणे आणि जळजळ होणे, यासह अनेक त्वचारोग होतात. शेतात त्याची झपाट्याने वाढ होत असल्याने पिकांवर त्याचा परिणाम होत असून पिकाचे उत्पन्न कमी होते. त्यामुळे या गाजर गवताचा नायनायट करणे गरजेचे आहे.साधारणपणे गाजर गवताचा प्रसार हा सर्वत्र झालेला दिसून येतो. या गवताचा प्रसार शेतावरील बांध, पडिक जमीन, चरावू जमीन यासारख्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो.

जनावरांनी गाजर गवत जास्त प्रमाणात खाल्ल्याने त्यांना त्वचेचे रोग होतात. जनावरांनी गाजर गवत खाल्ल्याने दुधाचीदेखील चव बदलते. दुधाला कडवट चव येते. गाजर गवत चवीला काहीसे कडू असले तरी भूक असल्याने जनावरे हे गवत खातात. अति प्रमाणात गाजर गवत खाल्ल्याने जनावरांचे मानसिक संतुलन बिघडते. एका गवताच्या रोपातून १० ते २५ हजार बिया तयार होतात. या बिया हलक्या आणि बारीक असल्याने त्या हवेत पसरतात. अशात त्याचा प्रादुर्भाव व प्रसार रोखण्यासाठी कृषी विभागाने जोरदार प्रयत्न करणे आवश्यक आहे. यंदा जूनमध्ये पडलेला बऱ्यापैकी पाऊस व ढगाळ वातावरणामुळे जमीन ओली झाली आहे. त्यामुळे गाजर गवत वेगाने पसरत आहे. वाढणाऱ्या चाऱ्याच्या जागी आता गाजर गवत दिसू लागले आहे. गाजर गवताची ही वाढ राष्ट्रीय आपत्ती ठरत आहे. रासायनिक तणनाशकांचा वापर हा पर्यावरणासाठी हानिकारक आहे. तसेच रासायनिक तणनाशके महाग असल्याने त्यांचा वारंवार वापर करणे परवडणारे नाही. गाजर गवत हे विषारी असल्याने ते उपटण्यासाठी मजूरवर्ग सहज तयार होत नाहीत. त्यामुळे जैविक नियंत्रण अत्यंत महत्त्वाचे ठरते. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने गाजर गवत निर्मूलनासाठी संयुक्तपणे मोहीम राबवावी. यामध्ये सर्वांचा समावेश करावा, गाजर गवत नष्ट होईपर्यंत ही गाजर गवताच्या समूळ निर्मूलनासाठी १६ ते २२ ऑगस्ट या काळात 'गाजर गवत जागरूकता सप्ताह' आयोजित केला जातो. याद्वारे गाजर गवताचे एकात्मिक पद्धतीने निर्मूलन करण्याविषयी जनजागृती केली जाते. गाजर गवताच्या जैविक नियंत्रणासाठी 'मेक्सिकन भुंगे' म्हणजेच झायगोग्रामा बायकोलरॅटा हे कीटक अत्यंत फायदेशीर असल्याचे दिसून आले आहे. या कीटकाच्या वापराने गाजर गवतावर प्रभावी नियंत्रण मिळविता येते.

> गाजर गवत निर्मूलनासाठी सामूहिकरीत्या गाव पातळीवर प्रयत्न केले पाहिजेत . गाजर गवत निर्मूलनासाठी मेक्सिकन भुंगे फायदेशीर ठरल्याचे दिसून आले आहे . शेतात मेक्सिकन भुंगे सोडताना प्रतिहेक्टरी ५०० भुंगे सोडावेत . हे भुंगे सोडताना एका पॉलिथिनच्या पिशवीत प्रक्षेत्रावर आणून सोडावेत . भुंगे शक्यतो मानवी आणि प्राण्यांचा शिरकाव नसलेल्या ठिकाणी सोडावेत . गाजर गवत उपलब्ध नसल्यास भुंगे जमिनीच सुप्त अवस्थेत जातात . या भुंग्याचा मानवी तसेच इतर पशुपक्ष्यांना कोणताही त्रास होत नाही . भुंगे दिवसा कार्यरत असल्यामुळे त्यावेळी जमा करणे टाळावे . सकाळी किंवा संध्याकाळी भुंगे गोळा करावेत . याव्यतिरिक्त १०० लीटर पाण्यात २० किलो जाडे मीठ घालून त्याची गाजर गवतावर फवारणी करावी .
> **रमेश गुंडिले मंडळ अधिकारी कृषी विभाग सोयगाव**

# चारू तांडा ते घाणेगाव तांडा रस्त्याचे पंधरा दिवसांत तीन तेरा; प्रशासन साखर झोपेत

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील चारू तांडा ते घाणेगाव तांडा दरम्यान रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले. मात्र, हे काम सध्या निकृष्ट कामाचा उत्कृष्ट दर्जा असेच मानले जात आहे. कारण अवघ्या पंधरा दिवसांत ठिकठिकाणी रस्ता उखडला असून रस्त्याची चाळणी झाली आहे.

हे काम लाखो रुपयाचे असून दोन किलोमीटरच्या मजबुतीकरण व डांबरीकरणावर लाखो रुपयांचा खर्च झाला, बऱ्याच वर्षानंतर या भागातील नागरिकांची रस्त्याची मागणी पूर्ण झाली होती. रस्त्याचे मजबुतीकरण करत असताना योग्य प्रकारे दबईचा व गिट्टीचा वापर न करणे, पाण्याचा वापर न करणे यासह निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळेच ठिकठिकाणी रस्ता उखडला आहे. मे महिन्यात झालेले मजबुतीकरण अवघ्या एका महिन्यात चाळण झाले आहे. विशेष म्हणजे संबंधित रस्त्यावर डांबराचे कार्पेट करण्यात आले नव्हते. अतिशय निकृष्ट दर्जाचे काम केल्यानेच हा रस्ता ठिकठिकाणी फुटला आहे. एकीकडे शासन लाखो रुपये खर्च करीत असताना संबंधित ठेकेदार, अधिकारी सोयीस्करपणे कॉन्ट्रॅक्टरकडे दुर्लक्ष करत कामे करीत आहेत. यामुळे येणाऱ्या काळात रस्त्याची दुरावस्था होऊन वाहनधारकांचा शाळकरी मुलांचा पुन्हा खडतर प्रवास सुरु होण्याची शक्यता आहे.

सोयगाव तालुक्यातील चारू तांडा ते घाणेगाव तांडा हा रस्ता अत्यंत खराब झाल्याने या रस्त्याच्या कामाच्या मागण्या होत्या. रस्त्याचे काम काही दिवसांपूर्वी डांबरीकरण करण्यात आले, मात्र पंधरा दिवसात रस्त्याची अशा प्रकारे चाळणी झाली.

गोकुळ सिंग राजपूत विभागीय अध्यक्ष दिलीप देशमुख छत्रपती संभाजी नगर कार्याध्यक्ष भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती यांनी, सोयगाव तालुक्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेल्या कामाच्या या भागातील गुण नियंत्रकांकडून तपासणी करण्यात यावी. अतिशय निकृष्ट, दर्जाहीन कामे झाली आहेत. याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष नसल्याने वाहनधारक ग्रामस्थांमधून संताप व्यक्त होत आहे.

सोयगाव तालुक्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने डांबरीकरणाची जी कामे करण्यात आली त्यातील अनेक कामे निकृष्ट दर्जाची आहेत. निकृष्ट दर्जाचे डांबर वापरणे, दबाई व खडीकरण निकृष्ट करणे, साईडची माती मुरुम म्हणून वापरणे साईट नाल्या न करणे यामुळे तालुक्यातील रस्त्यांची वाट लागली आहे. सोयगाव तालुक्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काम करणारे कॉन्ट्रॅक्टर हे वर्षानुवर्ष याच तालुक्यातील कामे करीत आहेत. परिणामी, संबंधित राजकीय नेते व सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी यांची मर्जी राखण्यात हे ठेकेदार कमी पडत नाहीत. यामुळेच सोयगाव तालुक्यातील कामाची वाट लागली आहे.

# बेवारस वृद्धाच्या अंत्यविधीसाठी मदतीला धावली माणुसकी

## चिकलठाणा पोलीस, सु-लक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने केले अंत्यविधीसाठी मदतकार्य

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** चिकलठाणा ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीमध्ये पारधेश्वर मंदिराजवळ पीसादेवी पळशी रोडवर दिनांक ३०-६-२४ रोजी अज्ञात वाहनाने धडक दिल्याने ६५ वर्षीय वृध्द इसम बेवारस बेशुद्ध पडलेल्या अवस्थेत आढळून आला होता. स्थानिक नागरिकांनी पोलीसांना माहिती दिली असता सदर व्यक्तीस पोलीसांनी शासकीय रुग्णालय घाटी येथे प्रथमोपचारासाठि दिनांक ३०-६-२४ रोजी दाखल केले व त्यांवर उपचार सुरू झाले.पोलिस उप निरीक्षक संजय खंडागळे हे तपास अधिकारी होते.पोलीसांना त्यांच्या खिशात काहिच सापडले नाहि.शोशल मीडिया वर फोटो व्हायरल करुन सदर व्यक्ती च्या नेतेवाईकांचा शोधमोहीम खंडागळे पी.एस. आय व पोलीसांनी हाती घेतली. असता उपचारादरम्यान दिनांक ३०-६-२४ रोजी त्यांचा मृत्यु झाल्याने घाटि रुग्णालयातील डॉक्टरांनी पोलीसांना सदर मयताची माहिती कळवली असता नातेवाईकांचा शोध घेत असल्याने सदर मयताचे प्रेत घाटितील शव आगारात ठेवण्यात आले.सदर वृध्द हे काहिच माहिती मिळाली नसल्याने सदर वृद्ध हे काही वर्षांपासून काळा गणपती मंदिराजवळ झोपडी टाकुनी राहातं होते त्यांना कोन्हि तरी पारधेश्वर मंदिराजवळ काही वर्षांपासून आनुन सोडले होते त्यांच्या नातेवाईकांचा शोध पोलीसांनी घेतला असता त्या वृद्ध आजोबांचे कोन्हिच नातेवाईक समोर आले नाही.चिकलठाणा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविकिरण दरवडे,यांनी बेवारसांन साठि काम करणाऱ्या सु-लक्ष्मी बहुद्देशिय संस्थेचे अध्यक्ष व माणुसकी समूहाचे समाजसेवक सुमित पंडीत यांना फोन करून मयताची माहिती दिली व त्यानंतर तत्काळ अंत्यसंस्काराची जबाबदारी माणुसकी समूहाने स्विकारली.शासकीय रुग्णालयातील शवआगारा मधून मयतांचे पोस्ट्मार्टम करुन मृतदेह खाजगी रुग्णवाहिकेने अंत्यविधीसाठी. बेगमपुरा स्मशानभूमी येथे नेऊन हिंदु रिती रिवाजाप्रमाणे अंतिमसंस्कार दफनविधी दिनांक ५-७-२४ रोजी केला.यात पोलीसांना माणुसकी समूहाच्या टीम ने सहकार्य केले.अंत्यविधीसाठी चिकलठाणा पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविकिरण दरवडे,सहाय्यक पोलीस निरीक्षक समाधान पवार साहेब,पोलीस उप निरीक्षक संजय खंडागळे,सतिश पंडित,पो. हे.का.रविंद्र साळवे,अजीनाथ शेकडे,सचीन रत्नपारखे, व माणुसकी समुहाचे समाजसेवक सुमित पंडीत, प्रा.शरद सोनवणे, प्रशांत दंदे, चाचु ॲम्बुलन्स ग्रुप चे किरण रावल. समाजसेवक सुमित पंडित आदिनी अंत्यविधी साठि मदतकार्य केले.



**पोलिसांना होती वेळोवेळी माणुसकी समूहाची मदत .**
पोलिसांना रोडवरती बेवारस अवस्थेत सापडल्यावर कितीतरी व्यक्तींना सुमित पंडित ते आपल्या वृद्ध सेवांमध्ये आधार देतात व मनोरुग्णांसाठी मोठे काम करतात माणुसकी समुह कितीतरी गोरगरिबांना अहोरात्र मदत करत आलेला आहे .आतापर्यंत बऱ्याच बेवारस रुग्णांचे अत्यसंस्कार माणुसकी समुहाने केले आहे
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविकिरण दरवडे, चिकलठाणा**




# कर्मभूमी जालना येथून येऊन जन्मभूमी लोह्यात बँक अधिकारी अमोल चव्हाण यांनी राबवला आदर्श उपक्रम

## शालेय साहित्य वाटप : वृक्षसंवर्धनासाठी केले जाळीचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहराचे भूमिपुत्र तथा पहिले सरपंच कै.यशवंतराव हारजी पाटील चव्हाण यांचे कर्तृत्ववान नातू कर्मभूमी जालना येथून येऊन जन्मभूमी लोह्यात महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अधिकारी अमोल बालाजी चव्हाण यांनी समाज हित लक्षात घेऊन प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी कुठेही वेस्टेज खर्च न करता अतिशय वाखाणण्याजोगा आदर्श दायी उपक्रम राबवून आपला वाढदिवस आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा केला. याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. त्यात शालेय साहित्यांचे वाटप,शाळा परिसरात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन जाळी वाटप करून जन्म भूमीला आगळीवेगळी भेट दिली.यात शाळा, दवाखाने पोलीस स्टेशन वाचनालय आदी ठिकाणी विविध माध्यमातून कृतीतून उपक्रम राबवून समाजाकडून शाबासकीची थाप मिळवली. यावेळी शिवसेना युवा सेनेचे युवा नेते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे सिनेट सदस्य नवनाथ (बापूसाहेब) चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत अमोल चव्हाण यांनी वाढदिवसा निमित्त शालेय साहित्य व वृक्षारोपण केले. प्रसंगी नगरसेवक संभाजी चव्हाण, शिक्षक नेते हरिभाऊ चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते भारत पाटील पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा आगळावेगळा उपक्रम पार पडला. प्रस्तुत पांगरी, धावरी, शिवछत्रपती शाळा लोहा, पेनूर, माळाकोळी,संत गाडगे महाराज माध्यमिक विद्यालय लोहा सदरील दहा ते बारा ठिकाणी शाळेतील पहिली ते दहावी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना वह्या -पेन वाटप करण्यात आले. तसेच शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.पोलीस स्टेशन लोहा येथे वाटप करण्यात आले.शिवसेचे युवा सेनेचे युवा नेते नवनाथ रोहिदास चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले अमोल चव्हाण यांना शुभेच्छा देताना त्यांच्या सामाजिक उपक्रमाचे सर्वांनी कौतुक केले. यावेळी सर्व शिक्षक वृद मित्रपरिवार तसेच महेश चव्हाण, प्रशांत शिंदे, संदीप पांचाळ, प्रताप वाकडे, सूर्यकांत जामगे, सूरज काहाळेकर, ज्ञानु बुद्रुक,गजानन दांगटे, दीपक वड यासह मित्र परिवार उपस्थित होते. बँक अधिकारी अमोल बालाजी चव्हाण यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# शेतकऱ्यांनी पीक विमा प्रस्ताव सादर करताना दक्षता घ्या : विठ्ठल गिते

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**



**कंधार :** प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२४ चे पीक विमा पोर्टल सुरू झाले आहे. पीक विमा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत १५ जुलै पर्यंत असून,विमा प्रस्ताव सादर करताना शेतकऱ्यांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी विठ्ठल गीते यांनी केले आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा विमा हप्ता भरताना ऑनलाइन सेवा केंद्र (सीएससी), आपले सरकार सेवा केंद्र चालकांनी आधारकार्ड,सातबारा बँक पासबुक इत्यादी कागदपत्रांवर शेतकऱ्यांच्या नावात किरकोळ बदल असेल, तर त्या शेतकऱ्यांचा प्रथम विमा हप्ता भरून घ्यावा. तसेच विमा भरपाई मिळण्यास अवधी असल्याने,दरम्यानच्या काळात शेतकऱ्यांनी त्यांच्या नावामधील दुरुस्ती करून घेण्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. तसेच शेतकऱ्यांच्या नावात पूर्णतः बदल, असेल तर अशा शेतकऱ्यांचा विमा भरून घेऊ नये.कारण विमा भरपाई मिळताना शेतकऱ्यांच्या आधार कार्डशी जे बँक खाते लिंक आहे, अशा बँक खात्यावरच जमा होणार आहे.त्यामुळे बँकेचे पासबुक,आधारकार्ड व सातबारा वरील नाव एकच असणे आवश्यक आहे.

सर्व ऑनलाइन सेवा केंद्र चालकांनी आधारकार्ड, सातबारा व बँक पासबुक इत्यादी कागदपत्रावर शेतकऱ्यांच्या नावात किरकोळ बदल असेल, तर त्या शेतकऱ्यांचा विमा हप्ता त्वरीत भरून घेऊन शेतकऱ्यांनी दरम्यानच्या काळात त्यांचे नावात दुरुस्त करून घेण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे असे तालुका कृषी अधिकारी गिते यांनी सांगितले.



आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** इनरव्हील क्लब कळंबची वार्षिक बैठक हॉटेल तारा येथे जल्लोषात संपन्न झाली. इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष डॉ. आकांक्षा अमित पाटील यांच्यातर्फे सर्व सदस्यांना वर्षभर केलेल्या कामाबद्दल प्रमाणपत्र व प्रोजेक्टचा फोटो असलेले कप भेट देऊन सदस्यांचा सत्कार करण्यात आला . डॉ. वर्षा कस्तुरकर यांचा इफको संघटनेच्या डायरेक्टर पदी निवड झाल्याबद्दल सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. इनरव्हील क्लब कळंबचे पदाधिकारी आयएसओ डॉ. सौ मीनाक्षी भवर, ट्रेझरर सौ.राजश्री देशमुख, एडिटर डॉ. दिपाली लोंढे यांच्या कामाचे कौतुक करण्यात आले. पुढील वर्षाच्या अध्यक्ष सौ. प्रतिभा भवर व सेक्रेटरी डॉ.प्रियंका आडमुठे यांना पुढील वर्षाच्या कारकिर्दीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सर्व सदस्यांचे अध्यक्ष डॉ. आकांक्षा पाटील व सचिव सौ. जेमिनी भिंगारे यांच्यावतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# चाकात साडी अडकली, अन् एक चूक जीवघेणी ठरली!

आधुनिक केसरी न्यूज

**संजय कांबळे**

**मुखेड :** आतापर्यंतचे आयुष्य गरिबीत काढले, पण कधी तक्रार केली नाही. आयुष्याचा संघर्ष करत अभ्यासात सातत्य ठेवून शिक्षिकेची नोकरी मिळाली. आता आपले अच्छे दिन आले अन् त्याची स्वप्न रंगू लागली. पण, हा आनंद औटघटकेचा ठरला. नव्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी चॉकलेट घेऊन शाळेत निघालेल्या त्या शिक्षिकेच्या साडीचा पदर दुचाकीच्या चाकात अडकला अन् अपघात झाला. दवाखान्याच्या वाटेवर असताना, मनीषा दिगांबर घोडके (३४) या शिक्षिकेचा मृत्यू झाला. मृत मनीषा यांचे माहेर लातूर जिल्ह्यातील उद्‌गीरचे. त्यांचा विवाह मुखेडजवळच्या यवती गावातील दिगांबर यांच्याशी झाला. त्यांचा एक मुलगा दुसऱ्या वर्गात अन् मुलगी तिसरीत आहे. पण बीए, बीएड असूनही बेरोजगार असलेले दिगांबर गावात झेरॉक्सचे दुकान चालवायचे. नंतर ते बंद करून ते कामाच्या शोधात किनवटजवळील गोकुंदा गावात स्थानिक झाले. यादरम्यान मनीषा यांनी शिक्षक भरतीसाठी तयारी केली. अभियोग्यता परीक्षेतून आपली गुणवत्ता सिद्ध केली. त्यातच त्यांची पवित्र पोर्टलद्वारे यवतमाळ जिल्हा परिषदेत शिक्षण सेविका म्हणून निवड झाली. संपूर्ण प्रक्रिया होऊन त्यांना उमरखेड तालुक्यातील कोरटा केंद्रातील शिवाजीनगरची शाळा देण्यात आली बेरोजगारी, गरिबी या साऱ्यांवर होती. आता उत्तर सापडले म्हणून मनीषा, दिगांबर आणि त्यांची मुले आनंदात होती. सोमवारी शाळा सुरू होताच पहिल्या दिवशी मनीषाने हजेरी लावली. आणि पतीही होते. पण, टाकळी ते दराटी या गावादरम्यान असलेल्या पुलावर त्यांच्या साडीचा पदर दुचाकीच्या चाकात अडकला अन् काही कळण्याच्या आत त्या कोसळल्या. डोक्याला जबर मार लागला. शेतात काम करणाऱ्या अन् रस्त्यावरील लोकांनी धावपळ करून त्यांना आदिलाबाद येथे उपचारासाठी नेले. पण, वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली.



जिल्हा परिषदेत निवड झालेल्या दोनशेपेक्षा अधिक शिक्षकांना यवतमाळ येथे नुकतेच निवासी प्रशिक्षण देण्यात आले. त्यातही मनीषा घोडके यांनी समरसून सहभाग घेतला होता. प्रशिक्षणानंतर त्यांना प्रमाणपत्र मिळाले होते. या नव्या शिक्षकांचा अद्याप पहिला पगार त्यांच्या हाती पडायचा आहे. अशातच मनीषा यांच्या मुलीचा बुधवारी वाढदिवस होता. त्यानिमित्त नव्या शाळेतील मुलांना चॉकलेट वाटावे, म्हणून मनीषा यांनी नातेवाइकांकडून फोन पेवर पैसे मागवून मोठ्या प्रमाणात चॉकलेट खरेदी केले.

ते घेऊन शाळेकडे जाताना त्यांचे अपघाती निधन झाले. मुलीच्या वाढदिवशीच आईचा मृत्यू झाल्याने शोककळा पसरली आहे. आता नोकरी लागली या आनंदात मनीषा यांनी स्वतःचे काही दागिने विक्री करून गावाकडे घर बांधकाम काढले होते. मात्र, तोही आनंद आता अर्धवट राहिला, असे शिवाजीनगर शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता मडावी यांनी सांगितले.आनंदाने मुलांमध्ये त्या रमल्या. मंगळवारही असाच आनंदात गेला, पण बुधवारी सकाळी काळाने त्यांच्यावर घाला केला. गोकुंदा येथून केवळ १० किलोमीटर अंतरावर असलेल्या शाळेत जाण्यासाठी त्या आपल्या दुचाकीवर निघाल्या. घोडके यांच्या माहेरची आणि सासरचीही परिस्थिती हलाखीची आहे. नव्याने लागलेली नोकरी हाच या कुटुंबाचा आधार होता. परंतु, मनीषा यांचा अचानक मृत्यू झाल्याने हे कुटुंब हादरले आहे. त्यामुळे यवतमाळसह नांदेड जिल्ह्यातील शिक्षकांनी अवघ्या एका दिवसात त्यांच्या मदतीसाठी अडीच लाखांपेक्षा अधिक रक्कम गोळा केली. यातून घोडके यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी मदत होईल.

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना प्रभावीपणे राबवणार : सरपंच रत्नाताई चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा व घाणेगाव तांडा महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये " मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना " घोषित केलेली आहे यामध्ये रुपये १५००/ महिलांच्या खात्यामध्ये जमा होणार आहेत ही योजना १ जुलै पासून चालू होणार आहे सदर योजना महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत राबवल्या जाणार आहे अशी माहिती घाणेगाव तांडा येथील सरपंच सौ.रत्नाताई सुरेश चव्हाण यांनी दिली आहे. या योजनेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहे. १) २१ ते ६० वर्ष वयोगटातील विवाहित, परितकत्या, विधवा, महिला २) त्या महाराष्ट्रातील रहिवासी असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र ३) उत्पन्नाचे रू २.५० लाखापेक्षा जास्त नसावे म्हणजे कुटुंब प्रमुखाचे उत्पन्न अडीच लाखापर्यंत असावे ४) बँकेमध्ये सदर महिलेच्या नावे खाते असावी ५) रेशन कार्ड मध्ये सदर महिलेचे नाव असावे सदर योजना अंतर्गत सोमवार पासुन सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी " नारी शक्ती दुत ॲप " प्ले स्टोअर वरून आपल्याला देण्यात आलेल्या मोबाईल मध्ये डाऊनलोड करून घ्यावयाचे आहे व आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पात्र महिलांची नोंदणी महत्वाचे सर्वात पहिले अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी आपली नोंदणी या योजनेअंतर्गत पुढील आठवड्यात सोमवार ते बुधवार पर्यंत १००% करून घेण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची नोंदणी सदर "नारी शक्ती दुत ॲप" मध्ये करून घेण्याची जबाबदारी अंगणवाडी पर्यवेक्षिका यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे नोंदणी करत असताना 1)उत्पन्नाचा दाखला सण २०२५ पर्यंत वैद्य असणारा असावा २) जन्माचा दाखला असावा /टि.सी झेरॉक्स असावी ३)रेशन कार्ड ची झेरॉक्स असावी ४) आधार कार्ड ५) लाभार्थी नावाने बॅक पासबुक झेरॉक्स सर्व माहिती ॲप मध्ये अंगणवाडी सेविका यांनी भरावयाची आहे सोबत आधार कार्ड असणे आवश्यक आहे या व्यतिरिक्त अंगणवाडी सेविकेला गावातील इतर पात्र असणाऱ्या 21 ते 65 वयोगटातील महिलांना सुद्धा आवश्यक कागदपत्र तयार करून गावातील सेतू केंद्रातून किंवा ग्रामसेवकांच्या माध्यमातून अर्ज १ ते १५ जुलै २०२४ या कालावधी गावातील कोणतीही 21 ते 65 वयोगटातील पात्र असणारी महिला "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने" पासुन वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व अंगणवाडी सेविका मदतनीस यांनी घ्यावी गावातील जेवढे ग्रुप असतील त्या सर्व ग्रुपमध्ये या योजनेबाबत माहिती टाकावी काही आवश्यकता असल्यास त्यांनी बाल विकास प्रकल्प अधिकारी तसेच संबंधित बीटच्या पर्यवेक्षिका किंवा पाटोदा नगरपंचायत मध्ये येऊन संपर्क साधावा असे आवाहन सरपंच सौ.रत्नाताई सुरेश चव्हाण ग्रामपंचायत घाणेगाव तांडा ता सोयगाव यांनी केले आहे.



# 'त्या' वादग्रस्त शिक्षकाची उचलबांगडी

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी घेतली दखल; नारवटला दोन शिक्षकांची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मागील तीन वर्षांपासून नारवट (ता.भोकर) येथील शाळेत गैरवर्तन करणाऱ्या शिक्षकानी अधिकारी व ग्रामस्थांच्या नाकीनऊ आणले होते.असंख्य तक्रारी करूनही "बालबाका" झाला नाही. वृत्तपत्रातुन बातम्यांचा भडीमार सूरू होताच मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी गुरुवारी ता. (चार) शाळेला भेट देऊन वादग्रस्त शिक्षकांची उचलबांगडी केली असून दूस-या दोन शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे पालकांचं समाधान व्यक्त केले जात आहे. तालुक्यात मागील अनेक वर्षांपासून स्थानिक अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार पणामुळे शैक्षणिक गुणवत्ता ढासाळते आहे. शिक्षककावर वचक नसल्याने पवीत्र क्षेत्रात सावळागोंधळ सुरू आहे.एकाचा पायपोस एकला नाही. शिक्षक आपल्या मर्जी नूसार शाळेचा कारभार बघतात, स्वच्छता गृहाची दूरावस्था आहे, शूध्दपिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. संगणक कक्ष आणि प्रयोगशाळा धूळखात पडून आहे.ब-याच ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला आहे.वाडी तांड्यावरील शाळेत पटसंख्या कमी झाली आहे.शिक्षक शाळेत धूडगुस घालत आहेत.परिणामी पालकात चिंता व्यक्त केली जात आहे.अशा विविध समस्या असुन याकडे येथील अधिकारी कानाडोळा करीत असल्याचे दिसून येत आहे.संबधीत वरिष्ठांनी तालुक्यातील शिक्षण विभागात सुरू असलेला सावळागोंधळ थांबवण्यासाठी त्वरित लक्ष द्यावे अशी मागणी जोर धरते आहे.

सदरील शिक्षकास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नांदेड येथे पाठवण्याचे सांगितले असुन नारवट येथे दूसरे शिक्षक दिले आहेत. आता विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यात येणार आहे.
**माधव वाघमारे, गटशिक्षण अधिकारी भोकर**

मागील अनेक दिवसांपासून रेंगाळलेला प्रश्न मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मार्गी लावला आहे .शिक्षण विभागाने आता विद्यार्थीची गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावे.
**रामदास जोंधळे, सरपंच, नारवट**

वादग्रस्त शिक्षकाची उचलबांगडी

नारवट (ता.भोकर) येथील शाळेत दोन शिक्षकांनी मागील तिन चार वर्षांपासून सावळागोंधळ सुरू केला होता.सरपंच आणि शालेय शिक्षण समितीने अनेकदा तक्रारी करुनहि कुणीच दखल घेतली नाही.मागील दोन दिवसांपासून वृतपत्रातुन बातम्यांचा भडीमार सुरु केल्याने मागील गूरूवारी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मीनल करणवाल यांनी शाळेस भेट देऊन ग्रामस्थांशी चर्चा करून वादग्रस्त शिक्षकांची उचलबांगडी केली आहे.विदयार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान लक्षात घेता त्वरित दोन शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.



# 'नानाछंद'द्वारे सादर करणार नाना पाटेकरांमधील गीतकार

## सागरिका म्युझिकची यशस्वी २५ वर्ष पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आजवर विविधांगी संगीताची मेजवानी देत रसिक श्रोत्यांचे कान तृप्त करणारे 'सागरिका म्युझिक' हे नाव संगीतप्रेमींसाठी नवं नाही. कॅसेट-सीडीच्या काळापासून संगीतप्रेमींसमोर सुरेल संगीताचा अद्वितीय नजराणा सादर करण्याचे व्रत जोपासणाऱ्या सागरिका म्युझिकने आजच्या सिंगल्सच्या काळातही रसिकांच्या मनावर गारूड करणारी गाणी सादर केली आहेत. संगीत क्षेत्रात यशस्वी २५ वर्ष पूर्ण केल्या निमित्ताने सागरिका म्युझिक च्या वतीने एका भव्य समारंभाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. संगीत क्षेत्रातील अनेक नामवंतांनी त्यास आवर्जून हजेरी लावली. आणि सागरिका बाम आणि सागरिका म्युझिकच्या २५ व्या वर्षपूर्तीबद्दल अभिनंदन केले तसेच पुढील उज्ज्वल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संगीत क्षेत्रात २५ वर्षे पूर्ण केल्याचं औचित्य साधत 'नानाछंद' या अल्बमचे अनावरण याप्रसंगी करण्यात आले यावेळी बोलताना हा अतिशय खास अल्बम रिलीज करताना आम्हाला अतिशय आनंद होत असल्याची भावना सागरिकाच्या वतीने व्यक्त करण्यात आली. 'नानाछंद' या अल्बममधील गाणी नाना पाटेकर यांनी लिहिली असून, संगीतकार नीलेश मोहरीर यांनी संगीतबद्ध केली आहेत. वैशाली सामंत, राहुल देशपांडे आणि स्वप्नील बांदोडकर या तीन सर्वोत्कृष्ट गायकांच्या आवाजात ही गाणी रसिकांना ऐकायला मिळणार आहेत. या अल्बमची मांडणी-निर्मिती विक्रम बाम यांनी केली आहे. वरद कठापूरकर, सचिन भांगरे, विनायक नेटके आणि इतर प्रतिभावान संगीतकारांनी वादन केलं आहे. अवधूत वाडकर, तुषार पंडित आणि अजिंक्य धापरे रेकॉर्डिंग आणि मिक्स इंजिनिअर आहेत. 'खरंतर अमराठी असूनही मला मराठी लोकांनी, इथल्या संस्कृतीने मला स्विकारलं. अतिशय मेहनतीने आज 'सागरिका म्युझिक' दिमाखात उभी आहे त्याला इथली आत्मियता कारणीभूत आहे. आजवर खूप मोठं पाठबळ मला संगीत क्षेत्रातल्या दिग्गजांनी दिलं ते यापुढेही तसेच राहील यात मला अजिबात शंका नाही, असं मनोगत सागरिका बाम यांनी व्यक्त केलं.'मी निसर्गात जास्त रमतो. त्यामुळे त्या सगळ्याशी माझी खूप जवळीक आहे. अनेकदा ते शब्द आपसूक ओठावर येतात. त्या शब्दांना निलेशने अतिशय मेहनतीने सुरांमध्ये गुंफलंय त्यातूनच ही गीत निर्मिती झाली. सागरिका म्युझिक आणि सागरिका बाम यांनी या गीतांना सुंदरतेने एका अल्बमच्या माध्यमातून प्रकाशित केलं आहे. याचा अतिशय आनंद मला आहे. असे भावोद्‌गगार ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी काढले. या हृदय समारंभात ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगावकर, ज्येष्ठ गायिका उत्तरा केळकर गायक सुदेश भोसले यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या आणि सागरिका म्युझिकला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या अल्बमच्या निमित्ताने नाना पाटेकरांमध्ये दडलेला संवेदनशील गीतकार जगासमोर येणार आहे. आजवर अभिनेता-दिग्दर्शक आणि शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या नानांची सुरेल बाजू संगीत प्रेमींसमोर आणण्याचं काम सागरिकाच्या माध्यमातून केलं जाणार आहे. सागरिकाचं हे काम नक्कीच वाखाणण्याजोगं असून, वर्षानुवर्षे स्मरणात राहणारं ठरेल. **सागरिका म्युझिक विषयी :** १९८४मध्ये जेव्हा सागरिका म्युझिकचा सांगितीक प्रवास सुरू झाला, जेव्हा हिरक दास यांनी भारतातील पहिला कॅसेट आणि सीडी उत्पादनाचा कारखाना सुरू केला. १९९४पर्यंत सागरिका अकोस्ट्रॉनिक्स दिवसाला १.५ लाख सीडी तयार करत होती. भारतातील विविध भाषांमध्ये संगीत तयार करण्यासाठी समर्पित संगीत लेबल तयार करून तरुण आणि प्रतिभावान गायक-संगीतकारांसाठी हक्काचं व्यासपीठ तयार करणं ही सागरिका म्युझिकच्या प्रवासातील पुढली महत्त्वाची पायरी ठरली. आपल्या आजवरच्या कारकिर्दीत सागरिका यांनी २०पेक्षा अधिक नवीन कलाकारांना संगीत क्षेत्रात लाँच करत त्यांच्या यशस्वी कारकीर्दीस हातभार लावला आहे. मागील काही वर्षांमध्ये सागरिकाने हिंदी, मराठी, बंगाली आणि इंग्रजीमध्ये ११,००० हून अधिक ट्रॅक्सची निर्मिती आणि विपणन केलं आहे. ३०० हून अधिक संगीत व्हिडिओ आणि डिजिटल कलाकृती, मुलांसाठी १०० ॲनिमेटेड चित्रपट आणि यशस्वी संगीतावर आधारित लाईव्ह टेलिव्हिजन कलाकृती तयार केल्या आहेत. २०१९ मध्ये विक्रम बाम यांच्या रूपात सागरिकाच्या तिसऱ्या पिढीने या व्यवसायात पाऊल ठेवलं. बोस्टनमधील बर्कली कॉलेज ऑफ म्युझिकमधून पदवीधर झालेल्या विक्रम यांनी भारतीय संगीत उद्योगात निर्माता, संगीतकार आणि गायक-गीतकार अशी ख्याती मिळवली आहे. आई सागरिकासोबत काम करताना विक्रम पुढील २५ वर्षांसाठी या लेबलचं व्हिजन तयार करण्यात मदत करत आहेत. आजवर सागरिका म्युझिकच्या माध्यमातून उस्ताद रशीद खान, पं. अजय चक्रवर्ती, पं. हरिप्रसाद चौरसिया, पं. शिवकुमार शर्मा, पं. जसराज, सुरेश वाडकर, स्वप्नील बांदोडकर, वैशाली सामंत, अवधूत गुप्ते, अजय-अतुल, शंकर महादेवन, श्रेया घोषाल, महालक्ष्मी अय्यर, विजयप्रकाश, सचिन पिळगावकर, आदर्श शिंदे, अनुप जलोटा, शान, कुमार सानू, बिक्रम घोष अशा बऱ्याच दिग्गजांनी आपली कला संगीत प्रेमींपर्यंत पोहोचवली आहे.

# कसारा स्थानकालगत पंचवटी एक्स्प्रेसचे कपलिंग तुटले, दुरुस्तीनंतर रेल्वे मुंबईकडे मार्गस्थ

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :**मनमाड-नाशिक-मुंबई पंचवटी एक्स्प्रेसचे शनिवारी सकाळी कसारा स्थानकालगत कपलिंग तुटल्याने प्रवासी वर्गात धास्ती पसरली. रेल्वेतील सर्व प्रवासी सुखरूप असून दुरुस्तीनंतर ४० मिनिटांनी पंचवटी एक्स्प्रेस मुंबईकडे मार्गस्थ झाल्याची माहिती रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली. कसारा घाट उतरून पंचवटी एक्स्प्रेस कसारा स्थानकात आली. सकाळी पावणेनऊ वाजेच्या सुमारास ती कसारा स्थानकातून मार्गस्थ होत असताना ही घटना घडली. इंजिनच्या चौथ्या व पाचव्या बोगींना जोडणारी व्यवस्था (कपलिंग) विलग झाली. पाचवी बोगी नियमित महिला प्रवासी महिलांसाठी राखीव असते. अकस्मात आवाज झाला. नंतर काही डबे इतर डब्यांना मागे सोडून पुढे जाताना दिसले. यामुळे काही प्रवासी महिला घाबरल्या. इतर महिलांनी त्यांना धीर दिला. यापूर्वी असे प्रकार घडल्याचे प्रवाशांकडून सांगितले गेले. इंजिन पुढे सुरक्षित अंतरावर थांबवण्यात आले. कसारा स्थानकाजवळ ही घटना घडल्याने दुरुस्ती काम लगेचच सुरू झाले. दुरुस्ती झाल्यानंतर साडेनऊ वाजेच्या सुमारास रेल्वे मुंबईकडे रवाना झाली. नाशिक-मुंबई रेल्वे मार्गावर कसारा घाटात प्रवासी रेल्वेगाड्यांना घाट चढताना अतिरिक्त इंजिन जोडावे लागते. कसारा स्थानकात ही प्रक्रिया पार पडते. घाट उतरताना म्हणजे इगतपुरीकडून कसाराकडे जाताना तसे इंजिन जोडले जात नाही. कसारा घाटात वा गाडी भरधाव असताना ही घटना न घडल्याने मोठा अनर्थ टळला.

# महिन्याअखेरीस होणार ईरई पात्रालगत विसर्जन कुंड

## गणपती, दुर्गादेवीच्या मूर्ती विसर्जनाची होणार व्यवस्था : आयुक्तांनी केली कामाची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आगामी गणेशोत्सव व इतर उत्सवांचा काळ पाहता विसर्जन व्यवस्था सुरळीत होण्याच्या दृष्टीने ईरई नदी पात्रालगत मोठे विसर्जन कुंड तयार केले जात असुन गणपती आणि दुर्गादेवीच्या मोठ्या मुर्तींची विसर्जन व्यवस्था येथे होणार आहे.जुलै महिन्याअखेरीस विसर्जन कुंडाचे काम पुर्ण होणार असुन आज मनपा आयुक्त तथा प्रशासक विपीन पालीवाल यांनी या बांधकामाची पाहणी केली.

मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यापासुन दाताळा रोडवरील रामसेतु पुलालगतच्या जागेत विसर्जन स्थळी मोठे विसर्जन कुंड तयार करण्याच्या कामाची सुरवात करण्यात आली होती. तयार होणाऱ्या या विसर्जन कुंडाची क्षमता अंदाजे ३० लाख लिटर पाण्याची असुन ८१३७ स्केयर फुट क्षेत्रफळ आहे. १० फुट पर्यंत उंची असलेल्या मूर्तींचे यात विसर्जन करता येणार आहे. एकावेळेस २ मोठी वाहने उभी राहण्यास २ वेगवेगळे प्लॅटफॉर्म बनविण्यात आले असुन क्रेनच्या साहाय्याने मोठ्या मूर्तींचे विसर्जन करता येणे शक्य होणार आहे. या विसर्जन कुंडांद्वारे अधिकाधिक मोठ्या मूर्तींचे विसर्जन हे कुंडात करण्यात येणार आहे. नदीतील विसर्जन बंद झाल्याने मोठ्या मूर्तींच्या विसर्जनास अडथळा निर्माण होणार नसुन नदी प्रदूषणासही चाप बसणार आहे. शहरात गणेशोत्सव व दुर्गादेवी उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. विशेषतः गणेशोत्सव काळात अनेक मंडळांद्वारे मोठ्या मुर्तींची स्थापना केली जाते. मूर्ती मोठी असल्याने जिथे पाणी अधिक प्रमाणात उपलब्ध असेल तिथे विसर्जन करण्याकडे कल असतो. पुर्वी रामाळा तलावात मोठया प्रमाणात मूर्तींचे विसर्जन केले जायचे मात्र तलाव प्रदूषणमुक्त करण्याच्या दृष्टीने श्रीगणेश व दुर्गादेवी मूर्ती विसर्जन रामाळा तलावात न करता विसर्जनाची व्यवस्था ईरई नदी पात्रालगत करण्यात येते.

मागील वर्षी सर्व मोठ्या मूर्तींचे विसर्जन हे ईरई नदीत करण्यात आले होते.विसर्जन स्थळी येथे मोठ्या प्रमाणात गर्दी वाढली होती,परंतु नदीतील पाणी नैसर्गिकरीत्या कमी झाल्याने विसर्जनास अडथळा निर्माण झाला होता.नदीवर बंधारा बांधुन त्याद्वारे पाणी अडविण्याचाही प्रयत्न करण्यात आला होता, परंतु त्यास यश प्राप्त झाले नव्हते. यावर उपाययोजना म्हणुन विसर्जन स्थळी मोठ्या मूर्तींसाठी विसर्जन कुंड तयार करण्यात येत आहे.





# पुलाच्या कामात खडी, मुरुमऐवजी काळ्या मातीचा भराव; कामात चालढकल

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी महसूल मंडळ सर्कलमध्ये ठिकठिकाणी अनेक पुल कामे सुरू असुण पावसाच्या घाईगडबडीत पुलाच्या मागेपुढे भराव करतांना नियमानुसार दगडं खडी मुरुमच्या भराव ऐवजी सरळ तेथेच खोदलेली उकरलेली काळी मातीनेच भराव करण्याचें चित्र दिसून येत असुण विभागाच्या अधिकारी कर्मचारी गुपचूप चडीचुप मौन बाळगुन दिसून येत आहे. बाजार सावंगी महसूल मंडळ मधे बाजार सावंगी ते ताजनापूर, इंदापूर -बोडखा,जैतखेडा व परिसरात सर्कलमध्ये ठिकठिकाणी अनेक पुलांचे कामे पावसाळ्या पुर्वी तर काही पावसाळा दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभाग खुलताबाद तालुक्या अंतर्गत सुरु झाली.व त्यात पावसाळा ही ऐन वेळावर सुरू झाला.पुलकामामुळे तात्पुरता स्वरुपाचे (डायव्हर्ट) केलेला रस्ता पावसामुळे चिखलमय होवून ये जा करणाऱ्या वहानधारक नागरिकांना त्रासदायक ठरत आहे. तर ठिकठिकाणी सर्कलमध्ये एकच ठेकेदारांचे दोनदोन तीनतीन पुल कामे सुरु असल्याने कामात चालढकल अनियमितता होत आहे.तर पावसामुळे व नागरिक वाहनधारकांना होणाऱ्या त्रासामुळे नागरिक तातडीने काम करण्याची मागणी करत आहे.अनेक पुल कामे रेंगाळून आहे.काम करतांना ठेकेदार कधि इकडे काम कधि तिकडे काम करत तेवढंच वेळ मारून नेत आहे.व कामाला उशीर होत आहे. त्यात पावसाच्या घाईगडबडीत ठेकेदार पुल कामाच्या मागे पुढे भराव करतांना दगडं खडी मुरुम टाकण्याऐवजी तेथूनच खोदलेली उकरलेली काळी मातीचा भराव करून पैशाची बचत करत आहे.असे असताना व अनेक वेळा विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांना अवगत करुनही लक्षात आणुन देवून ही ते मात्र चडीचुप मौन बाळगुन दिसून येत आहे. कारण काम करताना ना ठेकेदार,ना उपाभियंता,ना शाखा अभियंता कुणीच उपस्थित रहात नाही.मजुर मात्र संधी साधुन काम उरकते घेत आहे.व याचा लाभ ठेकेदाराला होत आहे हे विशेष.

# स्पर्धेच्या माध्यमातून ३ हजार वृक्षांची लागवड; आम्ही वृक्षप्रेमी स्पर्धेत ४७ गट सहभागी

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे १ जुलै ते १५ जुलै दरम्यान घेतल्या जाणाऱ्या आम्ही वृक्षप्रेमी स्पर्धेत ४६ गट सहभागी झाले असुन स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत होणाऱ्या या स्पर्धेत शहरातील प्रत्येक उपलब्ध मोकळ्या जागेत ३ हजार वृक्षांची लागवड केली जाणार आहे.

या स्पर्धेत स्थानिक सामाजिक संस्था, एन.जी.ओ, ओपन स्पेस विकास समिती, विविध क्लब, जेष्ठ नागरिक मंडळे, युवक-युवती मंडळे, तसेच महिला मंडळे यांनी सहभाग घेतला असुन वृक्षारोपण करून त्या वृक्षाचे संगोपन करणाऱ्या गटांना मनपातर्फे रोख पारितोषिक देऊन पुरस्कृत करण्यात येणार आहे. सदर स्पर्धा अधिकृत सामाजिक संस्था / नोंदणीकृत क्लब व नागरिकांसाठी खुला गट अश्या २ गटात घेतली जात असुन स्वयंसेवी संस्थांचे १४ गट तर नागरिकांचे ३३ गट असे एकुण ४७ गट सहभागी झाले आहेत. या गटांनी वृक्ष लागवडीचे ठराविक ध्येय निश्चित केले असुन सर्व गट मिळुन ३ हजार वृक्षांची लागवड केली जाणार आहे.

वृक्षांच्या कमी होत असलेल्या संख्येने तापमान वाढीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. तापमान वाढीची परिस्थिती सुधारण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे हिरवेगार आच्छादन वाढवणे आणि झाडे लावून निसर्गाचे सौंदर्य परत आणणे. वृक्षारोपण मोहीम हा हवामान बदलावर सकारात्मक प्रभाव पाडण्याचा सर्वात प्रभावी मार्ग असल्याने शहरातील प्रत्येक घरी,रस्त्याकडेला तसेच सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागांमध्ये वृक्ष लागवड मोहीम मनपातर्फे राबविण्यात येत आहे.

# गडचिरोलीत ६ महिन्यात हिवतापामुळे ५ मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** यावर्षी सहा महिन्यात गडचिरोली जिल्ह्यातील विविध भागातील ५ जणांचा हिवतापामुळे मृत्यू झाला आहे. तर आत्तापर्यंत १७७१ रुग्णाचे निदान झाले. जिल्ह्यात हिवताप निर्मूलनासाठी प्रशासन प्रयत्न करीत असले तरी रिक्त पदे आणि निर्मूलन साहित्याची कमतरता यामुळे येत्या काही महिन्यात आदिवासी भागात हिवतापाचा उद्रेक होऊ शकतो. त्यामुळे राज्य शासनाने वेळीच पावले उचलली पाहिजे अशी मागणी जनतेतून होत आहे. राज्यात राजधानी मुंबईनंतर हिवातापाचे सर्वाधिक रुग्ण आदिवासीबहुल गडचिरोली जिल्ह्यात आढळतात. दरवर्षी जून ते डिसेंबर या सात महिन्यात जिल्ह्यातील हिवताप रुग्णसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असते. त्यामुळे काहींना जीवही गमवावा लागतो. हिवताप आटोक्यात आणण्यासाठी दरवर्षी प्रशासनाकडून शर्थीचे प्रयत्न केल्या जातात. २०२७ पर्यंत हिवतापमुक्त भारत करणे सरकारचे लक्ष आहे. परंतु रिक्त पदांमुळे यावर नियंत्रण मिळविण्यात प्रशासनाला अपयश येत आहे. गडचिरोली जिल्ह्यात आजघडीला अतिदुर्गम भामरागड, धानोरा आणि कोरची तालुक्यातील १६ प्राथमिक आरोग्य केंद्र हिवतापदृष्ट्या अतिसंवेदनशील आहेत. गेल्या सहा महिन्यात याच भागातील ५ जणांचा हिवतापाने मृत्यू झाला. यात ३ लहान मुलांचा समावेश आहे. रुग्णसंख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. जिल्ह्यातील हिवताप विभाग यासाठी कार्यरत असला तरी या विभागात एकूण मंजूर १९३ पदांपैकी ७८ पदे रिक्त आहेत. यात जिल्हा हिवताप अधिकाऱ्यांचाही समावेश असून काही महत्वाची पदे देखील प्रभारीवर अवलंबून आहे. हिवताप निर्मूलनासाठी लागणारी औषधे मुबलक उपलब्ध आहेत. परंतु झोपेत डास दंशापासून रोखणारी मच्छरदानी केवळ १० हजार लोकांनाच वाटप करण्यात आली आहे. तर हिवताप प्रभावित क्षेत्रातील लोकसंख्या ३ लाखांच्या पुढे आहे. त्यांमुळे पुढील पाच महिने प्रशासनासमोर हिवतापाचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. हिवतापाचे डास दिवसा जंगलात असतात. पण रात्री ते गावात येतात. त्यामुळे या भागातील नागरिकांना प्रशासनाकडून रासायनिक प्रक्रिया केलेल्या मच्छरदानी वाटप केल्या जाते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# खुनी हल्ला करणारे आरोपी एलसीबीच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दि २९ रोजी मुंबई-आग्रा महामार्गावरील हॉटेल राज पॅलेस येथे रात्री १२.३० वाजेच्या सुमारास अमोल राजेंद्र देसले व त्याचे मित्र राज जगन अहीरे, मनोज भगवान शिरसाठ असे जेवन करीत असतांना त्यांचे ओळखीचे १) भुषण रोहीदास पाचारे व २) कृष्णा दिनेश गायकवाड तेथे आले व त्यांनी राज अहीरे यास दारु पाजण्याच्या कारणावरुन वाद- विवाद घालुन राज अहीरे व अमोल राजेंद्र देसले यांचेवर स्टिलच्या रॉडने व काचेची बाटली डोक्यात मारुन जिव घेण्याच्या उद्येशान खुनी हल्ला करुन पळुन गेले होते त्याबाबत दिनांक ०३ रोजी मोहाडी नगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल होता, घटना घडल्यापासुन सदर आरोपी फरार झाले होते.

सदर दाखल गुन्हयातील फरार आरोपीतांचा शोध घेणे कामी पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांनी स्थानिक गुन्हे शाखेकडील पथक नेमण्यात आले होते. त्याअनुषंगाने पथकाने सदर आरोपीतांचा शोध घेत असता दिनांक ०४ जुलै रोजी पोहेकॉ संदीप जगन्नाथ पाटील यांना खात्रीशीर बातमी मिळाली की, सदर गुन्हयातील फरार आरोपी सुरत बायपास रोडवरील हॉटेल भंडारा जवळ फिरत आहे, लागलीच पथकाने सुरत बायपास रोडवरील हॉटेल भंडारा येथे जावुन आरोपीतांचा शोध घेत असता ते मिळुन आला गुन्हयाचे पुढील तपासकामी मोहाडी नगर पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे. सदरची कारवाई श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, धुळे, श्री. किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा.चे पो.निरी. श्रीराम पवार, शाम निकम, संदीप सरग, संतोष हिरे, मायुस सोनवणे, संदीप पाटील, प्रकाश सोनार, तुषार सुर्यवंशी, किशोर पाटील, योगश जगताप अशांनी केली आहे.






# कृषी सिंचन योजनेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** कळमनुरी तालुक्यातील प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत प्रति थेंब अधिक पीक या योजनेअंतर्गत (सन 2022 ते 2024 आजपर्यंत ) सेवा केंद्राशी हात मिळवणी करून अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक करून अनुदानामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत ठिबक व तुषार सिंचन या बाबींमध्ये सन 2022 ते 2024 या कार्यकाळमध्ये तालुका कृषी अधिकारी कळमनुरी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व वितरकाचे साठा नोंदवही तपासणे,यामध्ये कंपनीकडून आलेले साहित्य शेतकऱ्यांना विकलेले साहित्य यांची पडताळणी करणे हे नियमानुसार गरजेचे असते परंतु कळमनूरी तालुक्यामध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत तालुका कृषी अधिकारी यांनी या सर्व बाबतीमध्ये गांभीर्याने साठा नोंदवहीची तपासणी केलेली नसून वितरकांकडे माल वरील 1) बॅच क्रमांक २) सीएमएल क्रमांक हे अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये जशास तसे ठेवून व एकच माल दाखवून शासनाची फसवणूक करून अधिकाऱ्यांनी वितरकांशी संगमत करून अनुदान प्राप्त केलेले आहे. जिल्हा कृषी अधिकारी यांना वरील विषया अंतर्गत ठिबक व तुषार बाबी करिता परिशिष्ट-८ (अ), परिशिष्ट-८ (ब), परिशिष्ट-८(क),परिशिष्ट-८(ड) व वस्तू सेवा करांची माहिती परिशिष्ट-८(ई) यांची तपासणी करणे बंधनकारक आहे.म्हणून २०२२ ते आजपर्यंतचे सर्व परिष्टांची फेर तपासणी तसेच साठा नोंदवायची फेर तपासणी करन्यात यावी व ही कारवाई होई पर्यंत प्रलंबित जे प्रस्ताव असतील त्यांच्या अनुदान वितरित करण्यात येऊ नये जेणे करून या अगोदर झाला यामध्येही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गैरव्यवहार व भ्रष्टाचाराबाबत सबधित अधिकारी शामिल असतील तर त्यांच्यावर त्वरित कारवाई तसेच यावरती विभागीय समिती नेमुन या झालेल्या गैरव्यवाराची चौकशी करण्यात यावी अशी लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते नचिकेत वाढवे यांनी केली आहे.

# वाढीव घरपट्टीच्या लढ्यात आ. फारूक शाह यांचा दणका; धुळ्यात आमदारांचा मोठा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गेल्या अनेक दिवसापासून वाढीव घरपट्टीच्या मुद्द्यावर त्रस्त झालेल्या नागरिकांसाठी आमदार फारुख शाह हे लढा घेत आहेत त्यांनी विधानभवनाच्या दालनात उपोषण करत असताना मुख्यमंत्र्यांनी त्यांची मागणी मान्य करून वाढीव घरपट्टी संदर्भात महानगरपालिकेला तात्काळ आदेश दिले आणि वाढीव घरपट्टी ला स्थगिती मिळविल्या बद्दल धुळेकर नागरिकांच्या वतीने आ.फारुख शाह यांच्या कार्यालयात मोठ्या संख्येने सत्कार करण्यात आला.




# धुळे जिल्ह्यातील सहकार विभागातील विविध समस्यांबाबत सोमवारी विशेष बैठक

## बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात कार्यरत असलेल्या विविध प्रकारच्या सहकारी संस्थांचे कार्यकर्ते,पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विनंती करण्यात येते की, धुळे जिल्ह्यातील उपनिबंधक सहकारी संस्था, या पदावर वर्ग 1 च्या अधिकाऱ्याची तात्काळ नियुक्ती करण्यात यावी, यासाठी व उपनिबंधक धुळे तालुका या पदावर नियमित अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आणि सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, साक्री तालुका यांची धुळे जिल्ह्याबाहेर अन्यत्र बदली करणे आणि ज्यांच्या या संदर्भात तक्रारी आहेत किंवा जे कार्यकर्ते, पदाधिकारी व अन्य कोणी ही व्यक्ती जी सहकार क्षेत्रात कार्यरत आहेत आणि त्यांच्यावर अन्याय झालेला आहे किंवा या क्षेत्रात अन्यायाचा सामना करणाऱ्या सर्वांसाठी सोमवार दिनांक 8 जुलै 2024 रोजी दुपारी 2 वाजता धुळे जिल्हा मराठी पत्रकार भवन सभागृह,संतोषी माता मंदिर चौकाजवळ, धुळे येथे एक विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला आयोजक सर्वश्री.मोहन पाटील,गोपाल मारवाडी, ए.एन.चौधरी, पी.बी. सोनवणे, डॉ. सरोजताई पाटील, हिरालाल कोळी (वाकडे), एस.एन. विसपुते, ॲड. गोपालसिंह राजपूत, टी.एस.देवरे, ओंकार जाधव, शिवाजीराव बोरसे पाटील, के.एन.पाटील , ॲड हिरालाल परदेशी आदींनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. सर्व संबंधित कार्यकर्त्यांनी जिल्ह्यातून जास्तीत जास्त संख्येने या विशेष बैठकीत उपस्थित रहावे ही विनंती.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर